रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड शनिवार । दि. २० जून २०२६ । अंक १४ । पृष्ठे १० । किंमत ४ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

### बनावट पावत्या घोटाळ्यात अटक

**खोपोली :** खोपोली नगरपरिषदेत बनावट पावत्या सादर करून सुमारे ३३ लाख रुपयांच्या अपहारप्रकरणी खोपोली पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली असून, न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. २०२४ मध्ये चार विकासकांनी नगरपरिषदेत शुल्क भरल्याच्या खोट्या पावत्या सादर केल्याचे उघड झाल्यानंतर मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी फौजदारी कारवाईची मागणी केली होती. तसेच संबंधित विकासकांनीही आपण पैसे भरले असून, फसवणूक झाल्याची तक्रार केली होती. पान २ वर

### बस दरीत कोसळून दोन ठार

**नवी दिल्ली :** उत्तराखंडमधील चंपावत जिल्ह्यातील बाराकोट भागात बाप्रू-बांतोली रोडजवळ एक वाहन सुमारे २०० मीटर खोल दरीत कोसळून आग लागल्याची भीषण घटना घडली आहे. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून, तीन जण जखमी झाले आहेत. राज्य आपत्ती प्रतिसाद दलाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्हा नियंत्रण कक्षाकडून अपघाताची माहिती मिळताच उपनिरीक्षक डुंगर सिंह यांच्या नेतृत्वाखालील चंपावत एसडीआरएफचे पथक बचाव साहित्यासह तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

## सामाजिक न्याय भवनाचा प्रस्ताव लालफितीत

# स्मरणपत्रांचे विस्मरण!

### अंदाजपत्रक देण्यास बांधकाम विभागाचे दुर्लक्ष



**प्रमोद जाधव**
**। रायगड ।**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन व सांस्कृतिक सभागृहाची जीर्ण झालेली इमारत पूर्णपणे पाडून त्या जागी नवीन इमारत उभारण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात यावे, असे लेखी पत्र समाजकल्याण विभागाकडून देण्यात आले आहे. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाने या पत्रांकडे दुर्लक्ष करून अक्षरशः केराची टोपली दाखविल्याचे समोर आले आहे. सहा वेळा पान २ वर

**भाड्यामागे साडेनऊ कोटी खर्च**

गोंधळपाडा येथील सामाजिक न्याय भवन धोकादायक ठरल्यानंतर समाजकल्याण कार्यालय अन्यत्र हलविण्यात आले. हे कार्यालय सध्या भाडेतत्त्वावर सुरू असून, त्यासाठी दरमहा एक लाख ३२ हजार रुपये खर्च येतो. गेल्या पाच ते सहा वर्षांत सुमारे नऊ कोटी ५० लाख रुपयांचा खर्च झाला आहे. या साडेनऊ कोटी रुपयांत दोन इमारती उभ्या राहू शकल्या असत्या. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उदासीनतेमुळे भाड्यावर शासनाचा मोठा खर्च वाया गेल्याची चर्चा सुरू आहे.

> “लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटीच्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाच्या अहवालानुसार सामाजिक न्याय भवनाची दुरुस्ती करण्यापेक्षा नवीन इमारत बांधणे आवश्यक असल्याची शिफारस करण्यात आली आहे. या अहवालास कार्यालयाचाही दुजोरा आहे. नव्या बांधकामासाठी अंदाजपत्रक तातडीने तयार करून उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यासाठी सहा वेळा स्मरणपत्रेही देण्यात आली आहेत.”
>
> – सुनील जाधव, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग, रायगड

# आता ऑपरेशन ‘कमळ’ राबवणार!



- शिवसेनेच्या वर्धापनदिन मेळाव्यात उद्धव ठाकरेंची गर्जना
- भाजप, शिंदे गट आणि बंडखोर खासदारांवर जोरदार हल्लाबोल

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

देशात हिंदुत्त्वाचा आवाज बुलंद करणाऱ्या आणि महाराष्ट्रात मराठी अस्मितेचे तेज फुलवणाऱ्या शिवसेनेचा साठावा वर्धापन दिन शुक्रवारी माटुंगा येथील षण्मुखानंद सभागृहात दणक्यात पार पडला. सहा खासदारांनी व्हीप नाकारून गद्दारी केल्याने पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजप, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गट आणि पक्षातून फुटलेल्या खासदारांवर जोरदार हल्लाबोल केला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी ‘ऑपरेशन टायगर’ला प्रत्युत्तर म्हणून आता ‘ऑपरेशन कमळ’ राबवण्याचा इशारा देत भाजपा आणि त्यांच्या धोरणावर जोरदार टीका केली.

आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या ६० वर्षांच्या प्रवासाचे स्मरण केले. शिवसेनेसाठी बलिदान देणाऱ्या, तुरुंगवास भोगणाऱ्या आणि आयुष्य झोकून देणाऱ्या कार्यकर्त्यांना अभिवादन करत त्यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली उभी राहिलेली पहिली फळीच शिवसेना महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवणारी ठरल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी एकनाथ शिंदे आणि भाजपाचा समाचार घेतला. पान २ वर

## वेधक

### उरणमध्ये अडीच लाखांचे हेरॉईन जप्त

**उरण :** उरण शहरातील लाल मैदान परिसरात बुधवारी सायंकाळी उरण पोलिसांनी केलेल्या कारवाईत एका तरुणाकडून सुमारे अडीच लाख रुपये किमतीचे हेरॉईन जप्त केले. याप्रकरणी करंजा येथील एका तरुणाला अटक करण्यात आली असून, या कारवाईमुळे उरण परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी महंमद हुसेन अक्रम शेख (३३, रा. करंजा, उरण) याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून ६.४० ग्रॅम वजनाचे हेरॉईन जप्त करण्यात आले असून, त्याची अंदाजे किंमत २ लाख ५६ हजार रुपये असल्याची माहिती उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनिफ मुलाणी यांनी दिली. पान २ वर

### मोटारसायकलवरील तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** भरधाव डंपरने मोटारसायकलला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटारसायकलवरील २९ वर्षीय तरुणाचा मृत्यू, तर त्याचा सहकारी जखमी झाल्याची घटना तळोजा एमआयडीसीतील आयजीपीएल चौकाजवळ घडली. तळोजा पोलिसांनी या प्रकरणातील आरोपी डंपर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या अपघातात मृत झालेल्या तरुणाचे नाव चूमनकुमार जगदीश महतो (२९) तर जखमी झालेल्या त्याच्या सहकाऱ्याचे नाव बिकेशकुमार नवलकिशोर शर्मा (२९) असे आहे. दोघेही मूळचे बिहार राज्यातील असून, सध्या ते पनवेल मधील तोंडरेगाव येथे राहण्यास होते. पान २ वर

### तरुणाचा अपघाती मृत्यू

**नेरळ :** कर्जत-चौक राज्य रस्त्यावर शुक्रवारी सकाळी कंटेनरची दुचाकीला धडक बसली. या अपघातात कर्जत तालुक्यातील बीड गावातील तरुणाचा बळी गेला. जून महिन्यातील हा दुसरा अपघात असून, दोन दुचाकीस्वार तरुणांचे बळी गेले होते. कर्जत-चौक रस्त्यावर शुक्रवारी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास गंभीर अपघात घडला. बाईक आणि कंटेनर यांची समोरासमोर धडक झाल्याने दुचाकीस्वार तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. जितेश हिरूजी रूठे असे या २४ वर्षीय तरुणाचे नाव असून, तो कर्जत तालुक्यातील बीड गावातील रहिवासी आहे. जितेश रूठे हा आपल्या डोमिनर ४०० या बाईकवरून प्रवास करीत होता. मुंबई महानगर पान २ वर

### महिलेवर अत्याचार

**बीड :** शेतात काम करणाऱ्या एका विवाहित महिलेचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार करण्यात आल्याची खळबळजनक घटना गेवराई तालुक्यातून घडली. मन सुन्न करणारी आणि अत्यंत धक्कादायक घटना घडल्याने बीड पुन्हा एकदा हादरले आहे. या पाशवी कृत्यानंतर पीडितेला रात्रभर डांबून ठेवत बेदम मारहाणही करण्यात आली. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, संपूर्ण जिल्ह्यात या घटनेमुळे तीव्र संताप व्यक्त होत आहे. प्राथमिक माहितीनुसार, पीडित विवाहित महिला गेवराई तालुक्यातील एका गावात आपल्या शेतात नेहमीप्रमाणे काम करत होती. ती शेतात एकटी असल्याचे पाहून दबा धरून बसलेल्या दोघांनी तिच्यावर हल्ला केला.

# माणगावची जीवनवाहिनीच कोरडी!




**धोक्याची घंटा!**
- काळ नदी पूर्णपणे कोरडी
- सुमारे १०० गावांवर पाणीटंचाईचे संकट
- ३० हजार लोकसंख्येच्या माणगाव शहराला फटका
- उपसा विहिरी आटण्याच्या मार्गावर
- टँकरवर वाढती मदार
- एक-दोन दिवसाआड पाणीपुरवठ्याची शक्यता

**सलीम शेख**
**। माणगाव ।**

माणगाव तालुक्याची जीवनवाहिनी मानली जाणारी काळ नदी यंदा पूर्णपणे कोरडी पडल्याने तालुक्यावर अभूतपूर्व पाणीसंकटाचे सावट गडद झाले आहे. सह्याद्रीच्या कुशीतून उगम पावणाऱ्या या नदीच्या पात्रात पाण्याचा थेंबही शिल्लक नसल्याचे विदारक चित्र सध्या पाहायला मिळत आहे. परिणामी माणगाव, निजामपूर, गोरेगाव, इंदापूर, लोणेरेसह सुमारे १०० गावांमधील नागरिकांवर पिण्याच्या पाण्याचे गंभीर संकट ओढवले आहे.

एकेकाळी वर्षभर वाहणारी काळ नदी आज पूर्णपणे आटल्याने हजारो कुटुंबांच्या जीवनावर परिणाम झाला आहे. नदीचे पान २ वर

# अलिबाग हादरले!

## बुरुमखाण येथे महिलेचा खून

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील बुरुमखाण येथील ४२ वर्षीय विवाहित महिलेची हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. गुरुवारी (दि. १८) नवेदर-नवगाव येथे ही घटना घडली. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, विवाहबाह्य संबंधातून हा प्रकार घडल्याची माहिती समोर येत आहे. पोलिसांनी संशयित आरोपीला अटक केली असून, न्यायालयाने त्याला २४ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या घटनेमुळे अलिबाग तालुक्यात खळबळ उडाली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, छाया पाटील (४२) असे मृत महिलेचे नाव असून, त्या अलिबाग तालुक्यातील बुरुमखाण येथे वास्तव्यास होत्या. निलेश घासे (वय ४२) असे आरोपीचे नाव असून, तो नवेदर-नवगाव येथील रहिवासी आहे. मृत महिलेचे आरोपीसोबत विवाहबाह्य संबंध असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

या संबंधांमुळे महिलेचे तिच्या पतीसोबत वारंवार वाद होत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. तसेच संबंधित महिला आरोपीच्या घरी नियमित ये-जा करीत होती. आरोपी पान २ वर


### २५ जूनपासून मान्सून पुन्हा सक्रिय

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

हवामान विभागाच्या नव्या अंदाजानुसार २४ ते २५ जूनपासून महाराष्ट्रात मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे. २५ जूनपासून मुंबईसह कोकण किनारपट्टीवर पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. अरबी समुद्रात मोसमी वाऱ्यांच्या प्रगतीसाठी अनुकूल वातावरण नसल्याने मान्सूनचा विस्तार मंदावला होता. मात्र, २५ ते २८ जूनदरम्यान किनारपट्टी भागात अतिवृष्टी होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी हवामान अंदाजावर लक्ष ठेवून पेरणीची घाई टाळावी, दुबार पेरणीचे संकट टाळण्यासाठी शासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नागावच्या सरपंचांची कार्यतत्परता

- उधाणाचे खारे पाणी शेतात घुसण्यापासून रोखले
- जेसीबीच्या मदतीने दहा एकर शेतीचे नुकसान टळले



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील नागाव परिसरात गुरुवारी रात्री समुद्राला मोठे उधाण आले असताना खारे पाणी शेतजमिनीत घुसण्याचा धोका निर्माण झाला होता. मात्र, नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत जेसीबीच्या मदतीने पाण्याचा मार्ग रोखण्याची उपाययोजना केली. त्यामुळे सुमारे दहा एकर शेतीमध्ये खारे पाणी जाण्यापासून बचाव झाला असून, संभाव्य नापिकीचे संकट टळले. त्यांच्या या तत्परतेबद्दल शेतकरी आणि ग्रामस्थांकडून कौतुक व्यक्त केले जात आहे.

रायगड जिल्ह्यात १४ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत तब्बल २४ दिवस समुद्राला मोठे उधाण येणार असून, साडेचार मीटरपेक्षा अधिक उंच लाटा उसळण्याचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला होता. त्यानुसार गुरुवारी (दि. १८) रात्री सुमारे आठ ते साडेआठ वाजण्याच्या दरम्यान समुद्राला मोठे उधाण आले. किनारपट्टी भागात उंच लाटा उसळू लागल्या आणि नागावमधील चिंतामणी गल्ली तसेच पाटील गल्ली परिसरातील शेतजमिनी धोक्याच्या छायेत आल्या. या परिसरातील सुमारे दहा एकर शेतजमिनीकडे जाणाऱ्या उघडीवाटेतून खारे पाणी शिरण्याची शक्यता निर्माण झाली होती. भरतीच्या पाण्याने शेतात प्रवेश केल्यास जमीन नापिक होण्याचा धोका होता. खारे पाणी झिरपल्यास शेतीच्या पान २ वर

### सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पक्षांतर आणि बंडखोरीमुळे लोकशाही धोक्यात आल्याचा दावा करत दाखल करण्यात आलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठाने याचिकेवर सुनावणी घेण्यास नकार दिला. याचिकाकर्त्यांनी लोकप्रतिनिधींवर पक्ष बदलण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचा आरोप केला होता. मात्र, याचिकेत कोणत्याही विशिष्ट पक्षाचा किंवा राज्याचा स्पष्ट उल्लेख नव्हता. यावर न्यायालयाने याचिका अस्पष्ट असल्याचे नमूद केले. सामान्य स्वरूपाचे आरोप करण्यात आले असून, त्यांना पुष्टी देणारा कोणताही ठोस पुरावा सादर करण्यात आलेला नाही.

# विकासकाने अडवली शिक्षणाची वाट

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील कौलोशी आदिवासीवाडीतील शाळकरी मुलांच्या शिक्षणासमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. येथील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी हक्काचा रस्ताच उपलब्ध नसताना एका विकासकाने उभारलेल्या कंपाऊंडमुळे मुलांची मुख्य वाट बंद झाली आहे.

सध्या विद्यार्थी एका अरुंद पायवाटेने शाळेत जात असले तरी पावसाळ्यात ही वाटही चिखलमय होऊन बंद पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे चिमुरड्यांनी शाळेत जायचे कसे, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकारामुळे स्थानिक प्रशासनाविरोधात संताप व्यक्त होत असून, मनसेने आक्रमक भूमिका घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि रस्त्याचा प्रश्न तातडीने सोडवला नाही तर आंदोलनाचा इशारा मनसेने दिला आहे. या घटनेमुळे परिसरातून संताप व्यक्त करण्यात येत आहे. स्थानिक प्रशासनाने या प्रकरणात हस्तक्षेप करुन विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची वाट मोकळी करुन द्यावी, अशी मागणी होत आहे.



- विद्यार्थ्यांना शाळेत जाण्याचा रस्ताच नाही
- कौलोशी आदिवासीडीतील चिमुकल्यांचे शिक्षण धोक्यात

> “शिक्षणाचा हक्क देण्याच्या गप्पा मारणारे प्रशासन आदिवासी मुलांचा रस्ताच मोकळा करू शकत नसेल तर ती शरमेची बाब आहे. आम्ही प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित विकासकाला मनसे स्टाईलने दणका देऊ. मुलांच्या शिक्षणाशी कुठलाही खेळ खपवून घेतला जाणार नाही.”
>
> – सुनील साठे, अध्यक्ष, मनसे सुधागड तालुका

**शवविच्छेदनासाठी खवलीहून डॉक्टर** | **रुग्णांचे हाल, प्रशासन मात्र बघ्याच्या भूमिकेत**

# एमबीबीएस डॉक्टरविना ‘आरोग्य’ वाऱ्यावर!

**महेश पवार**
**। नागोठणे ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या आणि रायगड जिल्ह्यातील अत्यंत महत्त्वाच्या नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्राची अवस्था सध्या अक्षरशः दयनीय झाली आहे. गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून येथे एकही एमबीबीएस वैद्यकीय अधिकारी कार्यरत नसल्याने आरोग्य सेवेचा बोजवारा उडाला आहे. परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की, एखादा मृतदेह शवविच्छेदनासाठी आला तर खवली (ता. सुधागड) येथील डॉक्टरांना बोलावण्याची वेळ प्रशासनावर येत आहे.



जिल्ह्यातील मध्यवर्ती आरोग्य केंद्र असलेल्या नागोठण्यात ५६ गावे आणि ६५ आदिवासी वाड्यांतील हजारो नागरिक उपचारासाठी येतात. गरीब, गरजू आणि आदिवासी बांधवांसाठी हे केंद्र जीवनदायिनी ठरत असतानाच येथे एमबीबीएस डॉक्टर नसणे ही गंभीर बाब मानली जात आहे.

> “नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्र हे संपूर्ण परिसरासाठी महत्त्वाचे केंद्र आहे. येथे एमबीबीएस डॉक्टर नसणे, महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचे प्रश्न प्रलंबित राहणे आणि रिक्त पदे न भरणे हे अत्यंत गंभीर आहे. प्रशासनाने केवळ आश्वासने न देता तातडीने डॉक्टर नियुक्त करून आरोग्य सेवा सुरळीत करावी. अन्यथा जनआंदोलन छेडण्याशिवाय पर्याय उरणार नाही.”
>
> – समस्थ नागोठणेकर

नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात केवळ एमबीबीएस डॉक्टरच नव्हे, तर इतरही अनेक महत्त्वाची पदे रिक्त आहेत. विशेष म्हणजे रात्रीच्या ड्युटीसाठी आवश्यक असलेले पुरुष शिपाई पदही भरले गेलेले नाही. त्यामुळे महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

सध्या येथे दोन बीएएमएस महिला डॉक्टर कंत्राटी पद्धतीवर कार्यरत आहेत. मात्र, त्यांची नियुक्ती केवळ तीन महिन्यांसाठी असल्याने भविष्यातील आरोग्य सेवेबाबतही अनिश्चितता निर्माण झाली आहे.

रात्रपाळीत पुरुष शिपाई नसल्यामुळे सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पान २ वर

**तुम्ही डॉक्टर सुचवा, आम्ही भरती करतो : भोसले**

नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त डॉक्टर पदाबाबत विचारणा केली असता, रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी ‘‘तुम्ही डॉक्टर सुचवा, आम्ही भरती करू’’ असे वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या वक्तव्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली असून, ‘‘डॉक्टर शोधून आणण्याचे काम आता जनतेनेच करायचे का?’’ असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# ३० जूनपर्यंत शाळा सकाळच्या सत्रात

- जिल्हाधिकारी किशन जावळेंकडून निर्देश
- अनेक शाळांकडून कार्यवाहीकडे दुर्लक्ष

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी । ।**

जून महिना संपत आला तरीही जिल्ह्यात मान्सूनचे आगमन झालेले नाही. उष्णतेच्या लाटांचा प्रभाव अद्याप कायम असून, दुपारच्या उन्हाचा तीव्र चटका जाणवत आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून दुपारच्या सत्रातील शाळा सकाळच्या सत्रात सुरू करण्याचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांच्या या आदेशाला जिल्ह्यातील काही शाळांनी केराची टोपली दाखवल्याचे चित्र समोर आले आहे. आदेशाचे पत्र रात्री उशिरा प्राप्त झाल्याने अनेक शाळा शुक्रवारी दुपारच्या सत्रातच सुरू होत्या. तर, काही शाळांनी पत्र मिळाले नसल्याचे कारण देत पूर्ववत दुपारच्या वेळेतच वर्ग सुरू ठेवल्याची माहिती पालकांनी दिली आहे. त्यामुळे पालकवर्गात नाराजीचे सूर उमटू लागले आहेत.

प्रदीर्घ उन्हाळी सुट्टीनंतर रायगड जिल्ह्यात १५ जूनपासून शाळा सुरू झाल्या. शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला असून, नव्या विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. मात्र, जूनच्या पहिल्या आठवड्यात अपेक्षित असलेला पाऊस पान २ वर

पान १ वरून

## बनावट पावत्या घोटाळ्यात अटक

तक्रारींची पडताळणी केल्यानंतर पोलिसांनी रजनीकांत मुसळे याच्यासह तत्कालीन लेखा विभाग व सीएफसी विभागातील अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला. या प्रकरणात दोघांना अटक करण्यात आली असून, तिसऱ्या आरोपीलाही लवकरच अटक करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. नगरपालिकेच्या महसुलाला फटका बसवणाऱ्या या घोटाळ्यामागील संपूर्ण रॅकेट उघड करण्यासाठी तपास सुरू असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

## स्मरणपत्रांचे विस्मरण!

स्मरणपत्रे देऊनही अंदाजपत्रकाचा प्रस्ताव लालफितीत अडकून राहिला आहे. त्यामुळे मागासवर्गीय घटकांच्या विकासावर परिणाम होत असल्याचे बोलले जात आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने सामाजिक न्याय भवन उभारण्यात आले होते. या इमारतीसाठी दोन कोटी ७३ लाख ९४ हजार ७०० रुपयांचा निधी खर्च करण्यात आला होता. नव्याने उभारलेल्या या इमारतीचे उद्घाटन १५ ऑगस्ट २०१४ रोजी झाले. मागासवर्गीय घटकांच्या विकासासाठी तळमजल्यावर श्यामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची सहा कार्यालये सुरू करण्यात आली होती. पहिल्या मजल्यावर समाजकल्याण सहाय्यक आयुक्तांचे कार्यालय, सभागृह व कर्मचाऱ्यांची कार्यालये, तर दुसऱ्या मजल्यावर जात पडताळणी कार्यालय कार्यरत होते.

मात्र, ताबा घेतल्यानंतर अवघ्या पाच वर्षांतच ही इमारत धोकादायक ठरली. निकृष्ट दर्जाच्या कामामुळे इमारत जीर्ण झाल्याने त्यावर झालेला खर्च निरर्थक आणि अनुपयोगी ठरल्याची चर्चा आहे. त्यामुळे ही जीर्ण इमारत पाडून त्या जागी नवीन इमारत उभारण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात यावे, अशी मागणी समाजकल्याण विभागाकडून करण्यात आली. यासंदर्भात सहा वेळा पत्रव्यवहार करण्यात आला. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडून अद्याप कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही, असे समोर आले आहे.

मागील सहा वर्षांपासून सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालयासह इतर सहा कार्यालये भाडेतत्त्वावर वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उदासीनतेमुळे या कार्यालयांच्या भाड्यापोटी शासनाला आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असल्याचे सांगितले जात आहे. सामाजिक न्याय भवन व सांस्कृतिक सभागृह या दोन्ही इमारती पूर्णपणे पाडून नव्याने बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी समाजकल्याण विभागाने केली आहे. त्याची अंमलबजावणी तातडीने करावी, असेही नमूद करण्यात आले आहे. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या पत्रांची दखल घेतली जात नसल्याने अंदाजपत्रकाचा प्रस्ताव धूळ खात पडून असल्याचे चित्र आहे. त्यामुळे सामाजिक संस्थांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

उपविभागीय अधिकाऱ्यांना अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, त्याची कार्यवाही लवकरात लवकर होईल.

**– मोनिका धायतडक, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग**

## ३० जूनपर्यंत शाळा सकाळच्या सत्रात

अद्यापही पडलेला नाही. जून महिना संपण्याच्या मार्गावर असतानाही जिल्ह्यात पाऊस दाखल झालेला नसल्याने वातावरणात प्रचंड उष्णता निर्माण झाली आहे. दुपारच्या वेळी घराबाहेर पडणेही अवघड होत असून, त्याचा मानवी आरोग्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

एलनिनोच्या प्रभावामुळे मान्सूनच्या आगमनास विलंब झाल्याचे सांगितले जात आहे. परिणामी, उष्णतेच्या लाटेचा परिणाम जिल्ह्यात जाणवू लागला आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने तातडीने पाऊल उचलले आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जिल्ह्यातील अंगणवाड्या तसेच सर्व प्रकारच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा १९ जूनपासून सकाळच्या सत्रात सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहेत. हे आदेश ३० जूनपर्यंत लागू राहणार असल्याचे पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे.

या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी, असे निर्देश गुरुवारी (दि. १८) जारी करण्यात आले. दुपारच्या सत्रातील शाळा सकाळी सुरू करण्याबाबतचे पत्र गुरुवारी रात्री उशिरापर्यंत सोशल मीडियावर व्हायरल झाले. मात्र हे पत्र अनेक शाळांपर्यंत वेळेत न पोहोचल्याने काही ठिकाणी शुक्रवारी दुपारच्या सत्रातच शाळा सुरू ठेवण्यात आल्या. काही ठिकाणी पालक आणि शिक्षकांमध्ये यावरून वाद झाल्याची माहितीही समोर आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाकडे दुर्लक्ष करून दुपारच्या सत्रात शाळा सुरू ठेवणाऱ्यांविरोधात जिल्हा प्रशासन कोणती कारवाई करणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मोटारसायकलवरील तरुणाचा मृत्यू

चूमनकुमार आणि बिकेशकुमार मोटारसायकलवरुन (एमएच-४६-डीडी-९२१२) नागझरी येथील एफजी ग्लास कंपनीत ड्युटीसाठी जात होते. त्यांच्या यावेळी तळोजा एमआयडीसीतील आयजीपीएल चौकाजवळ पाठीमागून येणाऱ्या भरधाव डंपरने (एमएच-४६-सीएल-८७९७) मोटारसायकलला जोरदार धडक दिली. त्यामुळे झालेल्या अपघातात चूमनकुमार महतो याचा मृत्यू झाला, तर त्याचा मित्र बिकेशकुमार शर्मा जखमी झाला.

## तरुणाचा अपघाती मृत्यू

प्रदेश विकास प्राधिकरणकडून नव्याने कर्जत-चौक राज्यमार्ग रस्त्यावर कुठेही गतिरोधक नाही. त्यामुळे वेगाने वाहने चालवण्याचे प्रकार या रस्त्यावर सुरू आहेत. त्यात आता जून महिन्यातील दुचाकीस्वाराचा तिसरा बळी गेला आहे. मागील आठवड्यात कर्जत शहरातील भिसेगाव येथील आणि वाकस गावातील अशा दोन तरुणांचा दुचाकीच्या धडकेने मृत्यू झाला होता. मात्र, या घटनेने पुन्हा एकदा कर्जत तालुक्यावर शोककळा पसरली आहे.

## माणगावची जीवनवाहिनीच कोरडी!

विस्तीर्ण पात्र उघडे पडले असून, ठिकठिकाणी भेगा पडलेल्या जमिनी आणि कोरडे दगडच दिसत आहेत. नदीवरील अवलंबित्व असलेल्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी वणवण सुरू झाली असून, नागरिक, शेतकरी आणि पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

काळ नदीसोबतच गोद नदीचीही अवस्था दयनीय झाली आहे. विहिरी, तलाव, ओढे, नाले आणि पारंपरिक जलस्रोतांनी तळ गाठला आहे. अनेक गावांमध्ये पाण्याचा एक थेंब मिळणेही कठीण झाले आहे. वाढत्या उष्णतेमुळे जमिनीला भेगा पडल्या असून, ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत होऊ लागले आहे. या संकटाची सर्वाधिक झळ माणगाव शहराला बसण्याची शक्यता आहे. सुमारे ३० हजार लोकसंख्या असलेल्या शहरासह परिसरातील गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. पाणीपुरवठ्यासाठी वापरण्यात येणाऱ्या नदीकाठच्या उपसा विहिरीदेखील आटण्याच्या मार्गावर आहेत. या विहिरींमधील गाळ तातडीने काढला नाही तर शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर मोठा परिणाम होऊ शकतो. दुर्गम भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला असला तरी तो अपुरा ठरत आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना पाण्यासाठी लांब अंतर पायी जावे लागत आहे. अनेक गावांमध्ये नागरिक चातक पक्ष्यासारखी पावसाची वाट पाहात आहेत.

दरम्यान, काळ प्रकल्पाच्या कालव्यातून सोडण्यात आलेले पाणी काही प्रमाणात आधार देत आहे. जनावरे, चारा आणि शेतीच्या गरजांसाठी हे पाणी उपयोगी पडत असले तरी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम आहे. येत्या काही दिवसांत समाधानकारक पाऊस न झाल्यास परिस्थिती अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त होत आहे. काळ नदीचे कोरडे पडलेले पात्र हा केवळ पर्यावरणीय इशारा नसून हजारो कुटुंबांच्या अस्तित्वाशी निगडित गंभीर प्रश्न बनला आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून पर्यायी पाणीपुरवठा, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आणि गाळ काढण्याच्या कामांना गती द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## नागावच्या सरपंचांची कार्यतत्परता

उत्पादनक्षमतेवर दीर्घकालीन परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली होती. ही परिस्थिती लक्षात येताच सरपंच हर्षदा मयेकर यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक जाणकार आणि शेतकऱ्यांशी चर्चा करून उपाययोजनांना सुरुवात करण्यात आली. भरतीचे पाणी शेताकडे जाण्यापासून रोखण्यासाठी जेसीबीची मदत घेण्यात आली. उघडीवाट तात्पुरती बंद करून पाण्याचा प्रवाह रोखण्यात आला. साडेआठ वाजल्यापासून सुरू झालेली ही धावपळ साडेनऊ वाजेपर्यंत सुरू होती. जवळपास तासभर चाललेल्या प्रयत्नांनंतर अखेर शेतामध्ये खारे पाणी जाण्यापासून रोखण्यात यश आले. त्यामुळे संभाव्य शेती नुकसान टळले असून, अनेक शेतकऱ्यांनी सरपंच हर्षदा मयेकर यांचे आभार मानत त्यांच्या तत्परतेचे कौतुक केले.

## एमबीबीएस डॉक्टरविना 'आरोग्य' वाऱ्यावर!

याच कारणामुळे एका महिला डॉक्टरने राजीनामा देण्याचा निर्णय घेतल्याचे समोर आले आहे. त्यामुळे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आरोग्य केंद्रातील परिस्थिती किती गंभीर बनली आहे, याची प्रचिती येते.

आश्वासनांची खैरात; प्रत्यक्षात मात्र शून्य कारवाई

एप्रिल महिन्यात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांनी नवीन एमबीबीएस डॉक्टरची नियुक्ती लवकरच होईल, असे आश्वासन दिले होते. मात्र, दोन महिने उलटूनही पद रिक्तच आहे. डॉ. आदित्य शिरसाट आणि डॉ. नितीन टकले यांच्या बदलीनंतर निर्माण झालेली पोकळी अद्याप भरली गेलेली नाही. विशेष म्हणजे, गडबसारख्या ग्रामीण आरोग्य केंद्रात दोन आणि खवलीसारख्या केंद्रात एक एमबीबीएस डॉक्टर कार्यरत असताना जिल्ह्याच्या मध्यवर्ती नागोठणे आरोग्य केंद्राकडे प्रशासनाने पाठ फिरवल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.

**आरोग्य केंद्राला वाली आहे का?**

सततच्या दुर्लक्षामुळे नागोठणे व परिसरातील नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे. ''शवविच्छेदनासाठी डॉक्टर बाहेरून आणावे लागतात, रुग्णांना तज्ज्ञ उपचार मिळत नाहीत, महिला कर्मचारी असुरक्षित आहेत; मग या आरोग्य केंद्राचा वाली कोण?'' असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. आरोग्य विभाग आणि जिल्हा परिषद प्रशासन यांच्यातील समन्वयाच्या अभावाचा फटका थेट सर्वसामान्य जनतेला बसत असून तातडीने एमबीबीएस डॉक्टर नियुक्त करून सर्व रिक्त पदे भरण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

**प्रक्रिया सुरू आहे : डॉ. नेहुलकर**

एमबीबीएस वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या भरतीसाठी मंत्रालयातील आरोग्य भवन स्तरावर प्रक्रिया सुरू असून, ती पूर्ण झाल्यानंतर नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर नियुक्त करण्यात येतील. इतर कर्मचाऱ्यांची भरती प्रशासकीय स्तरावर होत असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांनी सांगितले.

## अलिबाग हादरले!

आणि महिलेमध्येही अनेकदा वाद होत असल्याचे तपासात पुढे आले आहे. गुरुवारी (दि. १८) महिलेचे तिच्या पतीसोबत वाद झाल्यानंतर त्या आरोपीच्या घरी गेल्या होत्या. त्यावेळी आरोपी आणि महिलेमध्ये तीव्र शाब्दिक वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्याने महिलेला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर तिचा मृत्यू झाला. सुरुवातीला याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र, आरोपीनेच महिलेस मारहाण केल्याची तक्रार मयत महिलेच्या नातेवाईकांनी पोलिसांकडे दिल्यानंतर तपासाची दिशा बदलली. त्यानंतर पोलिसांनी अधिक चौकशी करून आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला.

याप्रकरणी आरोपी निलेश घासे याला ताब्यात घेण्यात आले असून, त्याला अलिबाग न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला २४ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रवीण पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## आता ऑपरेशन कमळ राबवणार!

यावेळी शिवसेना काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याच्या चर्चेलाही त्यांनी स्पष्ट शब्दांत फेटाळून लावले. आणीबाणीच्या काळातील एक प्रसंग सांगताना त्यांनी काँग्रेस नेते रजनी पटेल यांनी शिवसेना काँग्रेसमध्ये विलीन करण्याचा प्रस्ताव दिला होता, अशी आठवण करून दिली. ''आम्ही ३० वर्षे भाजपसोबत राहून भाजपात विलीन झालो नाही, तर काँग्रेसमध्ये कोण विलीन होणार?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

भाजपवर टीका करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, ''भाजपकडे दोन तृतीयांश बहुमत आहे. तरीही इतर पक्षांतील लोक पळवण्याचे काम सुरू आहे. तुमच्याकडे राजकारणात माणसं तयार होत नसतील तर आमची का पळवता? तुमच्या वांझोटेपणावर तुम्ही इलाज करा. तुमची पोरं पळवणारी टोळी आहे, आमची पोरं पुरवणारी टोळी नाही.''

पक्षातील बंडखोरीवर भाष्य करताना ते भावुकही झाले. ''आज ज्या मतदारसंघांत गद्दारी झाली, त्या मतदारांची मी माफी मागतो. मोदींची लाट असतानाही लोकांनी माझ्यावर विश्वास ठेवून खासदार निवडून दिले. आता पुन्हा फोडाफोडी सुरू आहे. सत्तापिपासूपणाची मर्यादा असते,'' असा घणाघात त्यांनी केला.

मातोश्रीवर होत असलेल्या टीकेलाही त्यांनी उत्तर दिले. ''मी भेटत नव्हतो तर गधड्या, तू निवडून कसा आलास? मी मंत्री केलं, आमदार केलं, खासदार केलं. पण उद्धव बाळासाहेब ठाकरेंना किंमत नाही, असे सांगितले जाते. मातोश्रीवर शिंतोडे उडवले जात आहेत. ही कोणती अवलाद आहे?'' असा सवालही त्यांनी केला.

देशातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना उद्धव ठाकरे यांनी लोकशाही धोक्यात असल्याचा आरोप केला.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे मांडवणे, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालक नागराज आदिराघवराव नल्लु यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे. आर.. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ५७ | ३ क | २-१२-८० पैकी नागराज आदिराघवराव नल्लु यांचे मालकीचे ०-९४-६० यापैकी ०-३२-२० | १-०१ |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि.२०/०६/२०२६.

अॅड. सतीश धर्मा डायरे,
पत्ता-००२, शिवतीर्थ, सहयोग को.ऑ.हौ.सो. ब्राम्हण आळी नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.९८५०४०२६५७.

### उपविभागीय अधिकारी, रोहा उपविभाग, रोहा यांच्या न्यायालयात जाहीर नोटीस

आरटीएस विलंबमाफी अर्ज ३८/२०२६

सविता बाळू कांबळे,
रा.१०१ विजय नगर, बर्तक नगर, — अपिलार्थी
शिवसेना शाखेजवळ, ठाणे-पश्चिम,
जि. ठाणे - ४००६०६

विरूद्ध

१. सुरेश कोंडीबा कांबळे,
रा.राबोडी पंचगंगा, कलावती मंदिरासमोर,
रुस्तमजी कावेरी ए-विंग, १२ वा मजला,
रूम नं.१२०५. ठाणे पश्चिम, जि.ठाणे- ४००६०१
२. गिता कोंडीबा कांबळे.
रा.आर.बी.चाळ क्र.२. खारटन रोड,
बेडेकर कॉलेज जवळ, ठाणे, जि.ठाणे- ४००६०१
३. नलीनी नागेश भोजने,
रा. म्युनसिपल चाळ नं.२, रूम नं.८, खारटन रोड,
दादोजी कोंडदेव स्टेडीयम अ.का.जि.ठाणे-४००६०१
४. नामदेव कोंडीबा कांबळे,
रा.मु.पो. महागांव, ता.सुधागड, जि.रायगड — उत्तरार्थी
५. राजन दामोदर पाटील,
रा.बाक्रुळ, ता.पेण, जि.रायगड
६. श्रीधर परशुराम लाड,
रा.महागांव, ता.सुधागड, जि.रायगड
७. कविता अमितकुमार रसाळ,
८. दिपक भानुदास साळुंके,
९. रघुनाथ रामचंद्र रसाळ
रा.मु.पो.महागांव, ता.सुधागड, जि.रायगड
१०. तलाठी सजा महागांव,
मु.पो.महागांव, ता.सुधागड, जि.रायगड
११. मंडळ अधिकारी जांभुळपाडा,
मु.पो.जांभुळपाडा, ता.सुधागड, जि.रायगड

सर्व संबंधितांस या नोटीशीद्वारे सूचित करण्यात येते कि, अपिलार्थी यांनी या न्यायालयात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये महागांव, ता.सुधागड येथील गट नं.२०, २४,२८ या मिळकतीबाबत, फेरफार क्र.१०८, ६१६, ६७६ व १०४९ च्या विरोधात अपील दाखल केले आहे.

सबब, या जाहीर नोटीशीद्वारे तमाम संबंधितांना कळविण्यात येते की या अपिलाकामी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. तरी संबंधितांनी दिनांक २९/०६/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता स्वतःअथवा वकीलामार्फत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर रहावे. नमुद तारखेस हजर न राहिल्यास सदर अपिलामध्ये गुणवत्तेवर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरहू नोटीस माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे. दि.१९/०६/२०२६

सही/-
उपविभागीय अधिकारी
रोहा विभाग रोहा

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री.नरेंद्र तुकाराम गोमारे यांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत तीचे विद्यमान मालक श्री.भगवान बाळकृष्ण चंचे यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे कोल्हारे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ५६ | १ | ०-२०-०० | ०-६३ |

सदर मिळकतीचे सातबारा सदरी एकुण क्षेत्र ०-४८-०० गुंठे इतके क्षेत्र आहे यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०-२०-०० गुंठे इतके क्षेत्र आहे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसीद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. २०/०६/२०२६.

अॅड. शिवाजी किसन टोकरे
पत्ता - शॉप नं.९, समर्थ कृपा हौसिंग सोसायटी नेरळ, महेश टॉकीज जवळ, नेरळ ता, कर्जत, जि. रायगड
पिनकोड नं. ४१०१०१
फोन नं. ७३५०१९४२००

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थ मौजे शिंगणवट, ता.पेण, जि.रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत असुन सदर मिळकतीचे विद्यमाने मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे-शिंगणवट, ता.पेण, जि.रायगड येथील**

| मालक/ कब्जेदाराचे नाव | गट क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.-आर.-चौ.-मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| हरी सोमा पाटील | ३१ | - | ०-३८.०० | ३.६२ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, अॅटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु.हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१(एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर करावयात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील हरी सोमा पाटील यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. २०/०६/२०२६.

श्री. तुषार द. देवरे, अॅडव्होकेट
पत्ता : फ्लॅट नं. ए-२, जय नगर को. ऑप हौ. सोसा.लि.कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६, जि.रायगड.
मोबाईल नं. ९३२५००४००८

### दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल

४७१ कापड बाजार, टिळक रोड, पनवेल - ४१० २०६, जि. रायगड
ईमेल आयडी - panvel_urban65@rediffmail.com /panvelurban0065@gmail.com

**लिलाव विक्री सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार यांनी बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून, सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन्स ऑफ फायनान्शियल असेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार/गहाणवटदारांना **मागणी सूचना** जारी करून त्यांना सदर सूचनेमध्ये उल्लेखित थकीत देय रक्कम परतावा करण्याची मागणी केली होती. तथापि, कर्जदार/गहाणवटदार, सदर देय रक्कम परतावा करण्यास अयशस्वी ठरल्याने, निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर नियनांच्या नियम ८ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि १४ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तांचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

| अ. क्र. | कर्जदार/ जामीनदार/ गहाणवटदाराचे नाव | मालमत्तेचे वर्णन (लिलाव करण्यात येणाऱ्या) | मागणी सूचनेचा दिनांक आणि थकबाकी रक्कम | निश्चित राखीव किंमत | राखीव किंमतीच्या १०% ईएमडी रु. | पाहणीचा दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रियेश पांडुरंग कांगी (कर्जदार), सौ. राजश्री प्रियेश कांगी (कर्जदार), श्री. अरुण नारायण म्हात्रे (जामीनदार), श्री. आशिष भगवान दरे (जामीनदार) | श्री. प्रियेश पांडुरंग कांगी आणि सौ. राजश्री प्रियेश कांगी यांच्या नावे असलेले घर क्र. १२१८ए (पनवेल महानगरपालिका पनवेलच्या कार्यक्षेत्रामधील), क्षेत्रफळ ९०० चौ.फू., मु. कामोठे, तालुका पनवेल, जि. रायगड. | २१.०४.२०२५ आणि ३१.०३.२०२५ रोजीनुसार रु. ३५,१८,७७२.०० अधिक ०१.०४.२०२५ पासून चे पुढील व्याज | रु. ३६,००,०००/- (ज्याखाली कोणताही प्रस्ताव स्वीकारण्यात येणार "नाही".) | रु. ३,६०,००० | २९.०६.२०२६ आणि स. ११.०० ते दु. ०१.०० |

वरील उल्लेखित संपत्ती/मालमत्तांच्या लिलाव विक्री (सरफैसी कायदा २००२ च्या अटी आणि शर्ती आणि त्याअंतर्गत नियमनांनुसार) करिता जाहीर सूचनेच्या पुढे, दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. सदर मालमत्तांकरिता "जसे आहे जेथे आहे तत्त्वावर" आणि "जसे आहे जे आहे तत्त्वावर" फक्त लिलावाद्वारे प्रस्ताव आमंत्रित करीत आहेत.

**लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्ती खालील प्रमाणे आहेतः-**

१. लिलाव **'जसे आहे जेथे आहे तत्त्वावर' आणि 'जसे आहे जे आहे तत्त्वावर', 'तेथे जे आहे' आणि 'कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर'** आयोजित करण्यात येईल आणि "ऑफलाईन" करण्यात येईल.
२. "**श्री. प्रियेश पांडुरंग कांगी आणि सौ. राजश्री प्रियेश कांगी यांच्या नावे असलेले घर क्र. १२१८ए (पनवेल महानगरपालिका पनवेलच्या कार्यक्षेत्रामधील), क्षेत्रफळ ९०० चौ.फू., मु. कामोठे, तालुका पनवेल, जि. रायगड** या स्थावर मालमत्तेच्या खरेदीकरिता प्रस्ताव" असे उपरोल्लेखित केलेल्या मोहोरबंद पाकिटामधून प्रस्ताव सादर करावयास हवा आणि संभाव्य बोलीदारांनी सदर प्रस्तावाचे मोहोरबंद पाकिट खाली उल्लेखिलेल्या ठिकाणी **दि. ३ जुलै, २०२६ रोजी सायं. ५.०० वाजता** किंवा त्यापूर्वी आणावा/पाठवावा आणि ईएमडी रक्कम दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय असलेल्या डिमाण्ड ड्राफ्टद्वारे भरावी.
३. निम्नस्वाक्षरीकारांना अशा पद्धतीने प्राप्त झालेले प्रस्ताव **दि. ०७ जुलै, २०२६** रोजी उपरोल्लेखित ठिकाणी **सायं. ०४.०० वाजता** उघडण्यात आणि विचारात घेण्यात येतील.
४. निम्नस्वाक्षरीकार यांनी कोणताही प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे आणि/लिलाव सुधारित ते रद्द करण्याचे आणि/ किंवा पुढे ढकलण्याचे त्यांचे अधिकार राखून ठेवले आहेत.
५. लिलाव विक्री सरफैसी कायदा/नियमन २००२ मध्ये विहीत शर्ती आणि त्याअंतर्गत/वेबसाईटमध्ये उल्लेखित अटी आणि शर्तींच्या, तसेच इच्छुक/सहभागी होणाऱ्या बोलीदारांद्वारे सादर करावयाच्या प्रस्ताव/बोली दस्तावेजांमधील शर्तींच्या अधीन आहे.
६. उपरोल्लेखित मालमत्ता वर उल्लेखिलेल्या राखीव किंमतीच्या खाली विक्री करण्यात येणार नाहीत.
७. यशस्वी बोलीदार/रांच्या बाबतीत सदर ठेव/वी समायोजित करण्यात येतील, अन्यथा परत करण्यात येतील. सदर इसारा रक्कम अनामत/तींवर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही.
८. जर यशस्वी बोलीदार भरणा करण्यास अयशस्वी ठरल्यास किंवा मोहोरबंद निविदा/लिलावाच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यास कशाही प्रकारे अयशस्वी ठरल्यास, याआधीच जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि जप्त केलेल्या रकमेवर त्याचा/तिचा कोणताही दावा नसेल.
९. उपरोल्लेखित इसारा रक्कम अनामत (ईएमडी) सह प्रस्ताव मुंबई येथे देय दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय डीडी/पे ऑर्डरद्वारे **दि. ३ जुलै, २०२६ रोजी** किंवा त्यापूर्वी पॅन कार्ड आणि (आधार कार्ड) पत्त्याचा पुरावा समाविष्ट असलेल्या केवायसी दस्तऐवजांच्या स्कॅन केलेल्या प्रतींसह सेवा प्रदात्यास सादर करावी.
१०. निविदा उघडल्यानंतर, इच्छुक बोलीदार ज्यांनी राखीव किंमतीच्या खाली नसलेल्या त्यांच्या बोली सादर केल्या आहेत त्यांना प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीमध्ये बोली रक्कम वाढविण्याची संधी देण्यात येईल.
११. किमान बोली विस्तार रक्कम **रु. १०,०००/- (रुपये दहा हजार)** आहे.
१२. यशस्वी बोलीदार/रांनी विक्रीच्या संदर्भात प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे प्रस्ताव स्वीकारल्यानंतर लगेचच, याआधीच भरलेली ईएमडी समायोजित करून, विक्री किंमतीच्या रकमेची २५% जमा करावी, असे न केल्यास जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल. शिल्लक विक्री किंमतीच्या ७५% रक्कम प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीमध्ये विक्रीच्या मंजुरीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत देय आहे. जर विहीत कालावधीमध्ये शिल्लक रक्कम जमा करण्यात न आल्यास, जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल. प्राधिकृत अधिकाऱ्याने यशस्वी बोलीदारास जप्तीची पुढील सूचना देणे आवश्यक नाही.
१३. बोलीदार "कॅव्हेट एम्प्टर" (खरेदीदार सावधान) या तत्त्वाने बांधील आहेत आणि फर्म किंवा सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही भार, वैधानिक दायित्वे, मालमत्ता कराची थकबाकी, आयकर, उत्पादन शुल्क, कामगार देणी, वीज आणि देखभाल देणी इत्यादी शोधण्यासाठी त्यांची योग्य ती तपासणी करण्याचा सल्ला दिला जात आहे. यशस्वी बोलीदारांनी सर्व जावके म्हणजेच महापालिका कर, देखभाल/संस्था शुल्क, वीज शुल्क, पाणी शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क (जर लागू असल्यास), जर असल्यास आणि संबंधित मालमत्तांशी संबंधित विक्री किंमतीव्यतिरिक्त सर्व जावके समाविष्ट असलेले इतर प्रासंगिक शुल्क, खर्च भरावयाचे आहेत.
१४. यशस्वी बोलीदारांनी विक्री प्रमाणपत्रावर देय नोंदणीकरण शुल्क, मुद्रांक शुल्क, कर, तारण मालमत्ता त्याच्या/तिच्या नावे हस्तांतरित करून घेण्याकरिता कोणतेही अन्य शुल्क यांसारखे प्रभार/शुल्क भरावयाचे आहेत.
१५. विक्री प्रमाणपत्र फक्त यशस्वी बोलीदाराच्या नावेच आणि फक्त संपूर्ण/विक्री किंमत प्राप्त झाल्यानंतरच पारित करण्यात येईल.
१६. कर्जदार, गहाणवटदार आणि जामीनदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, ते लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्तींनुसार, वरील उल्लेखित मालमत्ता खरेदीकरिता इच्छुक खरेदीदार/ग्राहक सोबत आणू शकतात.
१७. वरील सदर मालमत्तांची पाहणी पूर्व परवानगीवर आधारीत आणि प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सोयीनुसार देण्यात येईल.
१८. प्राधिकृत अधिकारी उच्चतम प्रस्ताव किंवा आणि सर्व प्रस्ताव स्वीकारण्यास बांधिल नाहीत आणि कोणतेही कारण न दर्शविता कोणतीही किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे हक्क राखून ठेवीत आहेत.
१९. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. वरील उल्लेखित मालमत्तांवर प्रलंबित असलेल्या कोणत्याही दायित्वांकरिता जबाबदार नाही. मालमत्तेचा **'जसे आहे जेथे आहे' आणि 'जसे आहे जे आहे', 'तेथे जे आहे'** आणि **'कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर'** लिलाव करण्यात येईल.
२०. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि, कोणतेही कारण न दर्शविता किंवा पूर्व सूचनेशिवाय निविदा विक्री/लिलाव रद्द करण्याचा/स्वीकारण्याचा/फेटाळण्याचा/बदलण्याचा/सुधारणा करण्याचा/पुढे ढकलण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत.
२१. प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, मालमत्तेवर कोणताही भार अस्तित्वात नाही. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.स विक्री अंतर्गत असलेल्या मालमत्तेच्या संदर्भातील कोणताही प्रभार, धारणाधिकार किंवा भार, मालमत्ता कर, किंवा शासन किंवा अन्य कोणाचीही अन्य कोणतीही देणी याकरिता जबाबदार धरता येणार नाही.
२२. विक्री दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.च्या मंजुरीच्या अधीन आहे.

**ठिकाणः पनवेल, जि. रायगड**
**दिनांकः २०.०६.२०२६**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.**

### दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल

४७१ कापड बाजार, टिळक रोड, पनवेल - ४१० २०६, जि. रायगड
ईमेल आयडी - panvel_urban65@rediffmail.com /panvelurban0065@gmail.com

**लिलाव विक्री सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार यांनी बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून, सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन्स ऑफ फायनान्शियल असेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार/गहाणवटदारांना **मागणी सूचना** जारी करून त्यांना सदर सूचनेमध्ये उल्लेखित थकीत देय रक्कम परतावा करण्याची मागणी केली होती. तथापि, कर्जदार/गहाणवटदार, सदर देय रक्कम परतावा करण्यास अयशस्वी ठरल्याने, निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर नियनांच्या नियम ८ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि १४ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तांचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

| अ. क्र. | कर्जदार/जामीनदार/ गहाणवटदाराचे नाव | मालमत्तेचे वर्णन (लिलाव करण्यात येणाऱ्या) | मागणी सूचनेचा दिनांक आणि थकबाकी रक्कम | निश्चित राखीव किंमत | राखीव किंमतीच्या १०% ईएमडी रु. | पाहणीचा दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. निवृत्ती लक्ष्मण कोळी (कर्जदार/ गहाणखतदार), सौ. शलाका निवृत्ती कोळी (कर्जदार/ गहाणखतदार), श्री. राज एकनाथ कोळी (जामीनदार), श्री. दीपक बंडू कोळी (जामीनदार), श्री. निलेश अरुण खाडे (जामीनदार) | श्री. निवृत्ती लक्ष्मण कोळी आणि सौ. शलाका निवृत्ती कोळी यांच्या नावे असलेले घर क्र. २०९४, गाव गव्हाण तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ८४१ चौ.फू. | १२.११.२०२४ आणि ३१.१०.२०२४ रोजीनुसार रु. २५,७९,०६७/- अधिक ०१.११.२०२४ पासून चे पुढील व्याज | रु. १८,५०,२००/- (ज्याखाली कोणताही प्रस्ताव स्वीकारण्यात येणार "नाही".) | रु. १,८५,०२० | ३०.०६.२०२६ आणि स. ११.०० ते दु. ०१.०० |

वरील उल्लेखित संपत्ती/मालमत्तांच्या लिलाव विक्री (सरफैसी कायदा २००२ च्या अटी आणि शर्ती आणि त्याअंतर्गत नियमनांनुसार) करिता जाहीर सूचनेच्या पुढे, दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. सदर मालमत्तांकरिता "जसे आहे जेथे आहे तत्त्वावर" आणि "जसे आहे जे आहे तत्त्वावर" फक्त लिलावाद्वारे प्रस्ताव आमंत्रित करीत आहेत.

**लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्ती खालील प्रमाणे आहेतः-**

१. लिलाव **'जसे आहे जेथे आहे तत्त्वावर' आणि 'जसे आहे जे आहे तत्त्वावर', 'तेथे जे आहे' आणि 'कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर'** आयोजित करण्यात येईल आणि "ऑफलाईन" करण्यात येईल.
२. "**श्री. निवृत्ती लक्ष्मण कोळी आणि सौ. शलाका निवृत्ती कोळी यांच्या नावे असलेले घर क्र. २०९४, गाव गव्हाण तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ८४१ चौ.फू.** या स्थावर मालमत्तेच्या खरेदीकरिता प्रस्ताव" असे उपरोल्लेखित केलेल्या मोहोरबंद पाकिटामधून प्रस्ताव सादर करावयास हवा आणि संभाव्य बोलीदारांनी सदर प्रस्तावाचे मोहोरबंद पाकिट खाली उल्लेखिलेल्या ठिकाणी **दि. ३ जुलै, २०२६ रोजी सायं. ५.०० वाजता** किंवा त्यापूर्वी आणावा/पाठवावा आणि ईएमडी रक्कम दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय असलेल्या डिमाण्ड ड्राफ्टद्वारे भरावी.
३. निम्नस्वाक्षरीकारांना अशा पद्धतीने प्राप्त झालेले प्रस्ताव **दि. ७ जुलै, २०२६** रोजी उपरोल्लेखित ठिकाणी **दु. ०३.०० वाजता** उघडण्यात आणि विचारात घेण्यात येतील.
४. निम्नस्वाक्षरीकार यांनी कोणताही प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे आणि/लिलाव सुधारित ते रद्द करण्याचे आणि/ किंवा पुढे ढकलण्याचे त्यांचे अधिकार राखून ठेवले आहेत.
५. लिलाव विक्री सरफैसी कायदा/नियमन २००२ मध्ये विहीत शर्ती आणि त्याअंतर्गत/वेबसाईटमध्ये उल्लेखित अटी आणि शर्तींच्या, तसेच इच्छुक/सहभागी होणाऱ्या बोलीदारांद्वारे सादर करावयाच्या प्रस्ताव/बोली दस्तावेजांमधील शर्तींच्या अधीन आहे.
६. उपरोल्लेखित मालमत्ता वर उल्लेखिलेल्या राखीव किंमतीच्या खाली विक्री करण्यात येणार नाहीत.
७. यशस्वी बोलीदार/रांच्या बाबतीत सदर ठेव/वी समायोजित करण्यात येतील, अन्यथा परत करण्यात येतील. सदर इसारा रक्कम अनामत/तींवर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही.
८. जर यशस्वी बोलीदार भरणा करण्यास अयशस्वी ठरल्यास किंवा मोहोरबंद निविदा/लिलावाच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यास कशाही प्रकारे अयशस्वी ठरल्यास, याआधीच जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि जप्त केलेल्या रकमेवर त्याचा/तिचा कोणताही दावा नसेल.
९. उपरोल्लेखित इसारा रक्कम अनामत (ईएमडी) सह प्रस्ताव मुंबई येथे देय दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय डीडी/पे ऑर्डरद्वारे **दि. ३ जुलै, २०२६ रोजी** किंवा त्यापूर्वी पॅन कार्ड आणि (आधार कार्ड) पत्त्याचा पुरावा समाविष्ट असलेल्या केवायसी दस्तऐवजांच्या स्कॅन केलेल्या प्रतींसह सेवा प्रदात्यास सादर करावी.
१०. निविदा उघडल्यानंतर, इच्छुक बोलीदार ज्यांनी राखीव किंमतीच्या खाली नसलेल्या त्यांच्या बोली सादर केल्या आहेत त्यांना प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीमध्ये बोली रक्कम वाढविण्याची संधी देण्यात येईल.
११. किमान बोली विस्तार रक्कम **रु. १०,०००/- (रुपये दहा हजार)** आहे.
१२. यशस्वी बोलीदार/रांनी विक्रीच्या संदर्भात प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे प्रस्ताव स्वीकारल्यानंतर लगेचच, याआधीच भरलेली ईएमडी समायोजित करून, विक्री किंमतीच्या रकमेची २५% जमा करावी, असे न केल्यास जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल. शिल्लक विक्री किंमतीच्या ७५% रक्कम प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीमध्ये विक्रीच्या मंजुरीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत देय आहे. जर विहीत कालावधीमध्ये शिल्लक रक्कम जमा करण्यात न आल्यास, जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल. प्राधिकृत अधिकाऱ्याने यशस्वी बोलीदारास जप्तीची पुढील सूचना देणे आवश्यक नाही.
१३. बोलीदार "कॅव्हेट एम्प्टर" (खरेदीदार सावधान) या तत्त्वाने बांधील आहेत आणि फर्म किंवा सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही भार, वैधानिक दायित्वे, मालमत्ता कराची थकबाकी, आयकर, उत्पादन शुल्क, कामगार देणी, वीज आणि देखभाल देणी इत्यादी शोधण्यासाठी त्यांची योग्य ती तपासणी करण्याचा सल्ला दिला जात आहे. यशस्वी बोलीदारांनी सर्व जावके म्हणजेच महापालिका कर, देखभाल/संस्था शुल्क, वीज शुल्क, पाणी शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क (जर लागू असल्यास), जर असल्यास आणि संबंधित मालमत्तांशी संबंधित विक्री किंमतीव्यतिरिक्त सर्व जावके समाविष्ट असलेले इतर प्रासंगिक शुल्क, खर्च भरावयाचे आहेत.
१४. यशस्वी बोलीदारांनी विक्री प्रमाणपत्रावर देय नोंदणीकरण शुल्क, मुद्रांक शुल्क, कर, तारण मालमत्ता त्याच्या/तिच्या नावे हस्तांतरित करून घेण्याकरिता कोणतेही अन्य शुल्क यांसारखे प्रभार/शुल्क भरावयाचे आहेत.
१५. विक्री प्रमाणपत्र फक्त यशस्वी बोलीदाराच्या नावेच आणि फक्त संपूर्ण/विक्री किंमत प्राप्त झाल्यानंतरच पारित करण्यात येईल.
१६. कर्जदार, गहाणवटदार आणि जामीनदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, ते लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्तींनुसार, वरील उल्लेखित मालमत्ता खरेदीकरिता इच्छुक खरेदीदार/ग्राहक सोबत आणू शकतात.
१७. वरील सदर मालमत्तांची पाहणी पूर्व परवानगीवर आधारीत आणि प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सोयीनुसार देण्यात येईल.
१८. प्राधिकृत अधिकारी उच्चतम प्रस्ताव किंवा आणि सर्व प्रस्ताव स्वीकारण्यास बांधिल नाहीत आणि कोणतेही कारण न दर्शविता कोणतीही किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे हक्क राखून ठेवीत आहेत.
१९. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. वरील उल्लेखित मालमत्तांवर प्रलंबित असलेल्या कोणत्याही दायित्वांकरिता जबाबदार नाही. मालमत्तेचा **'जसे आहे जेथे आहे' आणि 'जसे आहे जे आहे', 'तेथे जे आहे'** आणि **'कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर'** लिलाव करण्यात येईल.
२०. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि, कोणतेही कारण न दर्शविता किंवा पूर्व सूचनेशिवाय निविदा विक्री/लिलाव रद्द करण्याचा/स्वीकारण्याचा/फेटाळण्याचा/बदलण्याचा/सुधारणा करण्याचा/पुढे ढकलण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत.
२१. प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, मालमत्तेवर कोणताही भार अस्तित्वात नाही. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.स विक्री अंतर्गत असलेल्या मालमत्तेच्या संदर्भातील कोणताही प्रभार, धारणाधिकार किंवा भार, मालमत्ता कर, किंवा शासन किंवा अन्य कोणाचीही अन्य कोणतीही देणी याकरिता जबाबदार धरता येणार नाही.
२२. विक्री दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.च्या मंजुरीच्या अधीन आहे.

**ठिकाणः पनवेल, जि. रायगड**
**दिनांकः २०.०६.२०२६**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.**

# रस्ता बंद झाल्याने वडगाव अडचणीत

| माणगाव | प्रतिनिधी |

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामामुळे वडगाव गावाकडे जाणारा प्रमुख संपर्क रस्ता बंद झाल्याने संपूर्ण गावच जणू अडचणीत सापडले आहे. विकासाच्या नावाखाली गावकऱ्यांच्या दैनंदिन जीवनाची मोठी फरपट होत असून, पावसाळा तोंडावर असताना नागरिकांच्या अडचणी दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे हा मार्ग तातडीने वाहतुकीसाठी खुला करावा, अशी तीव्र मागणी वडगाव ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.




याबाबत वडगाव ग्रामपंचायतीने संबंधित विभागांना लेखी निवेदन देऊन नागरिकांच्या समस्या मांडल्या आहेत. या मागणीची गंभीर दखल घेत मंत्री भरत गोगावले, प्रांताधिकारी, गोरेगाव पोलीस ठाणे, तसेच साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक वडघर आणि रेपोली येथील शासकीय कृषी रोपवाटिकेनेही हा रस्ता तातडीने सुरू करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

वडगाव हे सामाजिक, ऐतिहासिक आणि शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचे गाव मानले जाते. गावातील विद्यार्थी, महिला, शेतकरी, कामगार, नोकरदार वर्ग आणि ज्येष्ठ नागरिक दररोज या मार्गाचा वापर करतात. मात्र, महामार्गाच्या कामादरम्यान गावाच्या मुख्य प्रवेशमार्गाकडे दुर्लक्ष झाल्याने नागरिकांना मोठा वळसा घालून प्रवास करावा लागत आहे. यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा अतिरिक्त भार नागरिकांवर पडत आहे.

त्यामुळे हा प्रश्न केवळ वडगाव गावाचा नसून संपूर्ण परिसराच्या विकासाशी आणि जनजीवनाशी निगडित असल्याचे स्पष्ट होत आहे.

ग्रामस्थांनी प्रशासनाला स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, विकासकामांना कोणाचाही विरोध नाही; मात्र विकासाच्या नावाखाली नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष होणे अस्वीकार्य आहे. महामार्गाचे काम करताना स्थानिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे ही संबंधित यंत्रणांची जबाबदारी आहे.

महामार्ग विकासाच्या नावाखाली गावकऱ्यांच्या रोजच्या आयुष्याचा बळी का दिला जात आहे? विद्यार्थ्यांचे शिक्षण, रुग्णांचे आरोग्य, शेतकऱ्यांचा रोजगार आणि नागरिकांची सुरक्षितता यापेक्षा कोणतेही काम मोठे असू शकत नाही. पावसाळ्यापूर्वी हा रस्ता खुला झाला नाही, तर हजारो नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागेल. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून न्याय द्यावा, अशी संतप्त भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

सध्या वडगावकरांची नजर प्रशासनाच्या निर्णयाकडे लागली असून, विकासाच्या गोंधळात अडकलेल्या या गावाला दिलासा देण्यासाठी संबंधित विभागाने तातडीने पावले उचलावीत, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

**शेतकऱ्यांचे हाल**

रस्ता बंद झाल्याचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांना आणि रुग्णांना बसत आहे. शाळा आणि महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना दररोज अतिरिक्त अंतर कापावे लागत आहे. तर आजारी रुग्णांना वेळेत दवाखान्यात पोहोचणे कठीण बनले आहे. एखाद्या आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका वेळेत पोहोचेल की नाही, याची भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

शेतकरी आणि मजूर वर्गालाही मोठा फटका बसत आहे. शेतमाल वाहतूक, शेतीची कामे आणि दैनंदिन रोजगारासाठी नागरिकांना मोठा वळसा घालावा लागत असल्याने आर्थिक नुकसानही सहन करावे लागत आहे. काही नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करताना उन्हात, पावसात आणि अंधारात जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## कृषी रोपवाटिकेलाही फटका

रेपोली येथील साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाला भेट देणारे पर्यटक तसेच शासकीय कृषी रोपवाटिकेकडे ये–जा करणारे शेतकरी आणि वाहने मोठ्या प्रमाणात या मार्गाचा वापर करतात. रस्ता बंद झाल्यामुळे या दोन्ही महत्त्वाच्या संस्थांपर्यंत पोहोचण्यातही अडचणी निर्माण झाल्या आहेत.

## वाहतूकीचा महत्त्वाचा मार्ग

माणगाव आणि गोरेगाव पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, मुंबई–गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी निर्माण झाल्यास वाहने वडगाव, वडघर, कुरवडे आणि गोरेगावमार्गे म्हसळा, श्रीवर्धन, माणगाव व महाडकडे वळवली जातात. त्यामुळे हा मार्ग केवळ गावापुरता मर्यादित नसून संपूर्ण परिसरातील वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा पर्यायी मार्ग आहे.

# ढाकीचा माळ येथे पोहचले पाणी



| नेरळ | प्रतिनिधी |

नेरळ ग्रामपंचायतीमधील कोंबलवाडीमधील ढाकीचा माळ येथे असलेली आदिवासी ग्रामस्थांना नेरळ ग्रामपंचायत स्थापन झाल्यापासून एकदाही नळाचे पाणी पोहचले नव्हते. या आदिवासी ग्रामस्थांनी १७ जून रोजी नेरळ ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेत मोर्चा आणला होता. त्यावेळी जिल्हा परिषद सदस्य आणि ग्रामपंचायत सदस्यांनी आठ दिवसांत जलवाहिनी टाकून पाणी पोहचवले जाईल असे आश्वासन ग्रामसभेत दिले होते.

दरम्यान, त्या आश्वासनानंतर तिसऱ्याच दिवशी नेरळ ग्रामपंचायतीने आपला शब्द पाळला आणि तीन दिवसात नेरळ ग्रामपंचायतीच्या पाणी पुरवठा विभागाने कोंबलवाडी ते ढाकीचा माळ अशी १२०० मीटर लांबीची जलवाहिनी टाकून पाणी पोहचवले. या जलवाहिनीला सार्वजनिक स्टँड पोस्ट तयार करून घेण्यात आले. त्यानंतर शुक्रवारी सकाळी ढाकीचा माळ येथे नळाचे पाणी पोहचले. ही आदिवासी वाडी निर्माण झाल्यानंतर पहिल्यांदा ढाकीचा माळ येथे नळाचे पाणी पोहचले असल्याने येथील रहिवाशी यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

यावेळी सुनीता मोरे, भगवान चंचे यांचे हस्ते श्रीफळ वाढवून नळाने पाणी पुरवठा सुरू केला. प्रसंगी ग्रामपंचायत प्रशासक सुजित धनगर,अरुण कार्ले, बंडू क्षीरसागर, प्रथमेश मोरे, नितीन निरगुडा तसेच अनेक कार्यकर्ते आणि स्थानिक आदिवासी उपस्थित होते.

## निवडक



### शेकापतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**खांदा कॉलनी :** शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने माजी आ. विवेक पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचा भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमात रायगड व पनवेल परिसरातील सुमारे एक हजार गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी प्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. माजी आ. बाळाराम पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, शेकाप गेल्या ३६ वर्षांपासून गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराची परंपरा जपत असल्याचे सांगितले. तसेच शिक्षणासाठी कोणत्याही विद्यार्थ्याला अडचण आल्यास शेकाप सर्वतोपरी मदत करेल, अशी ग्वाहीही त्यांनी याप्रसंगी दिली. माजी विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास नगरसेवक प्रकाश म्हात्रे, केतन भगत, महिला नगरसेविका, शेकाप नेते काशिनाथ पाटील तसेच पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वसंत ठाकूर यांचे निधन

**कर्जत :** कर्जत शहरात राहणारे वांजळे गावचे ज्येष्ठ पत्रकार



वसंत कृष्णा ठाकूर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. निधन समयी ते ७१ वर्षांचे होते. त्यांच्या अंत्ययात्रेस पंचक्रोशीतील नागरिक, नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक पुत्र, एक कन्या असा परिवार आहे.

### विशेष मतदार यादी पुनरावलोकन मोहीम

**पनवेल :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल मतदार यादी पुनरावलोकन (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत पनवेल तालुक्यात दि.३० जूनपासून व्यापक मोहीम राबविण्यात येणार आहे. मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्याच्या उद्देशाने ही प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेसाठी फडके नाट्यगृहात अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक पार पडली. यावेळी मतदार नोंदणी अधिकारी पवन चांडक, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तसेच महापालिका, महसूल व निवडणूक विभागातील अधिकारी उपस्थित होते. या मोहिमेंतर्गत दि.३० जून ते २९ जुलै या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी जाऊन मतदारांची माहिती पडताळणार आहेत. नाव, पत्ता, छायाचित्र किंवा इतर तपशीलांमध्ये आवश्यक बदल नोंदविण्याची सुविधा नागरिकांना उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच मृत, स्थलांतरित किंवा डुप्लिकेट मतदारांची नोंद तपासून आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे. या प्रक्रियेनंतर ऑगस्ट २०२६ मध्ये प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर नागरिकांना दावे व हरकती नोंदविण्याची संधी दिली जाईल. सर्व दावे व हरकतींची छाननी पूर्ण झाल्यानंतर अंतिम मतदार यादी ऑक्टोबर २०२६ मध्ये प्रकाशित केली जाणार असल्याची माहिती मतदार नोंदणी अधिकारी पवन चांडक यांनी दिली.



### म्हसळा पोलीस कर्मचाऱ्यांचा सन्मान

**म्हसळा :** पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. गुन्ह्यांची तत्परतेने उकल, कायदा व सुव्यवस्था राखणे, विविध गुन्ह्यांचा यशस्वी तपास केल्याच्या उल्लेखनीय कामगिरी म्हसळा पोलिसांनी केली होती. या कामगिरीची दखल जिल्हा पोलीस प्रशासनाने पोलीस दलाच्या कर्तव्यदक्षतेचे कौतुक करत जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी म्हसळा पोलिसांनी भविष्यातही अशाच प्रकारे प्रामाणिकपणे व तत्परतेने सेवा बजावावी अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे, उपपोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर एडवळे, अक्षय पुरी, विवेक ठाकरे, सागर चितारे आदी अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या गौरवामुळे म्हसळा पोलीस दलाचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

# वावोशीत के.टी.एस.पी मंडळाची शाळा सुरू




| खोपोली | प्रतिनिधी |

ग्रामीण भागतील पालक आपल्या मुलांना खोपोलीतील शिशू मंदीर शाळेत प्रवेश घेण्यासाठी धडपड करतात. शाळेत प्रवेश मिळाल्यावर स्कूल बसचे भाडे परवडत नाही किंवा स्कूल बसची सुविधा नसल्याने अनेक पालकांना पाल्यांना शाळेत सोडण्यासाठी एक व्यक्तीची व्यवस्था करावी लागते. ही पालकांची मोठी आडचण लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी म्हणूनच वावोशी गावात के. टी. एस. पी मंडळाची शिशु मंदीर इंग्लिश शाळा सुरू करीत आहोत. यामागे केटीएसपी मंडळाचा आर्थिक फायदा होईल असा कुठलाही विचार मनामध्ये नाही. त्यामुळे वावोशी येथे सरू केलेल्या शाळेत पाल्यांना प्रवेश घ्या, ही शाळा खोपोलीच्या शिशू मंदीर शाळेसारखी करू असा विश्वास संस्थेचे कार्यवाह किशोर पाटील यांनी बुधवारी (दि.१६) जून रोजी शाळेचे उद्घाटन प्रसंगी केले.

> **खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ मोठी संस्था आहे. शिशु मंदीर रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठी शाळा असून इयत्ता १० वीचा निकाल १०० टक्के लागतो. संस्थेत केजी ते पीएचडी पर्यत शिक्षण दिले जात आहे.**
> **–सुनिता चव्हाण**
> **शिशूमंदीर शाळा खोपोली मुख्याध्यापिका**

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, उपाध्यक्ष अबूशेठ जळगावकर, कार्यवाह किशोर पाटील, वावोशी ग्रामपंचायतीचे सरपंच सागर हाडप, शिशु मंदीर इंग्लिश शाळेचे अध्यक्ष विजय चुरी, जितेंद्र रावळ, शांताराम पाटील, जयंत पाठक, सुनिता चव्हाण, सोनाली जाधव, भालचंद्र पाटील, चंद्रकांत पाटील यांच्यासह वावोशी छत्तीशी विभागातील ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



● अलिबाग नगरपरिषदेच्या प्रभारी नगराध्यक्षा म्हणून ॲड. मानसी म्हात्रे यांच्याकडे पदभार सोपविण्यात आला. याबाबत शेतकरी भवनमधील सभागृहात झालेल्या तालुका चिटणीस मंडळाच्या बैठकीमध्ये ॲड. मानसी म्हात्रे यांचा तालुका चिटणीस सुरेश घरत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# बोरघाटात पाच टनांचा दगड रत्यावर

| खोपोली | प्रतिनिधी |

यशवंतराव चव्हाण मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गाच्या मुंबई लेनवरील आयओडीशी बोगद्याजवळ सुमारे ५० फुट उंचीवर सुमारे ५ टन वजनाचा मोठा दगड संरक्षण जाळीत अडकून राहिल्याचे निदर्शनास आले होते. पावसाळ्याच्या तोंडावर हा दगड खाली कोसळल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता लक्षात घेऊन महामार्ग पोलीस केंद्र बोरघाटचे प्रभारी अधिकारी स्वप्नील पाटील यांनी तातडीने परिस्थितीची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली. त्यानंतर पोलीस अधीक्षक तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, आयआरबी, वाहतूक विभाग आणि संबंधित तांत्रिक यंत्रणांशी समन्वय साधून मदतकार्य हाती घेतले.

यासंदर्भात अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) प्रविण सांखळे यांनी आदेश जारी करून, गुरूवारी (दि.१८) दुपारी १२ ते २ या वेळेत संबंधित भागातील वाहतूक नियंत्रित करण्याचे निर्देश दिले.


यावेळी पोलीस अधीक्षक तिरुपती काकडे, पोलीस उपअधीक्षक पुष्पलता दिघे–मंडव, पोलीस निरीक्षक भरत शेंडगे, प्रभारी अधिकारी स्वप्नील पाटील यांच्यासह महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे, खंडाळा आणि वडगाव येथील अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी उपस्थित होते.

# पारंपरिक जलस्रोत संवर्धनाची गरज

## लांबलेल्या पावसामुळे पाणीटंचाईची भीती

| बोर्लीपंचतन | प्रतिनिधी |

यंदा पावसाचे आगमन लांबल्याने अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता दिसत आहे. वाढत्या उन्हामुळे विहिरी, बोअरवेल आणि इतर जलस्रोतांवर ताण वाढत असून भूजल पातळीही कमी होत चालली आहे. अशा परिस्थितीत भविष्यातील पाणीटंचाई आणि दुष्काळाच्या झळा कमी करण्यासाठी गावातील सार्वजनिक जुन्या विहिरी आणि तलावांचे जतन व संवर्धन करणे गरजेचे झाले आहे. कधीकाळी गावाच्या पाणीपुरवठ्याचा मुख्य आधार असलेल्या या जुन्या विहिरी आणि तलावांकडे आज दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. अनेक विहिरींमध्ये गाळ साचला आहे, काही ठिकाणी अतिक्रमण झाले आहे तर काही विहिरी पूर्णपणे बुजवून टाकण्यात आल्या आहेत. अनेक जुने तलावही देखभाली अभावी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.



एकेकाळी गावाची तहान भागवणारे आणि शेतीला आधार देणारे हे जलस्रोत आज उपेक्षित झाले आहेत. गावातील जुने तलाव हे केवळ पाणी साठवण्याचे ठिकाण नसून पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजल वाढवण्याचे महत्त्वाचे साधन आहेत. विहिरी आणि तलावांचे पुनरुज्जीवन केल्यास भूजल पातळी वाढण्यास मदत होऊ शकते आणि उन्हाळ्यातही पाण्याची उपलब्धता टिकून राहू शकते. यंदा पाऊस लांबल्याने विहिरी, बोअरवेल आणि इतर जलस्रोतांवरील भिस्त वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे या जुन्या जलस्रोतांचे महत्त्व पुन्हा एकदा जाणवू लागले आहे. दिवसेंदिवस सरासरी पावसातील घट, वाढत्या उष्णतेमुळे पाण्याचे वेगाने होणारे बाष्पीभवन आणि बदलते हवामानाचा विचार करता प्रत्येक गावातील दुर्लक्षित जुन्या सार्वजनिक विहिरी आणि तलावांची स्वच्छता, गाळ काढणे, पावसाचे पाणी अडवणे आणि अतिक्रमण हटविण्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. भविष्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झालीच तर आज दुर्लक्षित असलेल्या याच जुन्या विहिरी आणि तलाव गावकऱ्यांची तहान भागवण्यासाठी महत्त्वाचा आधार ठरू शकतात. त्यामुळे या पारंपारिक जलस्रोतांचे जतन करणे ही केवळ पर्यावरणाची गरज नसून गावाच्या भविष्यातील जलसुरक्षेची जबाबदारी आहे. ग्रामपंचायत, स्थानिक प्रशासन आणि ग्रामस्थांनी एकत्र येऊन विहिरी व तलाव वाचवण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. आज जपलेली प्रत्येक विहीर आणि प्रत्येक तलाव उद्याच्या पिढीसाठी पाण्याचा भक्कम आधार ठरू शकतो.

# तळा धरणातील गाळ काढण्याची मागणी



| तळा | प्रतिनिधी |

तळा शहरातील तहसील कार्यालयाजवळ असलेल्या धरणाची पाणी पातळी अतिशय खालावली असून या धरणातील गाल काढण्याची आवश्यकता असल्याचे मत जाणकारांकडून व्यक्त केले जात आहे. याच धरणा शेजारी नगरपंचायतीच्या मालकीची जागा असून या ठिकाणी मारण्यात आलेल्या बोरवेलमधून अर्ध्या शहराला पाणीपुरवठा केला जातो. मात्र, यावर्षी पावसाने दडी मारल्याने या धरणाचे पाणी आटले आहे. परिणामी येथील बोरवेलचे पाणी देखील गढूळ स्वरूपात येत आहे. त्यामुळे सध्या ही लाईन बंद ठेवण्यात आली असून संपूर्ण शहराला आंबेळी लाईनवरून पाणी पुरवठा केला जात आहे. मात्र, गेल्या कित्येक वर्षांपासून या धरणातील गाळ काढला नसल्याने धरण मातीने भरले जाऊन धरणात मातीचे साम्राज्य पसरले आहे. परिणामी पाण्याची साठवणूक होत नसल्याने धरणातील पाणी साठा कमी कमी होत जात आहे. सध्या पावसाचे आगमन लांबणीवर गेल्याने संबंधित प्रशासनाने धरणातील गाळ काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केल्यास धरणाची खोली वाढून धरणात जास्त प्रमाणात पाण्याची साठवणूक होईल व धरणात मुबलक प्रमाणात पाणी शिल्लक राहिल्याने पाणी टंचाईवर मात करता येईल असे बोलले जात आहे. प्रशासनाने धरणातील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात करावी अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# माथेरानकरांवर पाण्याचे संकट

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान शहरात ब्रिटिशांनी बांधलेले शार्लोट लेक तलावाने तळ गाठला आहे. तलावातील पाणी दहा फुटाच्या खाली गेले असून तलावात पाण्याच्या सोबत माती अधिक प्रमाणात साठलेली आहे. त्यामुळे माथेरानवर पाणी संकट आले आहे असून पाणी जपून वापरण्याचे आवाहन नगरपरिषदेकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, माथेरान शहरासाठी उल्हास नदीवरून उचलले जाणारे पाणी हे जास्तवेळ उचलावे लागणार असून सतत खंडित होणारा वीज पुरवठा माथेरानकर यांच्या तोंडचे पाणी पळवून नेण्याची शक्यता आहे.

माथेरान या थंड हवेचे ठिकाणी तेथील लोकांचे पिण्याचे पाण्याचे सोयीसाठी शार्लोट लेक तलाव बांधला. या तलावाच्या पाण्यावर पूर्वी माथेरानमधील जनजीवन सुरळीत चालत होते. पुढे ही थंड हवेचे ठिकाण पर्यटन स्थळ झाले आणि माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांची संख्या लाखात पोहचली. त्यामुळे शार्लोट लेक तलाव कमी पडू लागला.पुढे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून नेरळ जवळील कुंभे येथून उल्हास नदीमधून पाण्याचा उपसा केला जातो आणि ८०० मीटर उंचीवर असलेल्या माथेरानमध्ये पोहचवला जाते.

मात्र, सतत वीज पुरवठा खंडित होत असल्याने माथेरानमध्ये उल्हास नदीचे पाणी वेळेवर पोहचत नाही.

**■ शार्लोट लेकमध्ये दहा फुटाच्या खाली पाणी**

त्यात यावर्षी जास्त वेळ शार्लोट लेक मधून पाणी उचलले गेले असून शार्लोट लेकने तळ गाठला आहे. शार्लोट लेकमध्ये असलेल्या पाण्याची स्थिती माथेरान शहरावर पाण्याचे संकट आले असल्याची जाणीव करून देणारे आहे.



तलावात जेमतेम दहा फूट पेक्षा कमी पाणी साठा असून तलावात पाण्याबरोबर माती जास्त असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे शार्लोट लेकमधील पाणी हे डेड वॉटर समजले जात आहे. त्यामुळे तलावात असलेल्या पाण्याचा कोणताही फायदा माथेरानमधील पाणी ग्राहकांना सध्यातरी नाही. त्यामुळे माथेरानमधील शार्लोट लेक सध्या पाण्यासाठी नाही हे स्पष्ट होत असून माथेरान शहरातील नागरिकांचे डोळे या निमित्ताने पावसाकडे लागले आहेत.

सध्या पावसाची कोणतीही लक्षणे नाहीत आणि त्यामुळे तलावात असलेले गाळ, माती आणि दगड काढण्याची मोठी संधी नगरपरिषदेला मिळून आली आहे. त्यात केंद्र सरकारच्या अमृत योजनेतून तलावातील गाळ काढण्याचे काम मंजूर आहे, ते काम ठेकेदाराने केले नाही हे तलावातील माती गाळ पाहून दिसून येत आहे.

यावर्षी पावसाला लांबला असल्याने नगरपरिषदेने ठेकेदाराला गाळ काढण्याची कामे सुरू करण्यास सांगावे अशी मागणी नागरिक करीत आहेत.

# खासदारांना बाटवले

जिच्यावर नजर पडेल ती बाई आपल्या वाड्यावर घेऊन येणे हे १९७० च्या दशकातल्या मराठी सिनेमांमधल्या सरपंच, पाटील इत्यादींना मोठे भूषण वाटे. प्रत्यक्षात हे एक गुंड प्रवृत्तीचे लक्षण होते व प्रेक्षक त्यांना शिव्यांची लाखोली वाहत. त्यांच्या या खलनायकीला तीन तासांच्या अखेरीस चांगली सजा मिळत असे. अनेकदा हे खलनायक मारले जात किंवा तुरुंगात जात. आज २०२६ साली, शिवसेना, राष्ट्रवादी इत्यादींमधील आमदार व खासदारांवर मनात येईल तेव्हा हात टाकण्याची कारवाई भाजप आणि त्यांच्या मित्र पक्षांना मोठी मर्दुमकी वाटते. अशा कारवायांना ऑपरेशन टायगर वगैरे नावे दिली जातात. या गोष्टी जणू अत्यंत पवित्र असल्याप्रमाणे त्यांचे मुहूर्त काढले जातात. ते कधी हुकले तर या मर्दुमकीवाल्यांचे मिडियातले झिलकरी दुसऱ्या पक्षातल्यांना बाटवण्याचा मुहूर्त हुकला असे म्हणून हळहळ व्यक्त करतात. या सर्वांमागे डोके लावणाऱ्यांना थेट नवे आर्य चाणक्यच म्हटले जाते. २०२२ मध्ये उध्दव ठाकरे यांचे सरकार फोडून आणि पाडून एकनाथ शिंदे यांनी भाजपचा हात धरल्यापासून कोणालाही कोणत्याही क्षणी वाड्यावर घेऊन येण्याच्या मुंबई व दिल्लीतील चाणक्यांचा आत्मविश्वास कमालीचा वाढला आहे. २०२४ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत त्याचे दर्शन घडले होते. आता त्याचा पुढचा अध्याय नुकताच सादर झाला. ठाकरे गटातील सहा खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन केला असून लवकरच तो गट शिंदे यांच्या शिवसेनेत विलीन होईल. सेनेतील आमदार व खासदारांना फोडण्याचे पाप थेट आपल्या डोक्यावर नको म्हणून भाजपवाल्यांनी शिंदे यांच्या गटाला मध्यस्थी ठेवले आहे. त्यातूनच एकनाथ शिंदे यांचे महत्व विनाकारण वाढून बसले आहे. या स्थितीचा शिंदे यांनी वेळोवेळी अचूक फायदा उचलला असून आताही आपली ताकद वाढवून घेतली आहे. २०२४ मध्ये शिंदे यांचे सात खासदार निवडून आले होते. आता त्यांची संख्या १३ होईल. त्यावेळी तेलुगू देसमला १६ आणि नीतीश यांना १२ अशा जागा होत्या व त्यांच्या जिवावरच नरेंद्र मोदींचे बहुमत टिकले होते. आता शिंदे गट नीतीश यांच्या पुढे गेला आहे.

## डिलिमिटेशन विधेयकासाठी

बंगालमधील निवडणुकांमध्ये तृणमूल काँग्रेसचा दारुण पराभव झाला. त्यानंतर तृणमूलचे २९ पैकी २० खासदार फुटले व त्यांनी भाजपप्रणीत एनडीएला आपला पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे एकाएकी, एनडीएमधील सत्तासमतोल बदलला आहे. तो आणखी बदलून तृणमूलच्या खासदारांनाच बरीच मंत्रिपदे मिळायच्या आत शिंदयांनी बाजी मारली असा या ताज्या फुटीचा अर्थ लावता येईल. पण ही बाजी मारण्यासाठी शिंद्यांना बराच काळ दिल्लीच्या हातापाया पडावे लागले असे दिसते. मध्यंतरीच्या काळात शिंदे यांनी अमित शाह यांच्या भेटीसाठी बरीच प्रतीक्षा केली. दिल्लीत जाऊनही भेट मिळेना अशी स्थिती होती. त्यामुळे ठाकरे सेनेवर शिंदे कधीही डल्ला मारू शकतात असे चित्र या फुटीमुळे निर्माण झाले असले तरी त्यामागचे वास्तव वेगळे आहे. अमित शाह यांनी हिरवा कंदील दाखवल्यावर हा डल्ला मारणे शक्य झाले आहे. याचाच अर्थ सेनेचे खासदार तर सोडाच, एकनाथ शिंदे यांच्यासारखे नेते हेही शाह वगैरेंच्या हातातली बाहुली आहेत आणि ते यांना कधीही नाचवू शकतात व कधीही फेकूनही देऊ शकतात. गेल्या अर्थसंकल्पी अधिवेशनामध्ये भाजपला महिला आरक्षणाच्या नावाखाली देशात डिलिमिटेशन म्हणजे मतदारसंघांची फेररचना करायची होती. त्यासाठी त्यांनी विशेष घटनादुरुस्ती विधेयक आणले. पण या फेररचनेमध्ये दक्षिणेच्या वाट्याला कमी तर उत्तर प्रदेश, बिहार इत्यादींच्या वाट्याला लोकसभेच्या जास्त जागा येणार आहेत. त्यामुळे पुढच्या काळात भाजपचे सर्व बहुमत हिंदी पट्ट्यातून येईल व त्याला दक्षिणेच्या राज्यांची गरज उरणार नाही. याच धोक्यामुळे हे विधेयक फेटाळले गेले. लोकसभेत भाजप पराभूत झाल्याची ही पहिलीच घटना होती. मोदी व शाह यांना याचा वचपा काढायचा असून येत्या पावसाळी अधिवेशनात हे विधेयक संमत करून दाखवायचे आहे. त्यासाठीच तृणमूल, शिवसेना, समाजवादी पक्ष, द्रमुक या सर्वांमध्ये फुटीची बीजे पेरण्याचे उपद्व्याप चालू आहेत.

## फुटीची संततधार

ठाकरे यांची सेना गेल्या फुटीपासून कायमच टांगत्या तलवारीखाली होती. शिंदे फुटल्यापासून राज्यभर नेते व कार्यकर्ते यांच्या फुटीची संततधार चालू आहे. शिंदे यांच्या बंडाबाबत असंख्य कायदेशीर प्रश्न होते. अशा बंडांनंतर आमदार किंवा खासदार मंडळी सभागृहापुरता वेगळा गट स्थापन करून राहत अशी आजवरची पध्दत होती. पण शिंदे यांच्या बंडामध्ये त्याच्या पुढचे पाऊल टाकले गेले. त्या फुटलेल्या आमदारांनी आमचा गट हाच मूळ पक्ष असा दावा केला. वास्तविक पक्षाचे अध्यक्ष, बाकीचे पदाधिकारी इत्यादी उध्दव ठाकरे यांच्यासोबत होते. पण ते गृहित न धरता, शिंदे यांच्या गटाला मान्यता दिली गेली व त्यालाच चिन्हही बहाल केले गेले. हे करताना निवडणूक आयोग, राज्यपाल, विधानसभा अध्यक्ष, सर्वोच्च न्यायालय या सर्वच स्तरांवर कायदा, न्याय, नीतीमत्ता यांचे धिंडवडे उडाले. चार वर्षे झाली तरी याबाबतच्या प्रकरणात निर्णय द्यायला सर्वोच्च न्यायालयाला वेळ झालेला नाही. पुढची फूट घडवायला जणू प्रोत्साहन मिळावे अशीच ही स्थिती आहे. नंतर २०२५ मध्येही नगरपालिका व महापालिका निवडणुकांमध्ये याचे प्रत्यंतर आले. २०२४ लोकसभा निवडणुकांमध्ये ईडी, सीबीआयच्या धाकाने विरोधकांमध्ये फोडाफोडी घडवत असल्याची जबरदस्त प्रतिक्रिया मतदारांमध्ये उमटली होती. मोदींच्या विजयी घोड्याला महाविकास आघाडीने लगाम घातला. आघाडीने ४८ पैकी ३१ जागा जिंकून मोदी सरकारला जमिनीवर आणले. पण आता त्याच लाटेत जिंकलेल्यांपैकी ठाकऱ्यांच्या सहा खासदारांनी निर्लज्जपणे भाजपचे पाय चाटण्याचे ठरवले आहे. फुटलेल्या खासदारांपैकी कोणीही यापूर्वी पक्षांतर्गत अन्यायाच्या काही तक्रारी केलेल्या नव्हत्या. आपल्याला निधी मिळत नाही असे त्यांचे म्हणणे होते असे त्यांच्या वतीने इतर लोक सांगत आहेत. आपल्या बंडाला नैतिक निमित्त पुरवण्यासाठी उध्दव ठाकरे भेटत नव्हते वगैरे सबबीही त्यांच्या वतीने भाजपचे गिरीश महाजन इत्यादी लोक पुढे करत आहेत. ठाकरे सेनेच्या बंडखोरांचे दुखणे काय आहे भाजपच्या मंत्र्यांना माहिती आहे. असे असूनही हे बंडखोर थेट भाजपमध्ये न जाता शिंद्यांकडे जात आहेत असा हा लोकांना उल्लू समजणारा प्रकार आहे. गंमत म्हणजे उद्धव भेटत नाहीत असे सांगणारे लोक रविवारी उद्धव यांनी बोलावलेल्या बैठकीला प्रत्यक्ष हजर राहिले नाहीत किंवा राहिले तेव्हा त्यांनी साईबाबा, आई तुळजा भवानी, बाळासाहेब ठाकरे इत्यादींच्या शपथा घेऊन आपण फुटणार नाही अशी ग्वाही दिली होती. आणि त्याच लोकांनी चार दिवसात सरड्यासारखे रंग बदलले आहेत. संजय राऊत यांनी यामध्ये प्रत्येकी ५० कोटी रुपये देण्याचा वायदा झाल्याचे आरोप केले आहेत. त्यांचा या खासदारांनी किंवा त्यांच्या हँडलर्सनी अजून थेट इन्कार केलेला नाही हे उल्लेखनीय आहे. हे सर्व पाहता विरोधकांनी निवडणुका तरी कशाला लढवाव्यात आणि जनतेने मतदान तरी का करावे असा प्रश्न कोणालाही पडेल. भाजपच्या राजवटीत लोकशाहीचा हा तमाशा अधिकाधिक बीभत्स होत चालला आहे.

विचार

# निर्यात आणि तिकिट बुकिंग क्षमतेत वाढ!

***सध्या अमेरिका-इराण युद्धामुळे जगातील सर्वच देशांच्या अर्थव्यवस्थांची अवस्था बिकट असताना भारताने मुक्त व्यापार करारांमधून एक ट्रिलियन डॉलर निर्यातीचे लक्ष्य ठेवले आहे. दरम्यान तोटा कमी करण्यासाठी 'एअर इंडिया'कडून विस्तार योजनांना ब्रेक लागत असल्याची चर्चा आहे. दुसरीकडे, भारतीय रेल्वे ऑनलाईन तिकिट बुकिंग क्षमतेत वाढ करत असून लवकरच एका मिनिटात दीड लाख तिकीट बुक होऊ शकतील.***

महेश देशपांडे

सध्या अमेरिका-इराण युद्धामुळे जगातील सर्वच देशांच्या अर्थव्यवस्थांची अवस्था बिकट असताना भारताने मुक्त व्यापार करारांमधून एक ट्रिलियन डॉलर निर्यातीचे लक्ष्य ठेवले आहे. दरम्यान तोटा कमी करण्यासाठी 'एअर इंडिया' विस्तार योजनांना ब्रेक लावत असल्याची चर्चा आहे. दुसरीकडे, भारतीय रेल्वे ऑनलाईन तिकिट बुकिंग क्षमतेत वाढ करत असून लवकरच एका मिनिटात दीड लाख तिकीट बुक होऊ शकतील.

दीर्घकाळ संरक्षणवादी व्यापार धोरण अवलंबल्यानंतर भारताने आता जागतिक व्यापारात अधिक आक्रमक भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. मुक्त व्यापार करारांची (एफटीए) वाढती मालिका, 'चायना प्लस वन' या जागतिक धोरणाचा लाभ आणि उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन (पीएलआय) योजनेच्या जोरावर भारताने २०३० पर्यंत एक ट्रिलियन अमेरिकन डॉलरच्या वस्तू निर्यातीचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य निश्चित केले आहे. 'यस सिक्युरिटीज'च्या ताज्या अहवालानुसार, 'पीएलआय योजना', पायाभूत सुविधांवरील गुंतवणूक, स्थानिक पुरवठा साखळी मजबूत करण्याचे प्रयत्न आणि नव्या मुक्त व्यापार करारांमुळे भारतातील उत्पादन क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. यामुळे भारतीय उद्योगांसाठी परदेशी बाजारपेठा खुल्या होण्याबरोबरच खासगी क्षेत्रातील भांडवली गुंतवणुकीलाही वेग मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. अहवालानुसार, संयुक्त अरब अमिराती (यूएई), ऑस्ट्रेलिया, ब्रिटन, 'युरोपीयन फ्री ट्रेड असोसिएशन' (ईएफटीए), ओमान, न्यूझीलंड आणि युरोपीय महासंघ यांसारख्या देश व गटांसोबत करण्यात आलेले किंवा प्रस्तावित मुक्त व्यापार करार भारताच्या आर्थिक धोरणातील महत्त्वपूर्ण बदलाचे प्रतीक आहेत. 'यस सिक्युरिटीज इन्स्टिट्युशनल'चे प्रमुख हितेश जैन यांनी सांगितले, की भारत आता सावध संरक्षणवादापासून दूर जात जागतिक व्यापाराशी अधिक व्यापक स्वरूपात जोडला जात आहे. हे करार केवळ व्यापार वाढवण्यासाठी नसून, दीर्घकालीन औद्योगिक विकास आणि निर्यातवाढीचा पाया मजबूत करण्यासाठी आहेत.

अहवालात नमूद करण्यात आले आहे, की नव्या 'एफटीए' धोरणाला 'पीएलआय' योजना, औद्योगिक कॉरिडॉर, बंदरे, लॉजिस्टिक्स आणि स्थानिक पुरवठा साखळी मजबूत करण्याच्या उपक्रमांची जोड मिळत आहे. त्यामुळे भारतीय उत्पादन उद्योग अधिक स्पर्धात्मक होण्यास मदत होईल. इलेक्ट्रॉनिक्स, औषधनिर्मिती, अभियांत्रिकी आणि यंत्रसामग्री उत्पादन क्षेत्रांना या व्यापार करारांचा सर्वाधिक फायदा होण्याची शक्यता आहे. याशिवाय रत्न-आभूषण, वस्त्रोद्योग, परिधान, वाहन सुटे भाग आणि औषधनिर्मिती क्षेत्रासाठीही मोठ्या संधी निर्माण होणार असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. 'यस सिक्युरिटीज'चे सह-विश्लेषक हेमंत नाहटा यांनी सांगितले, की वाढते भूराजकीय तणाव, पुरवठा साखळीतील अडथळे आणि 'चायना प्लस वन' धोरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या चीनवरील अवलंबित्व कमी करत आहेत. अशा परिस्थितीत कुशल मनुष्यबळ, मोठी बाजारपेठ आणि उत्पादन क्षमता असलेला भारत पर्यायी केंद्र म्हणून वेगाने पुढे येत आहे. त्यांच्या मते, नवीन पिढीतील एफटीए हे केवळ आयात-निर्यातीपुरते मर्यादित नसून गुंतवणूक, तंत्रज्ञान हस्तांतरण, सेवा व्यापार, डिजिटल वाणिज्य, नियामक सहकार्य आणि धोरणात्मक भागीदारीलाही प्रोत्साहन देतात. अहवालानुसार, मुक्त व्यापार करारांमुळे भारतीय उद्योगांसाठी मोठ्या परदेशी बाजारपेठा खुल्या होतील. त्यामुळे कारखान्यांची उत्पादन क्षमता अधिक प्रमाणात वापरली जाईल, उत्पादन खर्च कमी होईल आणि नफ्यात वाढ होईल. यामुळे खासगी क्षेत्रातील भांडवली गुंतवणुकीला नवसंजीवनी मिळण्याची अपेक्षा आहे. सध्या भारतातील औद्योगिक उत्पादन क्षमतेचा वापर सरासरी ७५ टक्के इतका आहे. निर्यातवाढ झाल्यास हा वापर आणखी वाढेल आणि त्यातून नवीन गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि औद्योगिक विस्ताराला चालना मिळेल.

दरम्यान 'एअर इंडिया'ने आपल्या विस्तार योजनांचा वेग कमी करण्याची तयारी सुरू केल्याची माहिती समोर आली आहे. माध्यमांच्या वृत्तानुसार, कंपनीची मालकी असलेल्या टाटा समूहाने व्यवस्थापनाला सध्या आक्रमक विस्ताराऐवजी तोटा कमी करणे आणि विद्यमान कामकाज अधिक सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर नव्या विमानांच्या वितरणाला मुदतवाढ देणे, काही उड्डाणांमध्ये कपात करणे आणि नवीन मार्ग सुरू करण्याच्या योजनांचा फेरआढावा घेण्यात येत असल्याचे वृत्त आहे. वृत्तानुसार, 'एअर इंडिया एअरबस' आणि 'बोईंग' या विमान उत्पादक कंपन्यांशी यापूर्वी ऑर्डर दिलेल्या सुमारे पाचशे विमानांच्या वितरणाला पुढे ढकलण्यासाठी चर्चा करत आहे. यामुळे विमानांच्या डिलिव्हरीवेळी कराव्या लागणाऱ्या मोठ्या आर्थिक देयकांचा तात्पुरता भार कमी करण्यास कंपनीला मदत होऊ शकते. विमान उद्योगात विमानाच्या किमतीचा मोठा हिस्सा वितरणाच्या वेळी अदा करावा लागतो. त्यामुळे रोख प्रवाहावर मोठा ताण येत असल्याचे मानले जाते. 'एअर इंडिया' आपल्या देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय मार्गांचेही पुनर्मूल्यांकन करत आहे. कमी नफा देणारे काही मार्ग बंद करण्याचा विचार सुरू असून, नवीन मार्ग सुरू करण्याच्या योजना काही काळासाठी पुढे ढकलल्या जाऊ शकतात.

गेल्या वर्षभरात 'एअर इंडिया'ला अनेक अडचणींचा सामना करावा लागला आहे. मागील वर्षी झालेल्या विमान अपघातामुळे कंपनीच्या प्रतिमेला धक्का बसला. त्याचबरोबर पाकिस्तानने भारतीय विमानांसाठी आपली हवाई हद्द बंद केल्याने आणि इराणमधील संघर्षामुळे उड्डाणांच्या मार्गात बदल करावे लागले. लांब मार्गांचा वापर करावा लागत असल्याने इंधन खर्च वाढला असून, रुपयाच्या तुलनेत डॉलर मजबूत झाल्याने कंपनीच्या खर्चातही वाढ झाली आहे. एअरलाइनचे अनेक खर्च डॉलरमध्ये होत असल्याने त्याचा अतिरिक्त आर्थिक परिणाम होत आहे. 'टाटा समूहा'ने २०२२ मध्ये 'एअर इंडिया'चे अधिग्रहण केल्यानंतर कंपनीच्या आधुनिकीकरणासाठी आणि विस्तारासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली होती. २०२३ आणि २०२४ या कालावधीत 'एअर इंडिया एअरबस' आणि 'बोईंग'कडून सुमारे ६०० विमानांची ऑर्डर दिली होती; मात्र वृत्तानुसार २०२२ नंतर कंपनीला ५५ हजार कोटी रुपयांहून अधिक तोटा सहन करावा लागला आहे. त्यामुळे आता टाटा समूह विस्तार आणि आर्थिक शिस्त यामध्ये संतुलन राखत खर्चावर नियंत्रण आणि कंपनीची आर्थिक स्थिती मजबूत करण्यावर भर देत असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, 'एअर इंडिया'ने या वृत्तांचे खंडन केले आहे. कंपनी आपल्या विमान ताफ्याच्या आधुनिकीकरणासाठी आणि दीर्घकालीन परिवर्तनाच्या योजनेसाठी पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे 'एअर इंडिया'ने स्पष्ट केले आहे.

दुसरीकडे नव्या 'पॅसेंजर रिझर्व्हेशन सिस्टीम' मध्ये एका मिनिटात दीड लाख तिकीटे बुक केली जाऊ शकतील. सध्याच्या यंत्रणेनुसार 'पीआरएस'मध्ये एका मिनिटात ३२ हजार तिकीटे बुक होतात. तिकीट चौकशी क्षमतादेखील वाढवली जाणार असून एका मिनिटात ४० लाख तिकीट चौकशी क्षमता होईल. सध्या ती चार लाख इतकी आहे. दरम्यान, भारतीय रेल्वेकडून 'रेल वन मोबाईल ॲप्लिकेशन लाँच' करण्यात आले आहे. यामध्ये 'एआय'चा वापर करण्यात आला आहे. 'इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन' म्हणजेच 'आयआरसीटीसी'ची अपडेटेड वेबसाईट १५ जुलैपासून सुरू होईल. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबत घोषणा केली आहे. 'मालवीय नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी' जयपूर येथे विद्यार्थ्यांनी 'आयआरसीटीसी पोर्टल' संदर्भात तक्रार वैष्णव यांच्याकडे केली होती. जयपूर येथील विद्यार्थ्यांनी 'आयआरसीटीसी' वेबसाईटवरील कॅप्चा यंत्रणेतील त्रुटी निदर्शनास आणल्या होत्या. प्रवाशी कॅप्चा संदर्भात तक्रारी गेल्या अनेक वर्षांपासून करत आहेत. विद्यार्थ्यांची तक्रार मिळताच वैष्णव यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना बोलावून विद्यार्थ्यांच्या नव्या वेबसाईटच्या मागणी संदर्भात माहिती दिली. वैष्णव यांनी यानंतर 'आयआरसीटीसी'चा अपग्रेडेड प्लॅटफॉर्म ३० दिवसांमध्ये तयार होईल असे सांगितले तर नवी वेबसाईट १५ जुलै रोजी लाँच होईल, असे नमूद केले. त्यांचे म्हणणे खरे ठरते का, ते आता बघायचे.

'आयआरसीटीसी'च्या प्लॅटफॉर्मचा रेल्वे तिकीट बुकिंगसाठी वापर करणाऱ्या लाखो प्रवाशांना तिकिट बुकिंग करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. यामध्ये वेबसाईट स्लो होणे, ओटीपीशी संबंधित अडचणी तात्काळ बुकिंग वेळी येतात. वेबसाईटवरील ट्रॅफिक वाढले. सिस्टीम वर लोड येणे, यामुळे 'आयआरसीटीसी'च्या वेबसाईटच्या अपडेशनची मागणी केली जात होती. 'आयआरसीटीसी'ने २००२ मध्ये ऑनलाईन बुकिंग सुरू केले होते. आता जवळपास ८८ टक्के तिकीटे ऑनलाईन पद्धतीने बुक केली जातात. 'आयआरसीटीसी'ने गेल्या आठवड्यात तात्काळ तिकीट बुकिंग करण्यासाठी आधार प्रमाणीकरण बंधनकारक केले होते. 'आयआरसीटीसी'ने २०२५ मध्ये तीन कोटी खाती बंद केली होती, तर २.९४ कोटी खाती तात्पुरती निलंबित केली होती.

चर्चा आजची

# जलसंवर्धन करणे गरजेचे

अंतरा पारंगे

'एल निनो'मुळे पाऊस लांबला असून जून महिना अक्षरशः कोरडा गेला आहे. त्यामुळे पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांतील पाणीसाठ्यात घट झाली आहे. परिणामी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर बनत चालला आहे. अशा परिस्थितीत केवळ पावसाची वाट पाहून चालणार नाही. त्यासाठी उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन आणि संवर्धन करणे अतिशय आवश्यक आहे. आपण पावसाचे प्रमाण वाढवू शकत नाही, परंतु, पावसाचे पाणी अडवू शकतो, पाऊस जमिनीत मुरवू शकतो, भूजल साठे वाढवू शकतो आणि हाच जलसंधारणाचा मूलमंत्र आहे. आपल्या राज्याची अर्थव्यवस्था, ग्रामीण जीवन, उद्योग आणि पर्यावरण हे मोठ्या प्रमाणात पाण्यावर अवलंबून आहे. आगामी काळात पाणीटंचाईचे संकट अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जल सुरक्षा ही आज केवळ विकासाची नव्हे तर अस्तित्वाची गरज आहे.

एल निनोमुळे यावर्षी मान्सूनच्या पावसावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. परिणामी पावसाचे असमान वितरण होणे किंवा काही भागांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. पाणीपुरवठा करणारी अनेक धरणे आज पूर्ण क्षमतेने भरली नाहीत; तर भविष्यात पिण्याचे पाणी, शेती आणि उद्योगांसाठी आव्हाने निर्माण होऊ शकतात. यामुळे जलसंधारण ही काळाची गरज आहे.

पाऊस हा पाण्याचा मुख्य स्रोत आहे. साधारपणे जूनच्या पाहिल्या आठवड्यात पावसाला सुरुवात होते. मात्र जून महिन्यातील २० दिवस संपले तरी अद्याप एकही पावसाची सर बरसली नाही. प्रचंड उकाडा आणि पाणी टंचाई यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. तर अनेक ठिकाणी उष्माघाताने माणसांसह पशु-पक्षांचाही



बळी घेतला आहे. वाढती उष्णता आणि पावसाचा विलंब यामुळे पाणीसाठ्यात कमालीची घट झाली आहे. ग्रामीण भागातील विहिरी, कूपनलिका, तलाव, धरणे यांनी तळ गाठला आहे. हंडाभर पाण्यासाठी महिलांना उन्हातान्हात पायपीट करावी लागत आहे. अनेक गावांतील पारंपरिक जलस्रोत कोरडे पडल्याने टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. या टँकरमधून मिळणाऱ्या पाण्यासाठीही नागरिकांना तासन्तास वाट पाहावी लागत आहे.

ग्रामीण भागासह शहरी भागावर पाणी टंचाईचे संकट कायम आहे. जून महिन्याच्या अर्ध्यावरही पाणी साठ्यात वाढ न झाल्याने पाणीपुरवठा करण्याचे प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. त्यामुळे अनेक शहरी भागांत पाणी कपात सुरु आहे. काही भागांत एक दिवसाआड, तर काही भागांत आठवड्यातून एकदा पाणी पुरवले जात आहे. मात्र वाढती लोकसंख्या, अनेक ठिकाणी सुरु असलेली विकासकामे यांमुळे उपलब्ध पाणी साठ्यावर प्रचंड ताण येत आहे. आपल्या दैनंदिन जीवनात पाणी अतिशय महत्वाचे आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाकडून पाण्याची बचत करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

आज पाणी सहज उपलब्ध होत आहे याचा अर्थ भविष्यातही ते सहज उपलब्ध होईलच असे नाही. हवामान विभागाच्या म्हणण्यानुसार जर यावर्षी कमी पाऊस पडणार असेल तर आगामी काळात पाण्याची बचत करणे अनिवार्य झाले आहे. आज जर पाण्याची एवढी टंचाई निर्माण होत असेल आणि आज आपण पाणी नाही वाचवले तर भविष्यात गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यासाठी आतापासून पाणी संवर्धन करण्याची सुरुवात करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर नैसर्गिक जलस्रोतांचे संवर्धनही तितकेच महत्वाचे ठरणार आहे. जसे की, तलाव, धरणे, विहिरी यांमधील गाळ काढून त्यात जास्तीत जास्त पाणी साठवून ठेवता येईल. यातूनच भूजल पातळी वाढण्यास मदत होऊ शकते. या पाण्याचा वापर उन्हाळ्यात, पावसाळा सुरु होईपर्यंत केला जाऊ शकतो.

दिवसेंदिवस सरासरी पावसातील घट, वाढत्या उष्णतेमुळे पाण्याचे वेगाने होणारे बाष्पीभवन आणि बदलते हवामान याचा विचार करता प्रत्येक गावातील दुर्लक्षित जुन्या सार्वजनिक विहिरी आणि तलावांची स्वच्छता, गाळ काढणे, पावसाचे पाणी अडवणे आणि अतिक्रमण हटविण्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. कारण याच जुन्या विहिरी आणि तलाव गावकऱ्यांची तहान भागवण्यासाठी महत्त्वाचा आधार ठरू शकतात. आजचे भूजल संवर्धन उद्याच्या पिढीसाठी पाण्याचा भक्कम आधार ठरू शकतो.

एकीकडे वाढती लोकसंख्या आणि दुसरीकडे मोठ्या प्रमाणात होणार पाण्याचा अपव्यय यामुळे उपलब्ध जलसाठे दरवर्षी अपुरेच पडत आहेत. या काही दिवसात पाऊस झाला तरच नागरिकांना दिलासा मिळणार आहे. अन्यथा पाणीटंचाईचे संकट अधिक तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

लोकसंसद

## भारतीय विद्यापीठांना शैक्षणिक दर्जा अधिक उंचावण्याची गरज

जगभरातील १०६ देशांमधील १ हजार ५०४ विद्यापीठांची क्वाकरेली सायमंड (क्यूएस) रँकिंग २०२७ ही जागतिक क्रमवारी नुकतीच जाहीर करण्यात आली. ही क्रमवारी ठरविण्यासाठी ठराविक गुणांकनासह विद्यापीठांची शैक्षणिक प्रतिष्ठा, संशोधनाचा दर्जा, नियोक्ता प्रतिष्ठा, रोजगार परिणाम, शिक्षक-विद्यार्थी प्रमाण, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी प्रमाण, आंतरराष्ट्रीय संशोधन नेटवर्क आणि विद्यापीठांचे पर्यावरण व सामाजिक शाश्वतता कार्य या निकषांचा वापर करण्यात आला. या क्रमवारीत अमेरिकेच्या 'मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'ने सलग पंधराव्या वर्षी अव्वल स्थान पटकावले. त्यानंतर इम्पिरियल कॉलेज लंडन आणि स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी, अमेरिका यांनी संयुक्तपणे द्वितीय स्थान पटकावले. चौथ्या स्थानावर युनिव्हर्सिटी ऑफ ऑक्सफर्ड, युनायटेड किंगडम तर हार्वर्ड युनिव्हर्सिटी, अमेरिका या विद्यापीठाला पाचवे स्थान मिळाले. विशेष म्हणजे या क्रमवारीत ५२ भारतीय विद्यापीठांना स्थान मिळाले असले तरी त्यापैकी एकही विद्यापीठ पहिल्या १०० विद्यापीठांमध्ये स्थान मिळवू शकले नाही. दिल्ली विद्यापीठाला ११८ वे स्थान मिळाले असून आयआयटी मुंबई १३४ व्या स्थानावर तर आयआयटी मद्रास १७० व्या स्थानावर आहे. अलीकडच्या काळात विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा अधिक सुधारण्यासाठी भारतीय विद्यापीठांनी सातत्याने केलेले प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत. असे असले तरी जागतिक पातळीवर अधिक स्पर्धात्मक बनून शैक्षणिक क्रमवारी उंचावण्यासाठी भारतातील विद्यापीठांना अधिक परिश्रम घेण्याची आवश्यकता आहे, हे या क्रमवारीतून दिसून येत आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली

आज २० जून, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली यांचा आज स्मृतिदिन. २० जून १९८७ रोजी डॉ सलीम अली यांचे निधन झाले होते. पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८९६ रोजी मुंबईत एका गरीब मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव सलीम मोईनुद्दीन अब्दुल अली असे होते. डॉ सलीम अली हे एक वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे तर दोन वर्षाचे असताना आईचे निधन झाले. अगदी बालवयातच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सलीम अलींचा सांभाळ त्यांच्या मामांनी केला. सलीम अली यांना लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड होती. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी गळ्यावर पिवळा डाग असलेली चिमणी विकत घेतली होती. हा पक्षी कोणता आहे? त्याचे नाव काय आहे? हे त्यांना माहीत नव्हते म्हणून ते माहीत करून घेण्यासाठी ते त्या चिमणीला घेऊन मामांकडे गेले मामांनी सरळ त्याला बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या संचालकाकडे घेऊन गेले. तिथे संचालकांनी सलीम अलींना त्या पक्षाची सविस्तर माहिती सांगितली तसेच संस्थेतील भुसा भरलेल्या पक्षांचा संग्रह दाखवला. तो क्षण डॉ सलीम अलींच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. त्या क्षणी त्यांच्यावर पक्षांची जी भुरळ पडली ती कायमचीच. त्यानंतर त्यांना पक्षी निरीक्षणाचा छंदच जडला. १९१३ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डॉ सलीम अली यांनी सेंट झेव्हीयर महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड असल्याने सलीम अली यांनी उच्च शिक्षणासाठी प्राणी विज्ञान हा विषय निवडला. या विषयात त्यांना बी ए ऑनर्स ही पदवी मिळवली मात्र ही पदवी विद्यापीठाच्या समकक्ष समजली जात नव्हती त्यामुळे त्यांना भारतीय प्राणी वैज्ञानिक सर्व्हेक्षण संस्थेत नोकरी मिळू शकली नाही मात्र बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीत त्यांना व्याख्यता म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर ते जर्मनीची राजधानी बर्लिनला गेले तेथे जाऊन त्यांनी पक्षी शास्त्रावर प्रशिक्षण घेतले तिथे त्यांना जगप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ एर्व्हिन ष्ट्रेझमन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यानंतर काही काळ त्यांनी इंग्लंडमध्येही काम केले. १९३१ साली ते भारतात परत आले. परत आल्यावर त्यांनी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपकार्यवाहक पद स्वीकारले. नंतर ते या संस्थेचे अध्यक्षही बनले. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी हैदराबाद पक्षी निरीक्षण, त्रावणकोर - कोचीन पक्षी सर्व्हेक्षण, अफगाणिस्तान पक्षी सर्व्हेक्षण, कैलास पक्षी निरीक्षण यात्रा अशा मोहिमा राबवल्या. डॉ सलीम अली यांनी सुगरण पक्षाच्या वर्तनावर बारकाईने अभ्यास केला व त्यावर बिएनएचएस जर्नलमध्ये एक शोधनिबंध लिहिला. या शोध निबंधाने त्यांना पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळवून दिली. डॉ सलीम अली यांनी भारतभर फिरून विविध पक्षांची तपशीलवार माहिती गोळा केली.ती माहिती त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना समजावी यासाठी पुस्तक रुपात लिहिली. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ इंडिया अँड पाकिस्तान व पिक्टोरियल गाईड या दहा खंडीय पुस्तकाने त्यांचे जगभर नाव झाले. डॉ डीलन रीलपे यांच्या साथीत त्यांनी अपार मेहनत घेऊन भारतीय पक्षांच्या बाराशे जाती, २१०० उपजातींच्या नोंदी, सवयी, शास्त्रशुद्ध सर्वांगीण माहिती चित्रांसाहित एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली. डॉ सलीम अली यांच्या ह्याच कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा निर्माण झाली. भारतातील पक्षी निरीक्षक डॉ सलीम अली यांना आद्य गुरू मानतात. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला तसेच त्यांचा जन्मदिन पक्षीदिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. डॉ सलीम अली यांचे २० जून १९८७ रोजी निधन झाले. डॉ सलीम अली यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

# नगरपालिकेतच पाण्याचा दुष्काळ!

## ● कर्मचाऱ्यांची कुचंबणा; शहरातील पाणीप्रश्नाचे गंभीर स्वरूप अधोरेखित



**। उरण । प्रतिनिधी ।**

**उरण शहरातील पाणीटंचाईचे संकट दिवसेंदिवस गडद होत असताना आता त्याची झळ थेट उरण नगरपालिकेलाच बसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. गेले दोन दिवस उरण नगरपालिका कार्यालयात पाणीच नसल्याने कर्मचाऱ्यांची मोठी कुचंबणा होत असून, महिला कर्मचाऱ्यांना विशेष अडचणींचा सामना करावा लागत असल्याची माहिती कर्मचाऱ्यांनी दिली आहे.**

नगरपालिका कार्यालयातील वॉशरूममध्येही थेंबभर पाणी नसल्याने कर्मचाऱ्यांचे हाल होत आहेत. पाणीअभावी दैनंदिन कामकाजावर परिणाम होत असून, स्वच्छतेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिकांच्या मूलभूत सुविधांची जबाबदारी असलेल्या नगरपालिकेच्या कार्यालयातच अशी परिस्थिती निर्माण झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

विशेष म्हणजे, गुरुवारी झालेल्या नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी शहरातील पाणीटंचाईच्या समस्येबाबत सभागृहाने ठोस निर्णय घेण्याची गरज व्यक्त केली होती. मात्र, या विषयावर भाजपच्या नगरसेवकांनी विरोधाची भूमिका घेतल्याची चर्चा होती. त्यानंतर अवघ्या काही तासांत नगरपालिकेच्या कार्यालयातच पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

''नगरपालिका कार्यालयातच पाणी नसेल, तर शहरातील नागरिकांची परिस्थिती किती बिकट असेल याची कल्पनाही करवत नाही,'' अशी प्रतिक्रिया काही कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. विशेषतः महिला कर्मचाऱ्यांना स्वच्छतागृहाच्या वापरासाठी मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याचे सांगितले जात आहे.

पाणीअभावी दैनंदिन कामकाजावर परिणाम होत असून, स्वच्छतेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान, उरण नगरपालिकेच्या कार्यालयातील ही परिस्थिती शहरातील पाणीप्रश्नाचे गंभीर स्वरूप अधोरेखित करणारी असून, यावर तातडीने उपाययोजना न झाल्यास नागरिकांचा संताप आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

पावसाने दडी मारल्याने उरण शहरासह परिसरातील पाणीटंचाई अधिकच तीव्र होत आहे. अनेक भागांत नागरिकांना अपुऱ्या पाणीपुरवठ्याचा सामना करावा लागत असून, प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

---

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० जून

१) श्री.अविनाश बालकृष्ण राईलकर, ब्राम्हणआळी,अलिबाग, २०-६-१९४७

२)श्री.मधुकर शांताराम प्रधान पिंपळभाट,अलिबाग, २०-६-१९५०

३)श्रीम.स्मिता सीताराम भगत मु.वाडगाव, अलिबाग २०-६-१९५८

**कृषीवलच्या वाचकांना आवाहन**




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**

९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**रुही, वाढदिवस अलिबाग**

**महेंद्र पोतनीस, वाढदिवस अलिबाग**



**सौ. कुंदा विजय वॉर्डे, वाढदिवस**

**कै. दुर्गादास हंसराज पेवाळ, ५ वी पुण्यतिथी अलिबाग**

## धनंजय औंढेकर संचालकपदी

**मुंबई :** महावितरण कंपनीचे संचालक म्हणून धनंजय औंढेकर यांनी गुरूवारी (दि.१८) कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत होते. औंढेकर गेल्या २९ वर्षांपासून महावितरणमध्ये विविध पदांवर कार्यरत आहेत. औंढेकर यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी, एमबीए (फायनान्स), एनर्जी ऑडिटर, नवी दिल्ली येथून ॲडव्हॉन्स सर्टिफिकेट इन पॉवर डिस्ट्रीब्यूशन मॅनेजमेंट अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

---

# शेतकऱ्यांना यांत्रिक भातलागवड प्रशिक्षण

## ● प्लास्टिक ट्रे रोपवाटिका यांत्रिकीकरणाचे सादरीकरण



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेती अधिक उत्पादनक्षम, किफायतशीर आणि आधुनिक बनविण्यासाठी कृषी यांत्रिकीकरणाचा स्वीकार करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन माणगाव तालुका कृषी अधिकारी किरण पडवळकर यांनी केले. मजुरांची वाढती टंचाई लक्षात घेता यांत्रिक भात लागवड पद्धतीचा अवलंब करण्यासाठी शेतकऱ्यांनी प्लास्टिक ट्रेवर रोपवाटिका तयार करण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

तालुका कृषी अधिकारी कार्यालय माणगाव अंतर्गत कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा यांच्या वतीने खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर दहिवली येथे प्रगतशील शेतकरी दाऊद गालसुरकर यांच्या प्रक्षेत्रावर 'किसान गोष्टी' चर्चासत्र व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी कृषी संशोधन केंद्र रेपोलीचे प्रभारी अधिकारी डॉ. निगडे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धती, हवामान बदलाचा शेतीवर होणारा परिणाम आणि त्यावरील उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

# वरुणराजाची प्रतीक्षा कायम



**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी।**

पनवेल परिसरात जून महिन्याची १९ तारीख उजाडली तरी मान्सूनचे आगमन अद्याप झालेले नाही. आकाश निरभ्र निळाईने नटले असून सर्वत्र पांढऱ्या शुभ्र ढगांची वर्दळ दिसून येत आहे. ढगांची उपस्थिती असूनही पावसाचा मागमूस नसल्याने शेतकरी व नागरिकांची प्रतीक्षा वाढली आहे.

वाढत्या उकाड्यामुळे जनजीवन त्रस्त झाले असून सर्वांचे लक्ष आता वरुणराजाच्या आगमनाकडे लागले आहे. रम्य आकाश पावसाची चाहूल देत असले तरी प्रत्यक्ष सरींची प्रतीक्षा कायम आहे.

---

# श्रेया म्हात्रेचे सीईटीमध्ये यश



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील तळ येथील रहिवासी असलेल्या श्रेया निलेश म्हात्रे या विद्यार्थिनीने एमएचटी-सीईटी परीक्षेत ९७.२९ टक्के मिळवून नेत्रदीपक यश संपादन केले आहे. कोणत्याही महागड्या कोचिंग क्लासची मदत न घेता तिने मिळवलेले हे यश थक्क करणारे आहे. तिच्या या यशाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर एक मोठा आदर्श ठेवला असून, जिद्द असेल तर अशक्य काहीच नाही हे तिने पुन्हा एकदा सर्वांना दाखवून दिले आहे.

श्रेयाचे वडील बागमाला येथील पेट्रोल पंपावर कर्मचारी म्हणून काम करतात, तर आई अंगणवाडीमध्ये दायी म्हणून कार्यरत आहे. हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे खासगी शिकवणीचा खर्च परवडणे शक्य नव्हते. मात्र, प्रतिकूल परिस्थितीला हार न मानता श्रेयाने जिद्दीने स्वबळावर अभ्यास केला. तिच्या या भरारीमुळे संपूर्ण तळ गावात आनंदाचे वातावरण पसरले असून, तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# अलिबाग-शेगाव बसच्या चालक-वाहकांचा गौरव



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग- शेगाव बसमधील चालक सचिन बावस्कर, वाहक संदीप गोसावी यांनी १५ जून रोजी एक लाख एक हजार ४६२ रुपयांचे उत्पन्न मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यामुळे एसटीच्या उत्पन्नात भर पडली. तसेच या फेरीत १०७.८८ टक्के भारमान नोंदविण्यात आले. विक्रमी महसूल मिळविल्याबद्दल रायगड एसटी प्रेमी संघटेनतर्फे चालक व वाहकांचा विशेष सत्कार करण्यात आला. एसटी सेवेच्या उत्पन्न वाढीसाठी आणि प्रवाशांना उत्तम सेवा देण्यासाठी केलेल्या योगदानाबद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले.

यावेळी अलिबाग आगार व्यवस्थापक तसेच रायगड एसटीप्रेमी संघटनेचे अमित कंटक, स्वप्नील भगत, संकेत पाटील आणि समीर रांजणकर यांनी दोन्ही कर्मचाऱ्यांचा सन्मान करून शुभेच्छा दिल्या. यावेळी अलिबाग आगारातील कर्मचारी संदीप असलकर आणि रितेश पाटील हेदेखील उपस्थित होते. एसटी महामंडळाची सेवा अधिक सक्षम करण्यासाठी चालक आणि वाहक यांचे योगदान महत्त्वाचे असून, अशा उत्कृष्ट कामगिरीमुळे इतर कर्मचाऱ्यांनाही प्रेरणा मिळते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. प्रवाशांच्या वाढत्या प्रतिसादामुळे अलिबाग-शेगाव मार्गावरील बससेवा महसूल आणि प्रवासी संख्या या दोन्ही बाबतीत यशस्वी ठरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

---

# आगरदांडा-दिघी पोर्टगेट रस्त्याला झाडाझुडुपांचा विळखा



**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुड-आगरदांडा रस्त्यावर आगरदांडा दिघी पोर्ट ते राजपूरी-खोकरीनाका रस्त्याला मागील तीन पावसाळ्यापासून दुतर्फा झाडाझुडुपांचा विळखा असून याकडे स्थानिक नेते संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष होत आहे. याबद्दल वाहनचालक व प्रवासी वर्गातून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

या रस्त्यावर आगरदांडा जेटीकडे तसेच मुरुड-रोहाकडे ये-जा करण्यात सातत्याने वर्दळ असते. याठिकाणी रस्त्यालगत असलेल्या झाडाझुडपांमुळे वाहन चालकांना आपली वाहने चालवताना त्रास सहन करावा लागत आहे. समोरासमोर दोन मोठी अवजड वाहने आल्यास वाहने मागे पुढे करण्यात वादाला तोंड द्यावे लागते. झाडाझुडपांमुळे अनेक अपघात झाले आहेत, तर मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शासनाच्या संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकारी वर्गाने याची तातडीने दखल घेऊन योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी आगरदांडा येथील स्थानिक नागरिक, प्रवासी व वाहनचालकांकडून केली जात आहे.

## स्वामी समर्थ सभागृहाचे उद्घाटन

**। पाली । प्रतिनिधी ।**

पाली येथील श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास केंद्रात १४ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून श्री स्वामी समर्थ सभागृहाच्या नूतन वास्तूचे भव्य उद्घाटन समारंभ नुकताच पार पडला. या वर्धापन दिनानिमित्त केंद्रामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी श्री स्वामी समर्थ महाराजांची षोडशोपचार पूजा, भूपाळी आरती आणि त्यानंतर सत्यनारायण महापूजा आयोजित करण्यात आली होती.



# ॲड. जिविता पाटील यांना पुरस्कार

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

सामाजिक कार्यकर्ती ॲड. जिविता पाटील यांना त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत 'राष्ट्रीय कार्यदर्पण सन्मान पुरस्कार- २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी पत्रकार संघ, पत्रकार भवन मुंबई येथील सभागृहात ॲड. जिविता पाटील यांना ज्येष्ठ संगीतकाल कौशल इनामदार, अतिरिक्त आयुक्त आयकर विभाग सुनील अगलावे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी संपूर्ण महाराष्ट्रभरातून आलेल्या वेगवेगळ्या क्षेत्रातील विशेष उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विविध सत्कारमूर्तींचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

---

**पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करूया | मंत्री संजय राठोड यांचे आवाहन**

# जलसंधारणाच्या माध्यमातून लोक चळवळ गरजेची

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

हवामान बदलाच्या संकटासमोर संपूर्ण जग उभे असल्यामुळे महाराष्ट्राने जलसंधारणाच्या माध्यमातून एक लोक चळवळ उभी करणे काळाची गरज आहे. शासन, प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि सामान्य नागरिकांनी एकत्रितपणे या अभियानात सहभाग होणे आवश्यक आहे. याबरोबरच राज्यातील मृद व जलसंधारणाच्या कामासाठी कुठेही निधीची कमतरता भासू देणार नाही. यावर्षी पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करूया, दुष्काळाला हरवूया आणि जलसमृद्ध महाराष्ट्र घडवूया, असे आवाहन मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले आहे.



मंत्री संजय राठोड यांनी सांगितले की, जलसंधारण म्हणजे फक्त पाणी अडवणे नाही, जलसंधारण म्हणजे पर्यावरण संवर्धन, जलसंधारण म्हणजे भूजल पुनर्भरण, जलसंधारण म्हणजे शेतकऱ्यांना उत्पन्नाची सुरक्षा आणि जलसंधारण म्हणजे भविष्यातील पिढ्यांसाठी पाण्याची शाश्वत व्यवस्था करणे. महाराष्ट्र शेतीप्रधान राज्य आहे. आपल्या राज्याची अर्थव्यवस्था, ग्रामीण जीवन, उद्योग आणि पर्यावरण हे मोठ्याप्रमाणात पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे जल सुरक्षा ही आज केवळ विकासाची नव्हे तर अस्तित्वाची गरज आहे.

एल निनोमुळे यावर्षी मान्सूनच्या पावसावर परिणाम होऊ शकतो. हवामान विभागाने राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. एल निनो आणि जागतिक हवामान बदलामुळे पाऊस कमी पडणे, पावसाचे असमान वितरण होणे किंवा काही भागांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता वाढते. अशा परिस्थितीत केवळ पावसाची वाट पाहून चालणार नाही. उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन आणि संवर्धन करणे अतिशय आवश्यक आहे. आपण पाऊस वाढवू शकत नाही, पण पडणारा प्रत्येक थेंब अडवू शकतो, पाऊस जमिनीत मुरवू शकतो, भूजल साठे वाढवू शकतो आणि हाच जलसंधारणाचा मूलमंत्र असल्याचे मंत्री संजय राठोड यांनी सांगितले.

राज्यातील अनेक मोठी धरणे आज पूर्ण क्षमतेने भरली नाहीत; तर भविष्यात पिण्याचे पाणी, शेती आणि उद्योगांसाठी आव्हाने निर्माण होऊ शकतात. यामुळे जलसंधारण ही काळाची गरज आहे.

मृद व जलसंधारण विभागाने या पार्श्वभूमीवर राज्यभर मोठ्याप्रमाणात कामे हाती घेतली आहेत. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना, जलयुक्त शिवार अभियान २.०, प्रधानमंत्री कृषी सिंचन पाणलोट विकास घटक २.० यासारख्या उपक्रमाद्वारे जलसुरक्षा मजबूत करण्याचे काम सुरू आहे, असे मंत्री संजय राठोड यांनी सांगितले.

> **प्रधानमंत्री कृषी सिंचन पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत हजारो शेतकऱ्यांना वैयक्तिक लाभ देण्यात आल्यामुळे जलसंधारण आणि शेती विकास यांचा प्रभावी समन्वय साधला जात आहे.**
>
> **- मंत्री संजय राठोड**

---

# निवडक



## विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन

**खांब :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी कोलाड, खांब व कुडली विभाग कुणबी समाजाच्या वतीने विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. कुणबी युवा नेते तथा सामाजिक कार्यकर्ते प्रमोद म्हसकर यांच्या विशेष सहकार्यातून रविवारी दि.२१ जून रोजी कोलाड येथे सायं. ४:३० वा. इयत्ता दहावी व बारावी तसेच उच्च शिक्षण घेत असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव आणि सन्मान सोहळा तसेच कुणबी जोडो अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. युवानेते प्रमोद म्हसकर यांच्या कुशल नेतृत्वखाली कोलाड, खांब आणि कुडली विभाग कुणबी समाज बांधव कोलाड विभागीय अध्यक्ष राजेश कदम यांच्यासह खांब व कुडली विभागीय पदाधिकारी व सदस्य एकवटले असल्याचे पहावयास मिळत आहेत. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी त्याचबरोबर कुणबी जोडो अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक भवितव्याबाबत शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शकांचे मौलिक मार्गदर्शन लाभणार आहे. यावेळी कुणबी समाजोन्नती संघ मुंबई, रायगड जिल्हा व रोहा तालुका कुणबी समाजाचे सर्व पदाधिकारी तसेच सदस्य उपस्थित राहणार आहेत.



## उरणमध्ये तालुकास्तरीय कृषी मेळावा

**चिरनेर :** रायगड जिल्हा परिषद अलिबाग पंचायत समिती उरण आणि तालुका कृषी अधिकारी कार्यालय उरण यांच्या संयुक्त विद्यमाने माऊली हॉल म्हातावली उरण येथे तालुकास्तरीय कृषी मेळावा व कृषी मार्गदर्शन गुरुवारी (दि.१८) उत्साहात पार पडले. तालुक्यात यंदा जून महिना निम्म्यापेक्षा जास्त दिवस उलटूनदेखील पावसाची एकही सर बरसली नाही. मृग नक्षत्राच्या पावसाने अजून हजेरी न लावल्याने अनेक प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभे ठाकले आहेत. तालुक्यात गोड्या भागातील जमिनीत अजून शेतकऱ्यांनी पेरणी योग्य पाऊस बरसला नसल्यामुळे पेरणीच केली नाही. पाऊस पडेल की नाही. या काळजीत शेतकरी सापडला आहे. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील शेतकऱ्यांना विविध कृषी विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी या कृषी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रगतशील शेतकऱ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. दरम्यान या कृषी मेळाव्यात शेतकऱ्यांच्या अडचणीबाबत चर्चा करण्यात आली.



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

## सिकलसेल दिनानिमित्त रुग्णांची तपासणी

**आगरदांडा :** मुरूड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र बोर्ली-मांडला येथे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अक्षयकुमार सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली सिकलसेल दिन साजरा करण्यात आला. यावेळी ५० रुग्णांची तपासणी करण्यात आली. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ.सौरभ घरडे, आरोग्यसेवक राजेंद्र चुनेकर, मयूर पाटील, तालुका सिकलसेल सहाय्यक शालीकराव पावरा, आरोग्य सहाय्यक परीक्षित कोळी, आरोग्य सहाय्यक अमित करमळे, प्रयोग शाळा तंत्रज्ञ मनीषा शेलार, जुतिका गावंड, प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य कर्मचारी स्थानिक नागरिक व मान्यवर उपस्थित होते. यावेळी तालुका सिकलसेल सहाय्यक शालीकराव पावरा यांनी सिकलसेल आजाराविषयी सविस्तर माहिती सांगितली. ते म्हणाले की, सर्वसाधारण व्यक्तीच्या शरीरात लाल रक्त पेशींचा आकार गोल व लवचिक असतात पेशींचे आयुष्य १२० दिवस असते, पण सिकलसेल आजारामध्ये या पेशींना ऑक्सिजन मिळाला नाही, तर विळयासारखे होतो, सिकलसेल पेशींचे आयुष्य हे २० ते ३० दिवस असते. इंग्रजी भाषेत सिकल म्हणजे विळा सेल म्हणजे पेशी म्हणून ह्या आजारास सिकलसेल आजार असे म्हणतात. सिकलसेल हा लाल पेशीमध्ये होणारा आजार आहे, तरी योग्य वेळी रुग्णांनी तपासणी करून घ्यावी, असे आवाहनदेखील त्यांनी केले.



## 'आधुनिक तंत्रज्ञानाची गरज'

**कर्जत :** कर्जत मेडिकल असोसिएशनच्यावतीने डॉ. चव्हाण इमेजिंग सेंटर येथे वैद्यकीय चिकित्सकांसाठी क्लिनिकल मिटिंग आयोजित करण्यात आली. 'दैनंदिन वैद्यकीय प्रॅक्टिसमधील एक्स-रे निदानाचे महत्त्व' हा या शैक्षणिक कार्यक्रमाचा विषय होता. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. गजानन चव्हाण होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानातून दैनंदिन वैद्यकीय सेवेमध्ये एक्स-रे तपासणीचे महत्त्व, विविध आजारांच्या निदानातील त्याची उपयुक्तता तसेच योग्य वेळी आणि अचूक निदानामुळे रुग्णसेवा अधिक प्रभावी कशी होते याविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे यजमानपद डॉ.अलका चव्हाण यांनी भूषविले. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.विकास गोमारे व डॉ.प्रभाकर काळे यांनी प्रमुख वक्त्यांचे स्वागत केले. त्यानंतर कर्जत मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.प्रशांत गांगल तसेच समन्वयक डॉ. आशुतोष कुलकर्णी यांच्या हस्ते डॉ. गजानन चव्हाण यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या क्लिनिकल मिटिंगमध्ये परिसरातील अनेक वैद्यकीय व्यावसायिकांनी उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमादरम्यान उपस्थित डॉक्टरांना एक्स-रे निदानाच्या व्यावहारिक उपयोगांबाबत मार्गदर्शन मिळाले. तसेच परस्पर चर्चेद्वारे ज्ञानाची देवाणघेवाण झाली.

# महागावात स्कूल बॅग वाटप



**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा तालुक्यातील वारदायिनी विद्यालय महागाव हे डोंगर भागात असून आदिवासी वाडीतील गरीब विद्यार्थी व इतर विद्यार्थी यांना शैक्षणिक साहित्य वाटप विवेक साबळे बारपे यांच्याकडून विद्यार्थ्यांना स्कूल बॅग देण्यात आल्या. हे शैक्षणिक साहित्य मान्यवरांचे हस्ते विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले आहे. याशैक्षणिक साहित्याने विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रोत्साहन मिळेल व आवड निर्माण होण्यास साह्यभूत ठरणार आहे. याप्रसंगी सदर प्रसंगी विठोबा साबळे, शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच जिल्हा परिषद शाळा बारपे येथील विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी माजी सरपंच विठोबा साबळे यांनी सांगितले की शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येत आहे याचा मला आनंद होत असून याचा गरीब गरजू विद्यार्थ्यांना लाभ होऊन शिक्षणात प्रोत्साहन मिळेल अशी आशा व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान पाहायला मिळाले.

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक सचिन तुकाराम शेळके, संगीता सचिन शेळके, भास्कर मोरू शेळके, भारती भास्कर शेळके, संगीता लिंबाजी खेरडकर, उर्मिला दत्तात्रेय लहाने, वनिता राजाराम यादव मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे जांभुळपाडा गावठाणातील, तालुका सुधागड, जिल्हा रायगड**

| सर्वे नंबर | क्षेत्र चौ. मी/चौ. फू |
|---|---|
| जांभुळपाडा गावठाणातील मालमत्ता क्रमांक २५४ | त्याचे क्षेत्र ५५७.४२ चौ. मी म्हणजे ६००० चौरस फूट |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून आठ (८) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - पाली सुधागड
दि. २०/०६/२०२६

सही/-
**ॲडव्होकेट तुषार गणेश कानडे**
रा- जांभूळपाडा, तालुका सुधागड जिल्हा रायगड
मोबाईल नंबर - ९१६८८०१०४८

## पनवेल महानगरपालिका
## जाहीर नोटीस

उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभागात), पनवेल महानगरपलिका हद्दीत बसविण्यात आलेले कंटेनर टॉयलेटची ०३ वर्षाकरिता देखभाल व दुरुस्ती करणे या कामाचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर कामाचा तांत्रिक तपशील व इतर बाबी www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि. १६/०६/२०२६ ते दि. २९/०६/२०२६ पर्यंत दुपारी ०५:०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदर कामाची दरपत्रके दि. २९/०६/२०२६ पर्यंत दुपारी ०५:०० वाजेपर्यंत घनकचरा व्यवस्थापन विभागात स्वीकारण्यात येतील.

घनकचरा व्यवस्थापन विभागात,
पनवेल महानगरपालिका
जा.क्र पमपा/घकवि/२५२६/प्र.क्र.१६१/६०६/२०२६
दि. १९/०६/२०२६

**सही/-**
**उपआयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे- बंजारवाडी, ता-कर्जत, जि-रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री.अनिकेत श्रीधर भट्ट यांच्या कडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असुन सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणेः

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ५ | ३ | ०.८६.७० यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचे व ताजेकब्जा वहीवाटीचे खाते नं.१०९५ चे क्षेत्र ०.२१.०० | ०.९३ |

सदर मिळकतीच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशिल व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशिल सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २०/०६/२०२६

वकील
**ॲड. सचिन संजय सुर्वे**
पत्ता : नाथ सदन, आमराई रोड,
ता.कर्जत, जि.रायगड, ४१०२०१.
मो.नं ९०२८५४६१५७/७३८५५४६१५७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल प्रज्ञा पंत यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे कुशिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| मालक | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| ऋषिकेश अरुण गायकवाड व विद्या ऋषिकेश गायकवाड | ४१/४ | एकुण क्षेत्र ०-६८-२० हे आर पॉ यापैकी क्षेत्र ०-३४-१० हे आर पॉ | ८-६४ |
| आत्माराम यशवंत गायकवाड | ४१/३ | एकुण क्षेत्र ०-०७-०० हे आर पॉ | ०-०९ |
| विद्या ऋषिकेश गायकवाड व केदार दिलीप जाधव | ४४/२/ड | एकुण क्षेत्र ०-२६-६० हे आर पॉ यापैकी क्षेत्र ०-१३-३० हे आर पॉ | ०-६९ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक २०/०६/ २०२६

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता शॉप नं.२९ तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत,
जि.रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९ तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
जि.रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे लोणिवली, ता. पनवेल, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ५९/१ | एकूण क्षेत्र १-६१-९० हे.आर, या पैकी दीपक काशिनाथ पाटील व इतर ८ याचे मालकीचे विक्री क्षेत्र ०-८०-०० हे. आर. | २३.४४ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :-२०/०६/२०२६
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकास या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची जमीन मिळकत, मिळकतीचे मालक दिपक मनोहर मोरे यांचे मालकीची मिळकत विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी चालू आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| उसर ता.अलिबाग | ५०/५ | ०-२०-०० | १.१९ |
| उसर ता.अलिबाग | ५०/९ | ०-३९-०० | २.३१ |
| उसर ता.अलिबाग | ५१/५ | ०-३२-०० | १.६२ |

सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी दिलेला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकारार, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क, व हितसंबंध वा दुरान्वये संबंध असल्यास अशा व्यक्तीनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार याजकडे हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे मुदतीत सादर कराव्यात, मुदतीत कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे, असे समजून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १९/०६/२०२६

**(ॲड. वैभव गिरीधर पाटील)**
**जिल्हा न्यायालय अलिबाग, रायगड**
**मु.सांबरी, पो. कुर्डुस,**
**ता. अलिबाग, जि. रायगड**
**मो.नं. ८८०५५१८०६८**


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे देवघर ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली शेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रसाद अनंत कवाड, श्री. दत्ताराम तानाजी सोलकर आणि श्री. दशरथ तानाजी सोलकर यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे देवघर, ता. अलिबाग, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर. चौ.मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| ३९ | ०-४२-५० | ८.६९ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्न वस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला आमचे अशिलांना देण्यात येईल. तसेच मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे सर्वास कळावे.

अलिबाग,
दिनांक :- १९/०६/२०२६

**ॲड. (डॉ.) दिपक विश्वनाथ नागे**
सदनिका क्र.१, तळ मजला,
लक्ष्मी को.ऑप.हौ. सोसायटी, कामत आळी,
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड.

**महाराष्ट्र शासन**
**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई**
**जुने सचिवालय, २ रा मजला, फोर्ट, मुंबई - ४०००३२**
दूरध्वनी क्रमांक- २२८४४६३४, २२८४३१२१ ईमेल-mrtregistrarmum@gmail.com /registrarmrt@yahoo.in

क्र.सदस्य(न्यायिक/टेनन्सी/रिव्ही/रायगड/१२२/२५
दिनांक १२/०६/२०२६

प्रति,
श्रीम. पिस्ताबाई रमेश कोठारी,
रा.बंगलो नं.१२, लक्ष्मी विलास सोसायटी,
मुकुंदनगर, पुणे

विरुद्ध

६) श्रीम. सविता सुनिल घोडके
रा. मंत्री लेक्स क्रॉन इ/२, पॉवर,
ऑफिस जवळ, कल्याण (प) जि. ठाणे
८) श्रीम. सविता विठ्ठल मोहिते
रा.बालाजी कॉम्प्लेक्स, ए-विंग,
पहिला मजला, फ्लॅट नं.१०९,
ता. माणगाव, जि.रायगड

विषय :- सुनावणी नोटीसीबाबत

वरील नांव धारण करणारा, अर्जदार यांनी उपविभागीय अधिकारी, माणगाव, जि. रायगड यांचेकडील टेनन्सी अपील- २१/२०२४ EQJ COURT नोंदणी क्र.००१५९/२०२४ दि.२१/०७/२०२५ च्या आदेशाबाबत केलेल्या उपनिर्दिष्ट अर्जाची सुनावणी दि.२२/०७/२०२६ रोजी सकाळी ११-०० वाजता, मा.सदस्य (न्यायिक) महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई न्यायाधिकरणापुढे खालील पत्यावर करण्याचे निश्चित केले आहे याची समज घ्यावी.

पुढील सुनावणी तारखेस तुम्ही जातीने किंवा प्राधिकृत प्रतिनिधी किंवा वकिला मार्फत न्यायाधिकरणापुढे हजर झाला नाहीत, तर न्यायाधिकरण सदरहू अर्जाची एकतर्फी सुनावणी करील व त्या संबंधात योग्य तो आदेश देईल.

**प्रबंधक**
**महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई**

सुनावणीचे ठिकाण- २/-महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई यांचे कार्यालय, जुने सचिवालय, विस्तार इमारत, २ रा मजला, फोर्ट, मुंबई-३२

## हरकत नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली मिळकत हि आमचे अशिल १) सुलोचना प्रभाकर पाटील, मु. पनवेल, खांदा कॉलनी, २) प्रफुलता आनंद शिलकर, मु. कळवा, ३) उषा शशिकांत म्हात्रे, मु. भुते, ता. अलिबाग, जि. रायगड ४) रंजना नरेंद्र म्हात्रे, मु. ऐरोळी, ५) सुजाता संतोष पाटील, ६) संकेत संतोष पाटील, मु. वाघ्रण, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या वडिलोपार्जित मालकिची, ताबाकब्जा, वहिवाटीची आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | भुमापन क्र./ उपविभागीय क्र. | क्षेत्र हे.आर | आकार |
|---|---|---|---|
| मानकुळे, ता.अलिबाग, जि.रायगड | ९५/१/ब | १.०८.५० पो.ख. ०.०७.४० एकुण क्षेत्र १.१५.९० | १४.१३ |

सदर मिळकती संदर्भात आमचे अशिलांनी १) सुलोचना प्रभाकर पाटील, मु. पनवेल, खांदा कॉलनी, २) प्रफुलता आनंद शिलकर, मु. कळवा, ३) उषा शशिकांत म्हात्रे, मु. भुते, ता. अलिबाग, जि. रायगड ४) रंजना नरेंद्र म्हात्रे, मु. ऐरोळी, ५) सुजाता संतोष पाटील, ६) संकेत संतोष पाटील, मु. वाघ्रण, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे सदर मिळकत ही वडिलोपार्जित मिळकत आहे. सदर मिळकतीमध्ये आमच्या अशिलांचा अविभक्त हिस्सा आहे. सदर मिळकतींचे वाटप झालेले नाही.

परंतु सदरील व्यक्ती या ७/१२ सदरी दाखल असलेल्या नावाचा गैरफायदा घेवुन सदर मिळकती या अन्य त्रयस्थ इसमास विकण्याच्या प्रयत्नात असल्याची माहिती दिनांक १०/०६/२०२६ रोजी कृषीवल मध्ये अनुक्रमांक १० कडे वर्णन केलेली मिळकत जाहिर केलेल्या नोटीसीवरून आमचे अशिलांना माहिती मिळाली. सदर मिळकतींच्या विक्री व्यवहारास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे.

तरी कोणत्याही व्यक्तीने या मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारे व्यवहार अथवा करार करू नये. याउपरही कोणीही व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही आणि आमचे अशिल त्यांचेविरूद्ध कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १८/०६/२०२६


सही/-
**ॲड. सीमा किशोर घरत**
जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग
कार्यालयीन पत्ता-
गंगाधर अपार्टमेंट, चेंढरे ता.अलिबाग,
जि.रायगड मोबा नं.९८९०७३२४९७


## क्लासिफाईड
**जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी**

- **नागावमधील हॉटेलमध्ये** काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. ऑल राऊंडर कुक (कॉंटिनेंटल सुद्धा येणे आवश्यक) रेस्टॉरंट कॅप्टन, मेन्टेनन्स पर्सन, इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबा. ७५५९१८४६१२
- **दुकानगाळा भाड्याने मिळेल. ९४२३३७५१९८**
- **घरकामासाठी कायमस्वरूपी** राहून काम करणारी बाई हवी आहे. कामामध्ये जेवण बनवणे व घराची साफसफाई यांचा समावेश असेल. पगार : ₹ १५,०००/– राहण्यासाठी केयरटेकर रूम मिळेल. (फैमिली केयरटेकर रूम मध्ये राहू शकते.) इच्छुकांनी संपर्क साधावा. 7875866555
- **आर्किटेक्चर आणि इन्टेरियर** डिझाइनिंग ऑफिस करीता स्टाफ हवा आहे. संपर्क – 9762777975
- **वाडगाव फाटा येथे कॉटेज** सांभाळण्याकरीता माणूस हवा आहे. संपर्क – 9822938444
- **नामांकित कंपनीसाठी ड्रायव्हर पाहिजे**, अनुभवी परवाना धारक मासिक वेतन अनुभवानुसार मो.९०११०२६२६३.
- **अलिबाग–मुरूड रोडटच चौल**–सागमळा (पिराचे देऊळ) येथे ८ गुंठा (१०.१०/७/१२) बागायत वाडी व उत्तम घर (क्लिअर टायटल) विकणे आहे. धंद्यासाठी सुद्धा उत्तम जागा आहे. संपर्क–घोसाळकर– ९८१९७७११११

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


**नमुना १**
**उपविभागीय अधिकारी, पनवेल विभाग, पनवेल यांजकडून**

## जाहीर नोटीस

**क्र.उविअ/भुसं/कात ५/कळंबोली/एस.आर. ०१/२०२६**
**उपविभागीय अधिकारी पनवेल यांचे कार्यालय**
**पत्ता : जुना ठाणानाका रोड, पनवेल**
**ता. पनवेल, जि. रायगड, दिनांक :- १२/०६/२०२६**

ज्याअर्थी कार्यकारी अभियंता (कोकण विभाग) महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई यांचेकडील पत्र जा.क्र./एम.एस. आय.डी.सी./कळंबोली जंक्शन/भूसंपादन/१३२६/२०२६, दिनांक १७/०४/२०२६ अन्वये यांनी मौजे-कळंबोली येथील जमिनींचे रस्ते व उड्डाणपुल विकास कामाकरीता खाजगी क्षेत्रातील खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी करणेकामी महसुल व वनविभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२/५/२०१५, दिनांक ३०/९/२०१५ व शासन परिपत्रक क्रमांक एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५/१/२०१७ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता (कोकण विभाग) महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई यांचे नावे घेणेकामी प्रस्ताव जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्र. भूसंपादन/टे-६/E-८८२६६५४/मौजे-कळंबोली/२०२६, दिनांक २७/०४/२०२६ व कार्यकारी अभियंता (कोकण विभाग) महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई यांचेकडील पत्र दिनांक १७/०४/२०२६ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय तसेच महसूल व वनविभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. एलक्युएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५/१/२०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी आता

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी, पवन चांडक, उपविभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल याद्वारे,

(एक) अनुसूची-एकमध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे आणि

(दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या शेड्युल १ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी मोबदला निश्चित करण्यात येईल.

(तीन) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमिन वाटाघाटीद्वारे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल यांचे नांवे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबत संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

२. संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी), पनवेल उपविभाग पनवेल यांचेकडे दाखल करावीत.

३. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल/कार्यकारी अभियंता (कोकण विभाग) महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत भूधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करणेत आलेल्या क्षेत्राच्या आलेल्या आराखड्याची प्रत उप विभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल व कार्यकारी अभियंता (कोकण विभाग) महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसूची- एक**

**थेट खरेदी घ्यावयाच्या जमिनीचा तपशिल**

**गाव कळंबोली, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड**

| अ. नं. | खातेदाराचे नांव | स.नं./हि.नं | भुसंपादन क्रमांकानुसार संपादीत करावयाचे अंदाजे क्षेत्र हे.आर. चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | श्री. नरशी गोविंद रावरिया, सवजी भानजी गामी | १/१२+१३+१४+१६ | ०.००.६० |
| २ | श्री. जसमीत कौर हरेंद्रसिंग लांबा, हरेंद्रसिंग प्रितमसिंग लांबा, इकबाल हुसेन मोहम्मद हनिफ खान | १२०/१ | ०.१४.५० |
| | | | ०.१५.१० |

ठिकाण : पनवेल
दिनांक :- १२/०६/२०२६

सही/-
(पवन चांडक )
उप विभागीय अधिकारी पनवेल
उप विभाग पनवेल

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/४६/७५०/२०२६




## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाच्या घटना घडतील. परदेशगमनाची योजना मार्गी लागेल. ग्रहमानाची अनुकूलता राहील.
- **वृषभ** : वैवाहिक जीवनात उत्कर्षाच्या संधी लाभतील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. समाधानी रहाल.
- **मिथुन** : राहूच्या भ्रमणाचा प्रभाव राहील. यंत्र, वाहनांचा वापर जपून करावा. कार्यक्षेत्रात प्रगती होईल.
- **कर्क** : कौटुंबिक समाधान लाभेल. सुवार्ता कानी येईल. नोकरीत बदली, बढतीच्या हालचाली होतील.
- **सिंह** : व्यवसायात उत्तम प्राप्ती होईल. योग्य संगत लाभेल याकडे लक्ष द्या. स्थावर, वाहन सौख्य लाभेल.
- **कन्या** : टीकेचा सामना करावा लागेल. वर्तणूक योग्य रहण्याकडे लक्ष द्यायला हवं. प्रकृतीस त्रास संभवतो.
- **तूळ** : मोठे व्यवहार मार्गी लागतील. सरकारी कामांबाबत दिलासा मिळेल. वरिष्ठांशी मतभेद टाळायला हवेत.
- **वृश्चिक** : विश्वासू व्यक्तिंकडून विश्वासघात संभवतो. कुसंगती टाळावी. स्थावर प्रश्नात तडजोड करावी.
- **धनु** : महत्त्वाची कामं रखडतील. मानसिक अस्वास्थ्य राहणार आहे. ज्येष्ठांच्या प्रकृतीस त्रास संभवतो.
- **मकर** : आर्थिक बाबतीत काळजी घ्यावी. मनात नैराश्य दाटून येईल. प्रेमात अपयशाची शक्यता आहे.
- **कुंभ** : आपापल्या क्षेत्रात प्रगतीच्या संधी लाभतील. कामासाठी प्रवास लभदायी ठरेल. बाकी चिंता नसावी.
- **मीन** : असुरक्षिततेची भावना वाढीस लागेल. वेळीच काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांना सुसंधी.

## २० जून — दिन विशेष

१९९७ : मराठीतील प्रथम शायर भाऊसाहेब पाटणकर यांचा मृत्यू.
२००१ : परवेझ मुशर्रफ पाकिस्तानचे अध्यक्ष झाले.
२००८ : मराठी रंगभूमी नट, चित्रपट अभिनेते चंद्रकांतगोखले यांचा मृत्यू.
२०१५ : भारताच्या विश्वनाथन आनंद याने नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत विश्वविजेत्या मॅग्नस कार्लसनला हरवलं.
२०१७ : टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक अनिल कुंबळे यांचा प्रशिक्षकपदाचा राजीनामा.

## आरोग्यमंत्र — अवयवपेढ्या गरजेच्या

सध्या गंभीर आजारांचं प्रमाण वाढलं असून अवयव निकामी होण्यात आणि त्यामुळेच यकृत, त्वचा, डोळ्यांचं भिंग, हृदय, मूत्रपिंड अशा अनेक महत्त्वाच्या अवयवांचं प्रत्यारोपण करणाऱ्या शस्त्रक्रियांमध्ये वाढ झाली आहे. मात्र संबंधित रुग्णाला योग्य वेळी दाते मिळतातच असं नाही. म्हणूनच अवयवांची पेढी ही संकल्पना उदयाला आली आहे. एकट्या अमेरिकेत सुमारे ७६ हजार लोक प्रत्यारोपणासाठी अवयवांच्या प्रतीक्षेत असून दर वर्षी सुमारे २२ लोक अवयव न मिळाल्यामुळे मरण पावतात. यावर उपाय पर्याय म्हणून अवयवपेढ्यांकडे पाहिलं जात असून अवयवपेढीत मिळालेले अवयव आवश्यकतेप्रमाणे वापरता यावेत अशा पद्धतीनं साठवण्यासाठी संशोधक संशोधन करत आहेत. बहुतेक अवयव बर्फात ठेवले तरी जेमतेम चार ते सहा तासांपर्यंतच टिकतात. १९८० पासून क्रिप्टोप्रिझर्वेशनचं तंत्र विकसित झालं. मात्र अत्यंत थंड हवेत साठवलेले अवयव पुन्हा उबदार बनवून शरीरात बसवताना काही प्रमाणात हानी होते. त्यावर पर्याय म्हणून युनिव्हर्सिटी ऑफ मिन्नेसोटा येथील संशोधकांनी अलिकडेच नॅनो वॉर्मिंगचं तंत्र विकसित केलं आहे. यासाठी आयर्न ऑक्साईडच्या नॅनो पार्टिकल्सचा वापर करण्यात आला असून लवकरच उंदीर आणि सशांवर प्रयोग करण्यात येणार आहेत. त्यानंतर ते मानवावर केले जातील. या संशोधनामुळे लवकरच अवयवपेढ्यांची निर्मिती होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



## स्मार्ट टॉक — डाउनलोड करा लाईट व्हर्जन

मुलांनो, तुमच्याकडे कमी रॅमचा स्मार्टफोन आहे का, जास्त ॲप्स डाउनलोड केल्यावर फोन स्लो किंवा हँग होतो का... पण तुम्ही काळजी करू नका. विविध ॲप्सचे लाईट व्हर्जन उपलब्ध आहेत. ते तुम्ही डाउनलोड करून घेऊ शकता. लाईट व्हर्जनची ही ॲप्स फोनमध्ये कमी जागा व्यापतात. अशाच काही ॲप्सवर नजर टाकू या.

✻ सोशल नेटवर्किंगसाठी फेसबुक ॲप वापरलं जातं. मुख्य फेसबुक खूप जागा व्यापतं. हे ॲप जवळपास १०० एमबीचं आहे. या ॲपमुळे कमी रॅमवाले फोन हँग होऊ शकतात. त्यामुळे फेसबुकचं लाईट व्हर्जन डाउनलोड करा.

✻ व्हॉट्स ॲप शिवाय आपल्याला चैन पडत नाही. व्हॉट्स ॲपचं मूळ व्हर्जन २० ते ३० एमबी एवढी जागा व्यापतं तर लाईट व्हर्जन फक्त पाच एमबीचं आहे. **(क्रमश:)**

## ब्युटी टॉक — घरीच बनवा सौंदर्यप्रसाधनं

✻ महागडा हायलायटर खरेदी करायचा नसेल तर लिप ग्लॉसचा वापर करा. कोणताही क्लिअर लिप ग्लॉस हायलायटर म्हणून वापरता येईल. नैसर्गिक उजळपणा मिळवण्यासाठी हा लिप ग्लॉस चिक बोन्सवर लावा. घरच्या घरी हायलायटर बनवायचा असेल तर शिमर पिगमेंटमध्ये थोडं खोबरेल तेल मिसळा. ✻ ओठ कोरडे पडत असतील तर पेट्रोलियम जेली आणि साखर यांचं मिश्रण तयार करून घरच्या घरी लिप स्क्रब तयार करा. ✻ बीबी क्रीमही घरी तयार करता येतं. सौम्य मेकअप बेस हवा असेल तर मॉईश्चरायझरमध्ये थोडं लिक्विड किंवा पावडर फाउंडेशन मिसळा. ✻ मेक अप ब्रशच्या स्वच्छतेसाठी ब्रश क्लिनर्स मिळतात. पण हे क्लिनर्स विकत घ्यायचे नसतील तर काळजी करू नका. तुमच्या नेहमीच्या शँपूने ब्रश स्वच्छ करता येतील. वाटीभर गरम पाणी घ्या. त्यात शँपूचे दोन थेंब घालून मिश्रण तयार करा. यामुळे मेक अप ब्रश नीट स्वच्छ होतील. ✻ तुमच्याकडे आयशॅडो पॅलेट असेल तर ब्रो पावडर विकत घेण्याची आवश्यकता नाही. भुवयांना आकार देण्यासाठी किंवा विरळ भुवया भरण्यासाठी ग्रे किंवा ब्राउन शेड्सचा वापर करता येईल.

## पंचांग

**शनिवार, २० जून २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, निज ज्येष्ठ शु. ६, चंद्रराशी : सिंह, नक्षत्र : मघा, योग : वज्र, सूर्योदय ६.०४ सूर्यास्त ७.१६

## फॉरवर्ड्स

**पुछा ज़ो हाल शहर क़ा तो सर झुका क़े बोले...**

**लोग़ तो ज़िन्दा हैं जमीरों क़ा पता नहीं...!**

## फॅशन पॅशन

✻ एखादी बेसबॉल कॅप तुमच्याकडे असायला हवी. मित्रमंडळींसोबत आउटिंगला जाताना ही कॅप घालता येईल. कॅज्युअल वेअर वर ही बेसबॉल कॅप भाव खाऊन जाईल. ✻ एखादी वेस्ट बॅग खरेदी करा. यात तुमच्या बऱ्याच वस्तू मावतील. ही बॅग कंबरेवर बांधली की झालं. अशी बॅग स्टायलिशही दिसेल. ✻ रिव्हर्सेबल बेल्ट हा प्रकार कोणत्याही आउटफिटवर शोभून दिसतो. शर्ट आणि टी शर्टच्या रंगाची अजिबात काळजी करू नका. प्रत्येक रंगावर हा बेल्ट खुलून दिसेल. ✻ विंटेज स्टाईलचा चष्माही तुमचा लूक खुलवेल. स्मार्ट दिसायचं असेल तर असा चष्मा नक्की घ्या.

## करिअरवाटा — अभ्यासा ह्युमॅनिटीज...

करीअरचा विचार करताना काही ऑफ बीट म्हणजेच फारशा प्रचलित नसणाऱ्या अभ्यासक्रमांची निवड करायची असेल खालील पर्यायांचा अवश्य विचार करा.

✻ ह्युमॅनिटीजचा अभ्यास ही संकल्पना आता नवीन राहिलेली नाही. पण इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये हा अभ्यासक्रम वेगळ्या रूपात आहे. सामाजिक विज्ञान, ह्युमॅनिटीज आणि नैसर्गिक विज्ञान यांच्यातली दरी कमी करण्याचा प्रयत्न संस्थेने केला आहे. मॅपिंग सायन्स, सोसायटी रिलेशनशीप आणि जर्नलिझम फॉर सायंटिस्ट्स असे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. यामुळे विज्ञानाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायला मदत होईल. ✻ भूकंप, पूर, त्सुनामी यांसारख्या नैसर्गिक तसंच आगीसारख्या मानवनिर्मित आपत्ती वारंवार येत असतात. या आपत्तींना समोरं जाण्यासाठी कुशल तज्ज्ञांची गरज असते. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसमध्ये डिझास्टर मॅनेजमेंट म्हणजे आपत्ती व्यवस्थापनावरचा अभ्यासक्रम आहे. ✻ नवी दिल्लीच्या श्रीराम कॉलेजमध्ये ग्लोबल बिझनेस ऑपरेशन्सचा पदवी अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमात आंतरराष्ट्रीय नातेसंबंध आणि धोरणं यांची सरमिसळ पहायला मिळते.



## खेचाखेची — शिक्षण

एकदा एक वयस्कर माणूस एका शाळेत जातो आणि मुख्याध्यापकांना म्हणतो, मला लिहीता वाचता येत नाही. मला शिकवाल का?

.
.
.

मुख्याध्यापक म्हणतात, हो, आम्ही शिकवू. फक्त हा अर्ज भरुन द्या.

## वेगळं काही

उड्डाण केल्यानंतर विमान एका सेकंदात साधारण चार लीटर इंधन खर्च करतं. 'बोईंग ७४७' या विमानाला मिनिटभराच्या प्रवासासाठी २४० लीटर इंधन लागतं. बोईंगच्या संकेतस्थळावर याबाबतची माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार 'बोईंग ७४७' ला दहा तासांच्या प्रवासासाठी तब्बल ३६ हजार गॅलन म्हणजे १,५०,००० लीटर इंधन लागतं. एक मैल अंतरासाठी या विमानाला साधारण पाच गॅलन इंधन लागतं. म्हणजे प्रतिकिलोमीटर अंतर कापण्यासाठी 'बोईंग ७४७' ला १२ लीटर इंधन लागतं. या विमानातून एकाचवेळी ५०० प्रवासी प्रवास करतात. म्हणजे १२ लीटर इंधन भरल्यानंतर एवढे प्रवासी एक किलोमीटर अंतर पार करतात.

## संगोपन — मुलांशी संवाद साधताना...

बरेचदा काहीही कारण नसताना मुलं खोटं बोलू लागतात. अशा परिस्थितीत पालकांनी त्यांच्याशी हळूवारपणे संवाद साधणं गरजेचं आहे. यामागील कारणंही शोधायला हवी.

✻ काही पालक मुलांना नेहमी 'हे करू नको, ते करू नको' या पद्धतीने टोकत असतात. अशा वेळी मुलांमध्ये ते काम करून पाहण्याची उत्सुकता निर्माण होते. उत्कंठा शमवण्याचा प्रयत्न केल्यास पालक रागवतील या भीतीने मुलं खोटं बोलतात. त्यामुळे एखादी कृती चुकीची आहे हे मुलांना समजावताना ती का चुकीची आहे हे देखील सांगा. ✻ मुलांसमोर पालकांनी खोटं बोलणं टाळावं. यातून मुलाला तुमच्याबद्दल विश्वास वाटू लागतो. अशा वेळी मुलांशी मैत्री करणं सहज शक्य होतं. ✻ पालकांनी मुलांना त्यांची चूक शांत स्वरात लक्षात आणून देणं गरजेचं आहे. अशा वेळी मुलांना रागवल्यास चूक स्वीकार करण्याची शक्यता कमी असते. ✻ अनेक पालक व्यस्ततेमुळे मुलांना वेळ देऊ शकत नाहीत. अशा वेळी संवाद साधनांच्या सहाय्याने का होईना, मुलांशी सतत संवाद साधत राहणं गरजेचं आहे.



## सुडोकू ११८


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ८ | | २ | ९ | १ | ७ | ३ | |
| | १ | | | | ३ | | | |
| ३ | | ९ | | ५ | | १ | ८ | |
| | | | | | | ४ | | ७ |
| | | २ | | | | ५ | | |
| ६ | | ८ | | | | | | |
| | २ | ४ | | ८ | | ६ | | ३ |
| | | | ९ | | | | ४ | |
| | ३ | ५ | ६ | २ | ४ | | १ | |

टीप -
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ११७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ५ | ७ | ९ | ४ | ८ | १ |
| ९ | ५ | ८ | ३ | ४ | १ | ६ | ७ | २ |
| ७ | ४ | १ | ६ | २ | ८ | ९ | ३ | ५ |
| १ | ८ | ४ | ९ | ५ | २ | ७ | ६ | ३ |
| ५ | २ | ३ | ४ | ६ | ७ | ८ | १ | ९ |
| ६ | १ | ७ | ८ | ९ | ३ | २ | ५ | ४ |
| ३ | ६ | २ | १ | ८ | ४ | ५ | ९ | ७ |
| ८ | ७ | ९ | २ | ३ | ५ | १ | ४ | ६ |
| ४ | १ | ५ | ७ | ९ | ६ | ३ | २ | ८ |

## शब्दकोडे क्रमांक ११८



**आडवे शब्द :-**
१) राहणे, वस्ती
३) मंदिर
६) चित्त, लक्ष, भान
९) नशीब, काम
१०) छोटी वस्ती
१२) चामखीळ
१४) नूतन
१५) रांग
१६) प्रतिध्वनी
१८) बेकरीतील एक पदार्थ, पाव
२१) वचक, जरब
२३) पूर्ण ऐक्य, भरतीची वेळ
२५) अभिप्राय
२७) तोंडातोंडी व्यवहार
३०) किंमत
३१) सीमा मर्यादा
३३) राजकारभाराचे प्रमुख शहर
३५) किल्लेदार
३८) सदोदित
३९) मयूर
४०) ढीग
४२) घराचा मागचा दरवाजा
४४) फांदी तुटताना होणारा आवाज
४६) मालाचे येणे-जाणे
४९) फोक, छडी
५०) महिना
५१) पावसाची झड
५२) नातेवाईक
५३) एक श्वासरोग
५४) रसाळ
५६) परमेश्वर
५८) भगवान, देव
५९) शरम
६१) उत्कंठेने मार्गप्रतिक्षा
६४) जिवंत
६६) सेवक, गुलाम
६८) दहावी रास
७०) संकट
७१) हिंदुस्थान
७२) जंगलाकडे जाणारा रस्ता
७३) हावरटपणा
७७) सिंहासन
७८) निराश, खिन्न
७९) फुलणे, लोंबणे
८०) चलनवलन
८२) माझा
८३) व्रत
८५) मेंढ्या पाळणारा
८७) पुत्र(सं.)
८८) प्रफुल्लित
९१) मच्छर
९२) जाणे, प्रस्थान करणे
९३) लहान
९४) गाय
९५) द्रव्य, पैसा
९६) अर्धी ओंजळ
९७) घोड्यावरून मारलेली फेरी

**उभे शब्द :-**
१) वितरण
२) उद्योग, धंदा
३) शरीर
४) कडक व चिवट
५) जावळा
७) अरण्य
८) पळापळ
९) शिखराचे टोक
११) हाकेला दिलेली ओ
१३) तळे
१७) बेडकाचे ओरडणे
१९) ऐतिहासिक गद्य लिखाण
२०) अंगठा व तर्जनी यामधील ताणलेले अंतर, टिचकी
२२) साठलेला केर
२४) स्वाभिमानी स्त्री
२६) एक रत्न
२८) नावातील बदल
२९) झोपमोड
३०) हिस्सा, भाग
३१) मोदक, करंजीचे आवरण
३२) वाणी, जिभ, बोलणे
३४) धारेला लावून केलेली तपासणी
३६) तापापूर्वीचे अंग मोडून येणे
३७) रेचक, सरकवणारे
३८) सदवर्तन
४१) परमेश्वर
४३) विषमच्या विरुद्ध
४४) व्यायाम
४५) भित्रा
४६) आवई
४७) जागल्या
४८) कदर करणारा
५०) मादी
५५) तादाम्य, एकरुप
५७) शहर
६०) बस्तान
६२) मिठी, विळखा
६३) सप्तपातालातील सहावे पाताळ
६५) वेदनेने भरलेले
६७) फुरसत
६९) एका बाजूस झुकणे
७१) गवताची, सरपणाची मोळी
७२) राजाचा राज्य करण्याचा कालावधी
७३) प्रफुल्लता
७५) किंचित छोटा
७६) अखंड
८१) चावट, खट्याळ
८२) चिंतन
८४) दक्ष
८५) पुस्तकातील पाठ
८६) जन्म
८७) त्या प्रमाणे
८९) हजार किलो
९०) बारा वर्षाचा काळ

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर






सॅनहोजे (कॅलिफोर्निया) : अमेरिकेतील भारतीयांच्या सांस्कृतिक दिनदर्शिकेतील सर्वात प्रतिष्ठित आणि बहुचर्चित ठरलेल्या 'नाफा मराठी चित्रपट महोत्सवा'च्या तिसऱ्या पर्वाची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, यंदाचा महोत्सव गेल्या दोन वर्षांपेक्षा अधिक भव्य, अधिक ग्लॅमरस आणि अधिक दिमाखदार स्वरूपात साजरा होणार आहे. ७ ते ९ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सॅनहोजे थिएटरमध्ये रंगणारा हा सोहळा केवळ मराठी चित्रपटांचा उत्सव राहणार नसून, अमेरिकेतील संपूर्ण भारतीय समुदायाला एकत्र आणणारा सांस्कृतिक महाकुंभ ठरणार असल्याची माहिती नाफाचे संस्थापक अध्यक्ष आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेते निर्माते अभिजित घोलप यांनी दिली.

## हॉलिवूडच्या झगमगाटात रंगणार
# नाफा २०२६

**राम कोंडीलकर**

मराठी चित्रपटसृष्टीचा दर्जा, वैभव आणि सांस्कृतिक समृद्धी उत्तर अमेरिकेतील नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या ध्येयातून स्थापन झालेल्या 'नॉर्थ अमेरिकन मराठी फिल्म असोसिएशन' (नाफा) ने अवघ्या काही वर्षांत अमेरिकेतील सर्वाधिक चर्चिल्या जाणाऱ्या भारतीय चित्रपट महोत्सवांमध्ये आपले स्थान निर्माण केले आहे. २०२६ मधील हा महोत्सव हॉलिवूडच्या रेड कार्पेट परंपरेची झलक, चित्रपटांचे भव्य प्रीमियर, कलाकारांशी थेट संवाद, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मनोरंजनाच्या विविध रंगांनी सजलेला असेल.

अमेरिका आणि कॅनडामध्ये वास्तव्यास असलेल्या लाखो भारतीयांसाठी 'नाफा' हे आता केवळ एक व्यासपीठ नसून भारतीय चित्रपट, कला आणि संस्कृती यांना जोडणारा सशक्त सांस्कृतिक पूल बनला आहे. विशेषतः मराठी चित्रपटांना जागतिक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी 'नाफा'ने केलेल्या प्रयत्नांमुळे उत्तर अमेरिकेतील प्रेक्षकांना महाराष्ट्रातील चित्रपट त्याच दिवशी चित्रपटगृहात पाहण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

'गुलकंद', 'सुजित सुशीला', 'संगीत मानापमान', 'चिकीचीकी बुबुम्बुम', 'पाणी', 'गुलाबी', 'नवरा माझा नवसाचा २', 'अशी ही जमवा जमावी', 'स्थळ' आणि 'सलतात रेशीम गाठी' यांसारख्या चित्रपटांना अमेरिकेत आणि कॅनडामध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. विशेष म्हणजे तरुण पिढीचा वाढता सहभाग हा नाफाच्या यशाचा म हत्त्वाचा टप्पा ठरत आहे.

अभिजित घोलप म्हणाले, ''अमेरिकेत भारतीय आणि विशेषतः मराठी चित्रपटसृष्टीसाठी स्वतंत्र आणि सक्षम व्यासपीठ निर्माण करण्याचे स्वप्न आम्ही पाहिले होते. आज नाफाशी एक हजाराहून अधिक सदस्य जोडले गेले आहेत. कलाकार, दिग्दर्शक, लेखक, गायक, तंत्रज्ञ, सिनेमॅटोग्राफर्स आणि विविध क्षेत्रातील सर्जनशील व्यक्तींचा सहभाग वाढत आहे. नाफाच्या फिल्म क्लबद्वारे अनेक लघुपट आणि कलाकृतींची निर्मिती होत असून, उत्तर अमेरिकेत भारतीय चित्रपटसृष्टीचा नवा अध्याय लिहिला जात आहे.''

नाफाच्या या प्रवासात प्रख्यात दिग्दर्शक, अभिनेते आणि कलावंतांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे. त्याम ुळेच अल्पावधीत नाफाने एक प्रभावी सांस्कृतिक चळवळ म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. निर्मितीसोबतच रेडिओसह ओटीटी क्षेत्रातही नाफाचा विस्तार झाला आहे. 'नाफा २०२६' च्या यशस्वी आयोजनासाठी संस्थापक अध्यक्ष अभिजित घोलप यांच्या नेतृत्वाखाली एक अनुभवी आणि समर्पित संचालक मंडळ कार्यरत असून, सह-समन्वयक म्हणून टेक्सासच्या अर्चना सराफ आणि कॅलिफोर्नियाच्या रिया ठोसर यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. कोषाध्यक्ष म्हणून विनायक फडणवीस (कॅलिफोर्निया) आर्थिक नियोजनाची जबाबदारी सांभाळत आहेत. विविध नियोजन समि त्यांमध्ये मास्टरक्लासेस विभागासाठी गौरी कुलकर्णी (इंडियानापोलिस), चित्रपट स्पर्धा विभागासाठी भालचंद्र कुलकर्णी (टेक्सास), रेड






कार्पेट समन्वयासाठी पूजा कारखानीस (कॅलिफोर्निया), आयटी इन्फ्रास्ट्रक्चरची जबाबदारी योगी पाटील (रिचमंड) यांच्याकडे असून, प्रसिद्धी जनसंपर्क नियोजन मानसी देवळेकर (कॅलिफोर्निया), अतिथी संपर्क विभागात लक्ष्मण आपटे यांचेही विशेष योगदान लाभत आहे. या सर्वांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे यंदाचा नाफा फिल्म फेस्टिव्हल अधिक भव्य, व्यावसायिक आणि संस्मरणीय ठरणार आहे.महोत्सवाची शान अधिकच वाढवण्यासाठी यावर्षी मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक मातब्बर कलावंत अमेरिकेच्या भूमीवर येणार आहेत. ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, महेश मांजरेकर, महेश कोठारे, अतुल कुलकर्णी, नागराज मंजुळे, गुरु ठाकूर, श्रुती मराठे आणि गिरिजा ओक यांची विशेष उपस्थिती महोत्सवाला चार चाँद लावणार आहे. गेल्या वर्षी डॉ. मोहन आगाशे, अम ोल पालेकर, संध्या गोखले, सचिन खेडेकर, गजेंद्र अहिरे, अवधूत गुप्ते, अश्विनी भावे, सोनाली कुलकर्णी, आदिनाथ कोठारे, वैदेही परशुरामी आणि मधुर भांडारकर यांनी रसिकांची मने जिंकली होती, तर त्याआधी दिलीप प्रभावळकर, सचिन-सुप्रिया पिळगांवकर, निवेदिता सराफ, महेश मांजरेकर, सुबोध भावे, जब्बार पटेल, उमेश कुलकर्णी, प्रसाद ओक आणि मृणाल कुलकर्णी यांनी महोत्सवाची शान वाढवली होती. यावर्षीची नावे पाहता हे सातत्य आणखी उंचावलेले दिसते! हॉलिवूडच्या झगमगाटासोबत भारतीय संस्कृतीचा अभिमान, मराठी चित्रपटसृष्टीची ताकद आणि भारतीय कलावंतांची सर्जनशीलता यांचा अनोखा संगम अनुभवण्याची संधी देणारा 'नाफा २०२६' हा उत्तर अमेरिकेतील भारतीय समुदायासाठी वर्षातील सर्वात मोठा सांस्कृतिक आणि मनोरंजन सोहळा ठरणार असल्याची उत्सुकता आतापासूनच निर्माण झाली आहे. ●●

---

# महत्त्वाकांक्षा आणि सूडनाट्य

'तु करा के मेरा प्यार सीझन २' हा एक अत्यंत बहुचर्चित रोमँटिक-रिव्हेंज ड्रामा आहे. पहिल्या सीझनच्या प्रचंड यशानंतर, या नव्या सीझनमध्ये प्रेम, धोका, महत्त्वाकांक्षा आणि राजकीय सूडाचा प्रवास अधिक गडद होणार आहे. एका छोट्या शहराच्या पार्श्वभूमीवर आधारित या कथानकात दोन प्रेमवेड्या जीवांचे नाते सत्तेच्या आणि सुडाच्या खेळात कसे भरडले जाते, याचे थरारक चित्रण पाहायला मिळेल.



नातेसंबंधांमधील ताणतणाव आणि संवादाची उत्तम जुळवाजुळव हे या सीझनचे मुख्य वैशिष्ट्य आहे.

जिओ हॉटस्टारवर प्रदर्शित होत असलेल्या या सीरिजचे दिग्दर्शन नवोदित पण प्रतिभावान दिग्दर्शकांनी केले असून, मुख्य भूमिकेत धवल ठाकूर आणि संचिता बासू आहेत. धवल ठाकूर याने पहिल्या सीझनमधून आपल्या संवेदनशील आणि आक्रमक अभिनयाने तरुण वर्गाच्या मनावर राज्य केले आहे. सोशल मीडिया स्टार ते मुख्य अभिनेत्री असा प्रवास करणारी संचिता बासू हिने या सीरिजद्वारे अभिनयात स्वतःला सिद्ध केले आहे. या दोघांनीही अत्यंत कमी वयात या सीरिजच्या माध्यमातून हिंदी डिजिटल विश्वात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

---

जून २०२६ मध्ये रंगभूमीवर अवतरलेले आणि प्रेक्षकांम ध्ये प्रचंड कुतूहल निर्माण केलेले दुसरे एक बहुचर्चित मराठी नाटक म्हणजे 'निमल'. महेश मांजरेकर लिखित आणि दिग्दर्शित हे एक प्रभावी नाटक आहे. हे नाटक पंढरपूरजवळच्या एका छोट्या गावातून मुंबईत सुपरस्टार होण्याचे स्वप्न घेऊन आलेल्या दत्तात्रय उर्फ 'दत्तू' मांजरसुंभेकर या तरुणाच्या प्रवासावर आधारित आहे. महानगरातील सततची नकारघंटा, अपमान आणि एकाकीपणा यामुळे एका निरागस मुलाचे रूपांतर एका हिंस्त्र आणि वेड्या मानसिकतेत कसे होते, याचा अस्वस्थ करणारा थरार या नाटकाच्या कथानकातून मांडला आहे.

या नाटकाचे निर्माते लेखक महेश मांजरेकर असून, त्यांनी आजवर चित्रपट आणि रंगभूमी या दोन्ही माध्यमांमध्ये अत्यंत यशस्वी कामगिरी केली आहे. 'नटसम्राट' सारख्या कलाकृतीतून यश मिळवणारे चित्रपट त्यांनी दिग्दर्शित केले आहेत. रंगमंचावर संपूर्ण नाटकात सहज अभिनयाचे दर्शन घडवणारा अभिनेता सिद्धार्थ जाधव या नाटकाचा मुख्य कणा आहे. सिद्धार्थने आजवर 'लोच्या झाला रे' सारखी नाटकं आणि 'दे धक्का', 'धुरळा' यांसारख्या सुपरहिट चित्रपटांमधून आपल्या अफाट ऊर्जेचा आणि अभिनयाचा जलवा दाखवला आहे. आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम आणि अत्यंत आव्हानात्मक परफॉर्मन्स म्हणून या बहुचर्चित नाटकातून त्याला व्यावसायिक रंगभूमीवर मोठ्या यशाची अपेक्षा आहे.




# वेड्या महत्त्वाकांक्षेची शोकांतिका

---




**साहित्यप्रभा हे पीएनपी कलाविकास मंडळ, अलिबाग अंतर्गत साहित्यप्रेमी, कवी, लेखक आणि नवोदित साहित्यिकांसाठी कार्यरत असलेले एक सर्जनशील साहित्यिक व्यासपीठ आहे. साहित्याची आवड जपणे, नवोदित प्रतिभांना संधी उपलब्ध करून देणे, वैचारिक देवाणघेवाण घडवून आणणे आणि दर्जेदार साहित्यनिर्मितीला प्रोत्साहन देणे हा मंडळाचा मुख्य उद्देश आहे.**

**साहित्यप्रभा मंडळाचे एक वैशिष्ट्य म्हणजे येथे केवळ पारंपरिक विषयांपुरते मर्यादित न राहता दर रविवारी एक वेगळा, आगळावेगळा आणि विचारप्रवर्तक विषय दिला जातो. त्या विषयावर साहित्यिक, कवी आणि लेखक आपल्या कल्पना, भावना, अनुभव आणि सर्जनशील विचार कविता, लेख, कथा किंवा इतर साहित्यप्रकारांच्या माध्यमातून व्यक्त करतात. अशा विषयांमुळे नव्या कल्पनांना चालना मिळते, विचारांची क्षितिजे विस्तारतात आणि साहित्यिक अभिव्यक्ती अधिक समृद्ध होते. याशिवाय, दर शनिवारी सदस्यांना कोणत्याही विषयावरील स्वतःचे स्वलिखित साहित्य समूहात सादर करण्याची संधी दिली जाते. यामुळे लेखकांना मुक्तपणे अभिव्यक्त होता येते आणि साहित्यिकांमध्ये सकारात्मक संवादाचे वातावरण निर्माण होते. साहित्यप्रभा मंडळातर्फे वेळोवेळी काव्यसंमेलन, साहित्यकट्टा, कथावाचन, कथालेखन, अभिवाचन, साहित्य संमेलन, कवी संमेलने, साहित्यिक चर्चासत्रे तसेच विविध साहित्यिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमांमुळे साहित्यिकांना आपली कला सादर करण्याची संधी मिळते, नवोदित लेखकांना मार्गदर्शन मिळते आणि साहित्य क्षेत्रात नवे विचार व नवी ऊर्जा निर्माण होते. साहित्यप्रभा हे केवळ एक साहित्यिक मंडळ नसून शब्दांवर प्रेम करणाऱ्या आणि साहित्याच्या माध्यमातून समाजाशी संवाद साधणाऱ्या साहित्यिकांचे एक प्रेरणादायी कुटुंब आहे. नवोदित आणि अनुभवी साहित्यिकांना समान व्यासपीठ उपलब्ध करून देत हे मंडळ साहित्याचा दीप सतत प्रज्वलित ठेवण्याचे कार्य करत आहे. ''शब्दांना अभिव्यक्ती, विचारांना दिशा आणि सर्जनशीलतेला नवी प्रभा'' या ध्येयाने प्रेरित होऊन साहित्यप्रभा साहित्य, संस्कृती आणि सर्जनशीलतेचा वारसा जपण्याचे कार्य सातत्याने करत आहे. साहित्यप्रभाच्या या साहित्यिक परिवारात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या साहित्यप्रेमी, कवी, लेखक आणि रसिकांनी ८०८०७ ५७३४७ या क्रमांकावर संपर्क साधावा.**

तुझ्या पदराची छाया
माझ्या डोईवर माते
मनी चैतन्याचे बीज
तुझ्या कृपेने रूजते ।।१।।

तुझ्या अंगाईचे गीत
भूल दुःखाची पाडते
तुझा निर्मळ पान्हा
अमृतास लाजवते ।। २।।

तुझे मायेने गोंजारने
ममतेची साक्ष देते
तुझ्या आठवणी साऱ्या
भेट विठूरायाची घडवते ।। ३।।

आई तुझ्या चरणावरी
माझे मस्तक ठेवते
तुझ्या पदराच्या आड
सारे विश्व सामावते ।। ४।।

## पदर

आईच्या पदरात लपलेलं बालपण असतं,
डोळ्यांतील अश्रू पुसणारं सांत्वन असतं.
बहिणीच्या पदरात मायेचा गंध असतो,
घरभर दरवळणारा आपुलकीचा छंद असतो.
प्रियकराच्या स्वप्नात तिचा पदर उडत राहतो,
वाऱ्यासंगे नकळत मनालाही छेडत राहतो.
स्त्रीच्या पदरात केवळ धागे नसतात,
त्यात पिढ्यांचे श्वास विणलेले असतात.

**– प्रणिल**

## माऊलीचा पदर

तो केवळ मऊ सुताचा धागा नाही
तो तर शून्याचा अथांग गाभा आहे
ज्याला आदि नाही अंतही नाही
असा तो माऊलीचा पदर आहे

कधी तो भासतो अथांग काळोख
ज्यात विरून जाते विश्वाचे भान
कधी त्यातूनच उगवते प्रकाशाचे बीज
आणि लयाला जाते जन्माचे अज्ञान

या पदराच्या एका छोट्याशा कोपऱ्यात
कोट्यवधी ब्रह्मांडं अशीच तरंगतात
ऋतूंचे चक्र आणि काळाची गती
तिच्या एका इशाऱ्यानेच थबकतात

जेव्हा गर्भगृहातल्या शांततेसारखी
एक गूढ साद कानात घुमते
तेव्हा कळते या माऊलीच्या पदराखाली
ती अखंड अनाहत चैतन्यधून वाजते.

इथे दुःखाचाही एक निळा सोहळा येतो
अन सुखाचा अट्टाहास गळून पडतो
तिच्या पदराची ती अद्भूत सावली
या आत्म्याला थेट परमात्म्याशी जोडते

तू शोधू नकोस त्याला डोळ्यांनी
तो तर डोळ्यांमागचा प्रकाश आहे
माऊलीचा तो गूढ अथांग पदर...
या चराचराचा श्वास आहे

**–डॉ.ओमकार विनायक पोटे**

## तिच्या वात्सल्याचा पदर

वसुदेव देवकीच्या
बाळ जन्मला उदरी
नदी यमुना भरली
कृष्ण यशोदे पदरी...१

बाळ गोपाळांच्या संगे
खोड्या करितो गं कान्हा
गोपी करीता तक्रार
दडे पदरात तान्हा...२

दही, दूध, तुप, लोणी
यशोदेच्या गं अंगणी
खाई मिटक्या मारीत
तोंड पूसे पदरानी...३

गोपिकांना गोपाळाची
झाली गं सावळ बाधा
धुंद पदराच्या आड
वृंदावनी कृष्ण राधा...४

शालू तिचा भरजरी
चिंधी बांधली बोटाला
फाडी पदर द्रौपदी
होता जखम कृष्णाला...५

पांडवानी द्रौपदीला
भर सभेत हारली
हरी जाहला पदर
लाज तिची हो राखली...६

**–सौ. अक्षता रणजीत गोसावी,**
**पनवेल(स्वरचित)**
**फोन नंबर– ८०८०५५५०२३**

## हरवलेला पदर

पदर माझ्या डोक्यावर पदर ठेवतांना
तू मात्र ऊन्हात उभी राहिलीस
पावसात भिजू नये म्हणून
तुझा पदर माझ्या अंगावर ठेवलास
थंडीत कुडकुडत असतांना
मला पदराच्या कवेत घेतलेस
आई हे कसे फेडू पांग
मला स्वप्नी येऊन सांग

**–कैलास पिंगळे, अलिबाग.**

## पदर

पदरा आड दिसे लाजूक पणा
खोचता कमरेला करारी बाणा
डोक्यावर पदर सुसंस्कृतपणा
पसरता पदर समजूतदारपणा

पदराने घाम थेंब टिपले जाती
पदराने अश्रू थेंब पुसले जाती
उन्हात पदर थोडी सावली देती
मोठी माणसे चुका पदरात घेती !!

**–कविश्री अरुण द. म्हात्रे.जासई, उरण.**

# बालांगण

## असे साजरे होतात उत्सव





आपल्याकडे सणांच्या निमित्ताने घराघरांमध्ये रोषणाई केली जाते. पणत्या लावल्या जातात. पण आपल्याप्रमाणे इतर देशांमध्येही प्रकाशाचा उत्सव साजरा केला जातो. हा उत्सव साजरा करण्याच्या पद्धती वेगळ्या असल्या तरी त्याचा उद्देश जवळपास सारखाच असतो.

✻ जपानामध्ये ओनियो फायर फेस्टिवलचं आयोजन केलं जातं. हा सोहळा जानेवारी महिन्यात रंगतो. जपानमधल्या फुफुओकामध्ये लोक मेणबत्त्या आणि मशाली पेटवून संपूर्ण शहर उजळवून टाकतात. मशाली पेटवल्यामुळे संकटं दूर होतील, असं इथले लोक मानतात.

भन्नाट

✻ थायलंडमध्ये लाम क्रयोंघ नावाचा उत्सव असतो. या उत्सवादरम्यान थाई लोक रात्रीच्या वेळी केळ्याच्या पानांपासून तयार केलेले दिवे लावतात. प्रार्थना करतात आणि हे दिवे वाहत्या पाण्यात सोडून दिले जातात.

✻ फ्लोरिडातल्या अल्टूना शहरात सॅमहेन फेस्टिवलचं आयोजन होतं. हा सुद्धा प्रकाशाचा उत्सव आहे. ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात हा उत्सव साजरा होतो.

✻ स्कॉटलंडमध्ये अप हेली नावाचा सण साजरा होतो. जानेवारी महिन्यातल्या शेवटच्या मंगळवारी हा सण साजरा होतो. या दिवशी इथले लोक प्राचीन काळातल्या योद्ध्यांप्रमाणे पेहराव करून मशाल घेऊन पदयात्रा काढतात.

## फरक जाणून घ्या




बाजारातून कोणताही अन्नपदार्थ खरेदी करताना तुम्हाला मागच्या बाजूला 'एक्सपायरी डेट' किंवा 'बेस्ट बीफोर डेट' असे लिहिलेली दिसते. पण मित्रांनो, याचा अर्थ माहिती आहे का? बरेच लोक या दोन्ही तारखा सारख्याच मानतात. पण त्या पूर्णपणे भिन्न आहेत आणि त्यांचा अर्थदेखील वेगळा आहे. तेव्हा आज एक्सपायरी डेट आणि बेस्ट बीफोर डेटमध्ये काय फरक आहे ते जाणून घेऊ या.

एक्सपायरी डेट म्हणजे ज्या दिवसानंतर उत्पादन वापरण्यास सुरक्षित मानले जात नाही अशी तारीख. ही तारीख प्रामुख्याने औषधे आणि अन्नपदार्थांवर लिहिलेली असते. याचा अर्थ असा की, या तारखेनंतर हे उत्पादन वापरणे आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. जसे की, एक्सपायरी डेटनंतर ब्रेडसारख्या अन्नपदार्थांमध्ये बुरशी वाढू शकते. यामुळे अन्न विषबाधा होऊ शकते.


काळजी घ्या

बेस्ट बीफोर डेट म्हणजे ज्या तारखेनंतर उत्पादनाची सर्वोत्तम चव किंवा गुणवत्ता कमी होऊ शकते ती तारीख. अर्थात, या तारखेनंतर चव उतरत असली तरी तो पदार्थ खराब होत नाही. ही तारीख बहुतेकदा कोरडे अन्न, पॅक केलेल्या वस्तू आणि सौंदर्यप्रसाधनांवर लिहिलेली असते. यावरुन एवढेच समजते की, या तारखेनंतर संबंधित उत्पादनाच्या चव, पोत, रंग किंवा वासात काही बदल होऊ शकतो, परंतु उत्पादनात असा कोणताही बदल झाला नाही तर ते वापरले जाऊ शकते.

म्हणजेच बेस्ट बीफोर डेटनंतरदेखील आपण उत्पादन वापरू शकतो. परंतु त्यातून विचित्र वास येत असेल, रंग बदलला असेल, तर वापर करू नये. उत्पादनाची चव किंवा रंग बदलला असेल, तर ते फेकून द्यावे. उत्पादन योग्यरित्या साठवले गेले असेल आणि ते बराच काळ टिकू शकते. साहजिकच ते वापरले जाऊ शकते. तथापि उत्पादनाच्या एक्सपायरी डेट किंवा बेस्ट बीफोर डेटबद्दल काही शंका असेल तर ते न वापरणे चांगले.

## हे माहीत आहे का?

सामान्य ज्ञान वाढवायचं असेल, तर पेपर वाचायलाच हवा. पण निरखून पाहिले तर पेपरच्या खालच्या बाजूला तुम्हाला चार रंगीत गोल दिसतील. ते तुमच्या लक्षात आले नसतील तर आता बघा. या रंगीत गोलांचा काय अर्थ असावा, हे गोल का बरं दिले जात असावेत, असे प्रश्न तुम्हाला पडले असतील. याच प्रश्नांची उत्तरं जाणून घेऊ.





पूर्वीच्या काळी वर्तपानपत्रं कृष्णधवल म्हणजे ब्लॅक अँड व्हाईट असायची. काळानुरुप त्यात बदल झाले आणि रंगीत फोटो, अक्षरं छापली जाऊ लागली. लाल, पिवळा आणि निळा असे तीन प्रमुख रंग असल्याचं तुम्हाला माहीत असेल. पेपर प्रिंट करण्यासाठी प्रिंटरचा वापर होतो. प्रिंटरमध्येही रंगांचं हेच तंत्र वापरलं जातं. प्रिंटरमध्ये या तीन रंगांसह काळ्या रंगाचा समावेश होतो. हे चार गोलांचा सीएमव्हायके हा क्रम असतो. यात सी म्हणजे सियान (निळा), एम म्हणजे मजेंटा (गुलाबी), वाय म्हणजे

असं का असतं?

येलो (पिवळा) आणि के म्हणजे ब्लॅक (काळा) हे रंग असतात. या रंगांना योग्य क्रमाने जोडलं तर दुसरा कोणताही रंग मिळवता येतो. सीएमव्हायकेमुळे छपाईदरम्यान इतर रंग वृत्तपत्राच्या पानावर दिसू शकतात. वृत्तपत्र हातात घेतल्यानंतर काही फोटो धुरकट दिसत असतील किंवा रंग एकमेकांमध्ये मिसळले असतील तर सीएमव्हायकेचं तंत्र बिघडल्याचं समजावं.

## मोड वापरा, फोटो खुलवा

आता फोटो काढण्यासाठी स्मार्टफोन वापरला जातो. स्मार्टफोनने फोटो काढण्याचं वेगळंच तंत्र आहे. फोनमध्ये वेगवेगळे मोड असतात. या मोड्सचा वापर करून तुम्ही छान छान फोटो काढू शकता. हे फोटो सोशल साइट्सवर पोस्ट करायचे असतात. त्यामुळे तुमचे फोटो छानच असले पाहिजेत. मग आता स्मार्टफोनच्या कॅमेऱ्याने फोटो काढण्याचं तंत्र जाणून घेऊ.



✻ दोस्तांनो, तुमच्या फोनमध्ये बोकेह नावाचा मोड असतो. या मोडमध्ये फोटोची पार्श्वभूमी फिकट म्हणजे ब्लर करता येते. म्हणजे या फोटोत व्यक्ती अगदी स्पष्ट दिसते. तुम्ही या मोडचा वापर करू शकता. बोकेह मोडचा कौशल्याने वापर करून छान फोटो काढता येतील.

टेक्नो टिप्स

✻ रात्रीच्या वेळी फोटो काढायचे असतील तर नाईट स्केप मोड वापरा. या मोडमुळे रात्रीच्या अंधूक प्रकाशात तुम्ही छान फोटो काढू शकाल.

✻ काही स्मार्टफोनमध्ये अल्ट्रा वाइड अँगल कॅमेरा असतो. यामुळे सगळ्या ग्रूपचा फोटो येऊ शकतो. तुमच्या स्मार्टफोनमध्ये असा अँगल असेल तर त्याचा वापर करा.

## यतिमानव : एक रहस्यमयी प्राणी

बर्फाने झाकलेल्या उंचच उंच हिमालय पर्वतांमध्ये एक प्रचंड, केसाळ आणि रहस्यमय प्राणी फिरतो आहे अशी कल्पना करा. त्याचे पाय माणसापेक्षा खूप मोठे आहेत. त्याची उंची १० फुटांच्या आसपास आहे. तो माणसांसारखा दोन पायांवर चालतो आणि क्षणात बर्फाळ डोंगरांमध्ये गायब होतो. हा प्राणी आहे यतीमानव. त्याला हिममानव असेही म्हटले जाते.

यतीची कथा शेकडो वर्षांपासून हिमालयाच्या परिसरात सांगितली जाते. विशेषतः हिमालय, नेपाळ आणि भूतान येथील लोक यतीबद्दल अनेक गोष्टी सांगतात. त्यांच्या मते, यती हा एक विशाल, केसाळ आणि अतिशय ताकदवान प्राणी आहे.

अद्भुताचे अंतरंग

तो बहुतेक वेळा दुर्गम बर्फाळ भागात राहतो आणि माणसांच्या नजरेपासून दूर राहणे पसंत करतो. यतीबद्दलची सर्वात प्रसिद्ध गोष्ट म्हणजे त्याच्या पावलांचे ठसे. अनेक गिर्यारोहक आणि पर्वतारोहकांनी बर्फावर मोठमोठे पावलांचे ठसे पाहिल्याचा दावा केला आहे. काही ठसे तर इतके मोठे होते की ते कोणत्याही सामान्य माणसाचे असूच शकत नव्हते. त्यामुळे यतीचे रहस्य आणखी गहिरे झाले.

सन १९५१ मध्ये ब्रिटिश पर्वतारोहक एरिक शिप्टन यांनी हिमालयात काढलेले काही पावलांच्या ठशांचे फोटो जगभर प्रसिद्ध झाले. ते फोटो पाहून अनेकांना वाटले की यती खरोखरच अस्तित्वात असावा. त्यानंतर अनेक मोहिमा यतीचा शोध घेण्यासाठी निघाल्या. मात्र आजपर्यंत यती प्रत्यक्ष सापडलेला नाही.



मग हे ठसे कोणाचे असतील? काही शास्त्रज्ञांच्या मते, बर्फ वितळताना अस्वल, लांडगा किंवा इतर प्राण्यांचे ठसे मोठे दिसू शकतात. त्यामुळे लोकांना ते यतीचे ठसे वाटले असावेत. काही संशोधनांमध्ये यतीचे म्हणून सापडलेले केस आणि इतर नमुने तपासण्यात आले. त्यातून ते बहुतेक अस्वल किंवा इतर प्राण्यांचे असल्याचे आढळले. तरीसुद्धा यतीचे रहस्य पूर्णपणे उलगडलेले नाही. म्हणूनच आजही अनेक साहसी लोक हिमालयात यतीचा शोध घेण्यासाठी जातात. आजपर्यंत यतीचा स्पष्ट फोटो किंवा जिवंत पुरावा मिळालेला नाही.तरीही यती हा जगातील सर्वात प्रसिद्ध रहस्यांपैकी एक मानला जातो.

## चक्रीवादळे आणि त्यांची नावे

कधी कधी समुद्रात एकाच वेळी तीन-चार चक्रीवादळे निर्माण होतात. त्यांना लांबलचक नाव देण्यापेक्षा 'बिपरजॉय', 'फानी', 'अम्फान' किंवा 'तौक्ते' अशी छोटी आणि सोपी नावे दिली जातात. पूर्वी तशी पद्धत नव्हती. त्यामुळे हवामानाचा अंदाज देताना गोंधळ उडत असे. एखाद्या वर्षी अनेक चक्रीवादळे आली तर कोणत्या वादळाबद्दल बोलले जात आहे, हे समजणे कठीण जाई. यावर उपाय म्हणून चक्रीवादळांना स्वतंत्र नावे देण्याची प्रथा सुरू झाली.



रंजक विज्ञान

चक्रीवादळाला नाव दिल्यामुळे हवामान विभाग, वृत्तवाहिन्या, प्रशासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील संवाद सोपा होतो. उदाहरणार्थ, 'फानी' चक्रीवादळ ओडिशाच्या किनाऱ्याकडे सरकत आहे, असे सांगितले की लोक लगेच सतर्क होतात आणि वेळेत सुरक्षित ठिकाणी जाऊ शकतात. प्रत्येक देश काही नावे सुचवतो. नंतर त्या नावांचा क्रम ठरवला जातो. नवीन चक्रीवादळ तयार होते, तेव्हा यादीतील पुढचे नाव त्याला दिले जाते. चक्रीवादळांची नावे सहसा लहान, लक्षात ठेवण्यास सोपी आणि सहज उच्चारता येतील अशी प्राण्यांची, पक्ष्यांची, फुलांची किंवा स्थानिक शब्दांची नावेही वापरली जातात. उदाहरणार्थ, 'तौक्ते' हे म्यानमारने सुचवलेले नाव असून, त्याचा अर्थ एक प्रकारचा 'सरडा' असा आहे. 'फानी' हे बांगलादेशने दिलेले नाव असून, त्याचा अर्थ 'साप' असा होतो. जगभरातील मोठ्या चक्रीवादळांच्या नावांची यादी जगातील वेगवेगळ्या हवामान संस्था तयार करतात. अतिशय विनाशकारी ठरलेल्या काही चक्रीवादळांची नावे पुन्हा वापरली जात नाहीत. कारण त्या नावाशी अनेकांच्या दुःखद आठवणी जोडलेल्या असल्याने अशी नावे यादीतून काढली जातात.

## बाबा... एक मार्गदर्शक

वडील हा शब्द ऐकताच मनात एका अशा व्यक्तीची प्रतिमा उभी राहते, जो जास्त बोलत नाही पण ज्याच्या खांद्यावर आपण नेहमीच निश्चितपणे विसावतो. आई आपल्याला प्रेमाने आणि काळजीने वाढवते तर वडील जीवनातील प्रत्येक वादळात खंबीरपणे उभे राहण्यास शिकवतात. अनेकदा आपण त्यांचा सल्ला, शिकवण ऐकत नाही. परंतु त्यांच्या प्रत्येक कामातून, प्रत्येक निर्णयातून आपण त्या स्वीकारत राहतो. हे मौल्यवान धडे आपल्याला जीवनाच्या कोणत्याही शर्यतीत मागे राहू देत नाहीत.

आपण बाबांना घर आणि कुटुंबाच्या सर्व जबाबदाऱ्या घेताना पाहतो. बिल भरणे असो, दुरुस्तीचे काम असो किंवा घरासाठी आवश्यक वस्तू आणणे असो... वडील नेहमीच आघाडीवर असतात. ते आपल्याला समजावून सांगत नाहीत तर जबाबदार असण्याचा अर्थ काय आहे हे कृतीतून दाखवतात. ते त्यांची झोप, आराम आणि कधीकधी मनातील इच्छाही बाजूला ठेवून कुटुंबासाठी कष्ट करतात. जबाबदारीची ही भावना पाहूनच तुम्ही मुले जीवनात आपली कर्तव्ये कशी पार पाडायची हे शिकता. हा धडा भविष्यात करिअरसाठी, नातेसंबंधांसाठी आणि समाजासाठी आपल्याला जबाबदार बनवतो.

कसे वागाल?




बाबा काम करताना कधी अपयशीही ठरतात. पण ते हार मानत नाहीत. आपण नेहमीच त्यांना यशस्वी होईपर्यंत प्रयत्न करताना पाहतो. बाबा त्यांच्या अपयशांबद्दल उघडपणे क्वचितच चर्चा करतात, परंतु त्यांची चिकाटी आणि कधीही न हार मानण्याची वृत्ती आपल्याला खूप काही शिकवते. आपल्याला शिकायला मिळते की, अपयश हा आयुष्याचा शेवट नाही तर काहीतरी नवीन शिकण्याची आणि चांगल्या प्रकारे प्रयत्न करण्याची संधी आहे. ही मानसिक शक्ती सर्वात मोठ्या आव्हानाला तोंड देताना उपयोगी पडते. तीच संकटकाळात खंबीरपणे उभे राहण्याचे धैर्य देते.

## तियान शान : चीनची शान

तियान शान ही आशिया खंडातील सर्वात विशाल आणि प्रभावशाली पर्वतरांगांपैकी एक मानली जाते.
तियान शान याचा अर्थ आहे, स्वर्गीय पर्वत किंवा आकाशाला भिडणारे पर्वत. ही पर्वतरांग प्रामुख्याने चीनच्या वायव्य भागात आहे. तरीही तिचा विस्तार किर्गिझस्तान, कझाकस्तान आणि उझबेकिस्तानपर्यंत पसरलेला आहे. एकूण लांबी सुमारे २,५०० किलोमीटर आहे. या पर्वतरांगेतील अनेक शिखरे ७,००० मीटरपेक्षा अधिक उंच आहेत. यातील सर्वात प्रसिद्ध शिखर म्हणजे जेंगिश चोकुसू. त्याला पूर्वी पाबेडा पीक म्हणत असत. त्याची उंची सुमारे ७,४३९ मीटर आहे. चीनच्या भागातील टोमूर हेदेखील अतिशय उंच आणि प्रसिद्ध शिखर आहे. वर्षभर बर्फाने झाकलेली शिखरे, विशाल हिमनद्या आणि खोल दऱ्या हे या पर्वतरांगेचे वैशिष्ट्य आहे. तियान शान प्रदेशात हजारो हिमनद्या आहेत. या हिमनद्यांमधून वितळणारे पाणी मध्य आशियातील अनेक नद्यांना मिळते. त्यामुळे हा प्रदेश

माहिती पर्वतरांगांची



पाण्याचा महत्त्वाचा स्रोत मानला जातो. या पर्वतरांगेतून उगम पावणाऱ्या नद्या आसपासच्या कोरड्या प्रदेशांतील शेती आणि लोकजीवनासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. विशेषतः चीनमधील शिनजियांग प्रदेशातील अनेक वस्ती आणि शेती या पर्वतरांगेतील पाण्यावर अवलंबून आहेत. ही पर्वतरांग जैवविविधतेसाठीही प्रसिद्ध आहे. येथे हिमबिबट्या, तपकिरी अस्वल, लांडगा, आयबेक्स ही पर्वतीय शेळी आणि विविध प्रकारचे गरुड आढळतात. उंचीनुसार येथील वनस्पती बदलत जातात. खालच्या भागात गवताळ प्रदेश आणि जंगले दिसतात, तर वरच्या भागात बर्फाच्छादित क्षेत्रे आढळतात. इतिहासात तियान शान पर्वतरांगेला विशेष महत्त्व आहे. प्राचीन काळातील प्रसिद्ध सिल्क रूट या व्यापारी मार्गाच्या काही शाखा या पर्वतरांगेजवळून जात असत. चीन, भारत, मध्य आशिया आणि युरोप यांना जोडणाऱ्या व्यापारात या प्रदेशाची महत्त्वाची भूमिका होती. व्यापारी, प्रवासी आणि संशोधक या मार्गाने प्रवास करत असत. आज गिर्यारोहण, ट्रेकिंग, स्कीइंग आणि निसर्ग निरीक्षणासाठी जगभरातील पर्यटक तियान शान ला येतात. चीन सरकार आणि इतर देश या पर्वतरांगेतील पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी विविध प्रयत्न करत आहेत. हिमनद्यांचे जतन, वन्यजीवांचे संरक्षण आणि शाश्वत पर्यटन यांना विशेष महत्त्व दिले जात आहे. भव्य बर्फाच्छादित शिखरे, विशाल हिमनद्या, दुर्मिळ वन्यजीव, ऐतिहासिक महत्त्व आणि अद्वितीय नैसर्गिक सौंदर्य यांमुळे तियान शान पर्वतरांग जगातील सर्वात आकर्षक पर्वतरांगांपैकी एक आहे.

### स्मार्ट टिप्स

#### असा सुरू करा अभ्यास



सुट्टी संपल्यावर तुम्ही पुन्हा अभ्यासाला लागला असाल. सुट्टीमुळे अभ्यासाचा थोडा कंटाळा आलेला असतो. पण तुम्हाला पुन्हा एकदा रिचार्ज व्हायला हवं. अभ्यासाला लागायला हवं. यासाठी तुमच्या आवडत्या विषयाचा अभ्यास करायला सुरूवात करा. गणिताचा कंटाळा येत नाही.

### खवय्येगिरी


#### मेक्सिकन कॉर्न



काही चटपटीत खायचं असेल तर तुम्ही मेक्सिकन कॉर्न हा पदार्थ बनवू शकता. यासाठी मक्याची दोन कणसं उकडून घ्या. तीन चमचे मेयोनीज, दोन चमचे क्रीम, एक चमचा लाल तिखट, लिंबाचा रस, पाव कप किसलेलं चीझ, चिरलेली कोथिंबिर आणि मीठ असे पदार्थ घ्या. आता एका बाउलमध्ये मेयोनीज, क्रीम, मीठ आणि लाल तिखट घालून नीट हलवून घ्या. आता मायोनिजचं हे मिश्रण उकडलेल्या मक्याच्या कणसांवर नीट लावून घ्या. त्यावर लिंबाचा रस लावून वरून किसलेलं चीझ आणि कोथिंबिर घाला. मस्तपैकी मेक्सिकन कॉर्न खा.

### दोस्त हे मस्त

#### असे हे सी ऑटर



सी ऑटर हा प्राणी बराच वेळ पाण्यात रहातो. ऑटर हा प्राणी ऑस्ट्रेलिया खंड सोडून इतर प्रत्येक खंडात आढळतो. ऑटरचे दात अणकुचीदार असतात. तो पटकन शिकार करतो. ते पोहण्यासाठी शेपटीचा वापर करतात. त्यांचे पाय खूप छोटे असतात. म्हणूनच त्यांना पोहायला आवडत असावं.


### 'योगा'योग

#### महत्त्व सूर्यनमस्कारांचं




मुलांनो, दररोज सूर्यनमस्कार घालायला हवेत. सूर्यनमस्कार हा संपूर्ण व्यायाम आहे. या व्यायामामुळे तुमचा आजारांपासून बचाव होईल. सर्दी, खोकला, ताप असे आजार फार त्रास देणार नाहीत. तुमचं लक्षही केंद्रित व्हायला मदत होईल. सूर्यनमस्काराची गोडी लागली की तुम्ही हा व्यायाम नियमितपणे कराल.

## निवडक



### पाकिस्तानी खेळाडूंचा पगार निश्चित

**नवी दिल्ली :** पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने नव्या वार्षिक कराराची आखणी केली आहे. यानुसार खेळाडूंचा पगार आणि सामना फी निश्चित करण्यात आली आहे. रिपोर्टनुसार, खेळाडूंची सामना फी जवळपास दुप्पट करण्याचा निर्णय घेतला गेला आहे. कसोटी क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूला सामना मानधन म्हणून १५ लाख पाकिस्तानी रूपये मिळतील. यापूर्वी वार्षिक करारानुसार ही फी ८ लाख पाकिस्तानी रुपये होती. खेळाडूंसाठी वार्षिक करार निश्चित करण्यासाठी मुख्य प्रशिक्षक माइक हेसन आणि सरफराज खान यांनी पुढाकार घेतला होता. पीसीबीच्या वार्षिक करारात असलेल्या ए आणि बी ग्रेड खेळाडूंना सर्वाधिक पैसे मिळणार आहेत. मॅच फी व्यतिरिक्त या खेळाडूंना ५ मिलियन पाकिस्तानी कोट्यवधी रुपयांचा मासिक रिटेनरही मिळेल. आयसीसी आणि आशिया कप स्पर्धेच्या विजयासाठी बोनसही या वार्षिक करारात सहभागी केला गेला आहे. आयसीसी स्पर्धा जिंकल्यानंतर खेळाडूंना त्या सामना फीच्या ५०० टक्के बोनस दिला जाणार आहे. तर आशियाई स्तरावरील स्पर्धा जिंकल्यानंतर ३०० टक्के बोनस दिला जाणार असल्याचं सांगितलं जात आहे. वार्षिक करारात असलेल्या सी कॅटेगरीतील खेळाडूंना जे फक्त टी २० आणि फ्रेंचायझी क्रिकेट खेळतात, त्यांनाही प्रत्येक महिन्याल १.५ मिलियन पाकिस्तानी रुपये मंथली रिटेनर म्हणून मिळतील.

### अक्षरा गुप्ताने केली कमाल

**नवी दिल्ली :** बिहारच्या १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने अल्पावधीच संपूर्ण जगात नावलौकिक मिळवला आहे. असं असताना बिहारमध्ये आणखी एक क्रिकेट रत्न सापडलं आहे. अक्षरा गुप्ता या महिला क्रिकेटपटूने देशांतर्गत क्रिकेटमध्ये कमाल केली. तिने बीसीए महिला अंडर १९ क्रिकेटमध्ये आक्रमक फलंदाजीचं दर्शन घडवलं. डावखुरी फलंदाजी अक्षरा गुप्ताने बीसीए महिला अंडर १९ स्पर्धेतील वनडे सामन्यात १२६ चेंडूत नाबाद ३०६ धावांची खेळी केली. या खेळीत अक्षराने ५५ चौकार आणि ८ षटकार मारले. अक्षरा गुप्ताने फक्त १६ चेंडूत अर्धशतक पूर्ण केलं. त्यानंतर ३४ चेंडू खेळत शतक पूर्ण केलं. त्यानंतर खेळी पुढे नेत ३०० धावांचा पल्ला गाठला. महिला क्रिकेट इतिहासात ३०० धावांचा पल्ला गाठणारी दुसरी खेळाडू ठरली आहे. यापूर्वी देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबईच्या इरा गुप्ताने ३४६ धावा केल्या होत्या. अक्षरा गुप्ता बिहारचं नाव रोशन करेल असं क्रिकेट जाणकार सांगत आहेत. फक्त १४ वर्षांची असताना या वयातील सर्व स्पर्धा खेळणारी बिहारची पहिली क्रिकेटपटू ठरली आहे.





### श्रेयंका पाटील विश्वचषकातून बाहेर

**मुंबई :** भारतीय अष्टपैलू श्रेयंका पाटील महिला टी-२० विश्वचषकातून बाहेर पडली आहे. बुधवारी नेदरलँड्सविरुद्ध क्षेत्ररक्षण करताना तिचा घोटा दुखावला. त्यानंतर तिला स्ट्रेचरच्या मदतीने मैदानाबाहेर नेण्यात आले. सध्या बीसीसीआयने श्रेयंकाच्या बदलीची घोषणा केलेली नाही.दुसऱ्या डावातील सहाव्या षटकात श्रेयंकाने आपल्या गोलंदाजी स्पेलची सुरुवात केली. फलंदाजाने तिचा पहिला चेंडू मिड-ऑनच्या दिशेने मारला. चेंडू पकडण्याच्या प्रयत्नात श्रेयंकाचा पाय मुरगळला आणि ती मैदानावर पडली.त्यानंतर संघाचे फिजिओ तिच्याजवळ पोहोचले. त्यांनी श्रेयंकाच्या पायाला पट्टीही बांधली, पण ती उभी राहू शकली नाही. अखेर तिला स्ट्रेचरच्या साहाय्याने मैदानाबाहेर नेण्यात आले. २०२५ मध्ये श्रेयंकाने वेस्ट इंडिजच्या डोमेस्टिक टी-२० टूर्नामेंट विमेन्स कॅरिबियन प्रीमियर लीगमध्ये पुनरागमन केले. त्यानंतर २०२६ मध्ये ती रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुच्या दुसऱ्या ट्रॉफीचा भाग होती. संघाने दिल्ली कॅपिटल्सला ६ गडी राखून हरवले होते.

### द.आफ्रिका-झेक प्रजासत्ताक मॅच ड्रॉ

**अटलांटा :** अटलांटा येथे खेळल्या गेलेल्या फिफा वर्ल्ड कपच्या ग्रुप-ए सामन्यात दक्षिण आफ्रिकेने झेक रिपब्लिकविरुद्ध १-१ ने बरोबरी साधली. सामन्याच्या ५व्या मिनिटाला मिखाल सादिलेकने गोल करून चेकियाला आघाडी मिळवून दिली, परंतु ८३व्या मिनिटाला मिळालेल्या पेनल्टी संधीचे टेबोहो मोक्केनाने गोलमध्ये रूपांतर करून दक्षिण आफ्रिकेचा पराभव टाळला. अलेक्झांडर सोज्काच्या पास-



वर मिखाल सादिलेकने गोल करून चेकियाला १-० ची आघाडी मिळवून दिली. हा स्पर्धेतील आतापर्यंतचा सर्वात वेगवान गोल ठरला. पावेल सुल्कच्या हँडबॉलमुळे दक्षिण आफ्रिकेला पेनल्टी मिळाली. टेबोहो मोक्केनाने चेंडू गोलपोस्टच्या खालच्या डाव्या कोपऱ्यात मारून स्कोअर १-१ केला. चेकियाने सुरुवातीला आघाडी घेतली असली तरी दुसरा गोल केला नाही आणि त्याची किंमत त्यांना बरोबरीने चुकवावी लागली. दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेबोहो मोक्केनाने येलो कार्ड मिळाल्यानंतरही उत्कृष्ट कामगिरी केली आणि संघाला महत्त्वाचा गुण मिळवून दिला.

# फिफा नफ्यात; यजमान तोट्यात

**। कॅनडा । वृत्तसंस्था ।**



जगभरात सध्या फिफा विश्वचषक २०२६ ची धामधूम पाहायला मिळत आहे. महिनाभर चालणाऱ्या फुटबॉलच्या या कुंभमेळ्यात पाण्यासारखा पैसा वाहत आहे. सध्या हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, वाहतूक व्यवस्था आणि तिकीटाचे दर गगनाला भिडले आहेत. यातून यजमान शहरांचीही आर्थिक भरभराट होईल, असं वाटत असलं तरी वास्तव खूप वेगळं आहे. या स्पर्धेचे आयोजन करणारी फिफा तिकीट विक्री, प्रसारण हक्क, प्रायोजकत्व आणि लायसनिंगद्वारे थेट अब्जावधींचा नफा कमावते. मात्र, यजमान शहरांवर प्रचंड खर्च, पायाभूत सुविधांचा ताण आणि स्पर्धा संपल्यानंतरचे आर्थिक संकट उरते.

साधारणपणे आयपीएलप्रमाणेच फिफाचेही व्यावसायिक मॉडेल आहे. यामध्ये प्रसासरण हक्क, प्रायोजकत्व, तिकीट विक्री आणि जाहिरातींच्या माध्यमातून नफा कमावला जातो. २०१९ ते २०२२ या कतार विश्वचषक स्पर्धेत फिफाने विक्रमी ७.५७ अब्ज डॉलर्स म्हणजे सुमारे ६३ हजार कोटी रुपये कमाई केली होती. ही कमाई भारतीय आयपीएल (१२,००० कोटी) स्पर्धेच्या तुलनेत कितीतरीपट अधिक आहे. दुसरीकडे, यजमान शहरांना या खेळाचा ८० ते ९० टक्के खर्च उचलावा लागतो. यात स्टेडियमची दुरुस्ती, सुरक्षा यंत्रणा, स्वच्छता आणि गर्दी नियंत्रणाचे व्यवस्थापन यांचा समावेश असतो. फिफाच्या क्लीन साईट नियमांमुळे स्थानिक प्रशासनाला स्टेडियम परिसरातील अनधिकृत ब्रँडिंग आणि जाहिराती काढून टाकाव्या लागतात, जेणेकरून फिफाच्या अधिकृत प्रायोजकांनाच प्रसिद्धी मिळेल. याचा थेट फटका स्थानिक छोट्या व्यावसायिकांना बसतो.

१९९४ मध्ये अमेरिकेत झालेल्या विश्वचषक प्रचंड यशस्वी मानला जातो. या संपूर्ण स्पर्धेला तब्बल ३५ लाख प्रक्षेकांनी हजेरी हजेरी लावली होती, म्हणजे प्रत्येक सामन्याला जवळपास ६०,००० पेक्षा जास्त प्रेक्षक. यामुळे देशात खेळ संस्कृती रुजण्यास मदत झाली. अमेरिकेने आधीपासूनच उपलब्ध असलेली मैदाने वापरल्याने त्यांचा नव्याने होणारा खर्च वाचला. तरीही, रॉबर्ट बाडे आणि व्हिक्टर मॅथेसन या अर्थतज्ज्ञांच्या अभ्यासानुसार, या स्पर्धेतून यजमान शहरांना मिळालेला प्रत्यक्ष आर्थिक फायदा हा पूर्व अंदाजापेक्षा ५.५ अब्ज ते ९.३ अब्ज डॉलर्सने कमीच होता. या स्पर्धेनंतर तज्ज्ञांनी असं मत मांडलं, की विश्वचषक स्पर्धेमुळे स्थानिक पातळीवर अर्थव्यवस्थेला हातभार लागेलच असे नाही.

२०१४ चा ब्राझील विश्वचषक हा सार्वजनिक पैशांची उधळपट्टीचे उदाहरण मानला जातो. ब्राझीलने आर्थिक मंदीच्या काळात विश्वचषक आणि २०१६ चे ऑलिम्पिक अशा दोन मोठ्या स्पर्धा लागोपाठ आयोजित केल्या. यासाठी ब्राझीलने तब्बल ११.५ अब्ज डॉलर्स खर्च केले, ज्यातील ८५% वाटा जनतेच्या करातून आलेला पैसा होता. येथील १२ आलिशान स्टेडियम्स स्पर्धा संपल्यानंतर फारशी उपयोगात आली नाही. ज्यांना अर्थशास्त्रात पांढरे हत्ती म्हटले जाते. यावर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात आक्षेप नोंदवला होता.

इतिहासात पहिल्यांदाच २०२६ चा विश्वचषक अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको अशा तीन देशांमध्ये संयुक्तपणे आयोजित केला जात आहे. यात सहभागी संघांची संख्या ३२ वरून ४८ करण्यात आली आहे. तीन देशांचे मॉडेल असल्याने आर्थिक जोखीम विभागली गेली आहे.

ही स्पर्धा ३ देशांमध्ये खेळवली जात असली तरी यजमान शहरांवरील खर्चाचा भार कमी झालेला नाही. अस्तित्वात असलेल्या स्टेडियममध्ये फिफाच्या मानकांनुसार बदल करण्यासाठी कोट्यवधींचा खर्च होत आहे. अमेरिकेत फेमाकडून ११ यजमान शहरांना सुरक्षेसाठी ६२.५ कोटी डॉलर्सचा निधी देण्यात आला आहे. फॉक्सबरोसारख्या अवघ्या १८,००० लोकसंख्या असलेल्या लहान शहरात ७ सामन्यांसाठी ७८ लाख डॉलर्सचा सुरक्षा खर्च अपेक्षित आहे. स्थानिक करदात्यांनी हा खर्च देण्यास नकार दिल्याने अखेर खासगी कंपन्यांना हा भार उचलावा लागला. कॅनडात टोरँटो शहराचा अंदाजित खर्च थेट ३८ कोटी डॉलर्सवर पोहोचला आहे, तर मेक्सिकोच्या काही शहरांमध्ये हॉटेलचे भाडे तब्बल १,००० टक्क्यांनी वधारले आहे.

## बेन स्टोक्सला इंग्लंड संघातून काढलं

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात दुसरा कसोटी सामना सुरू आहे. या सामन्याचं नेतृत्व जो रूट करत आहे. कारण नाइट क्लबमध्ये झालेल्या राड्यानंतर बेन स्टोक्सवर कारवाई करण्यात आली आहे. त्याने दारूच्या नशेत नाइट क्लबमध्ये मारामारी केली होती. त्यामुळे संघातून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला होता. असं असताना बेन स्टोक्स पुन्हा एकदा मैदानात उतरणार आहे. पण बेन स्टोक्स इंग्लंड संघात नाही तर काउंटी क्रिकेटमध्ये खेळताना दिसणार आहे. डरहम संघाने त्याला काउंटी क्रिकेटसाठी संघात जागा दिली आहे. इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स आणि वाद हे आता नवीन राहिलं नाही. न्यूझीलंडविरुद्ध पहिल्या कसोटी सामन्यात विजय मिळवल्यानंतर त्याने संघाच्या नियमांचं उल्लंघन केलं होतं. विजयोत्सव साजरा करण्यासाठी लंडनच्या एका नाइटक्लबमध्ये गेला होता. या क्लबमध्ये दारू प्यायली आणि त्यानंतर गस एटकिंसनसह एका रग्बी खेळाडूला मारलं. बेन स्टोक्सचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्यानंतर इंग्लंड क्रिकेट बोर्डाने तात्काळ कारवाई केली.




त्याला ओवल कसोटीतून बाहेरचा रस्ता दाखवला गेला. आता बेन स्टोक्सची चौकशी सुरू असून यापुढे स्टोक्सला संघात स्थान मिळेल की नाही याबाबत शंका आहे.



मोबाईलच्या जगतामध्ये रंगणारी पिढी पारंपारिक खेळालाही महत्व देतात. हॉकी पद्धतीचा जुना असलेला खेळ बेलोशी येथे मुले खेळत असताना टिपलेले छायाचित्र.

## ‘धोनीसारख्या प्रशिक्षकाची संघाला गरज’

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी गौतम गंभीर यांची निवड झाल्यापासून टीममध्ये अनेक बदल पाहायला मिळाले. अनेक दिग्गज खेळाडूंनी कसोटीमधून निवृत्त घेतली. जसे की रोहित शर्मा, विराट कोहली आणि रविचंद्रन अश्विन. नुकताच टी-२० वर्ल्ड कप जिंकलेल्या कर्णधार सूर्यकुमारला आता टी-२० संघात जागा मिळालेली नाही. या अनेक मोठा बदलांमुळे गंभीर यांच्यावर सतत टीका होत आहे. अनेक दिग्गज खेळाडू गंभीर यांच्या निर्णयावर वेळोवेळी आक्षेप घेताना दिसतात. यातच आता भारतीय क्रिकेट संघाचा माजी वेगवान गोलंदाज एस. श्रीसंत आपल्या वक्तव्यांमुळे पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

श्रीसंतच्या मते, भारतीय संघाला सध्या गौतम गंभीरसारख्या नव्हे, तर महेंद्रसिंग धोनीसारख्या प्रशिक्षकाची गरज आहे. श्रीसंतच्या या वक्तव्यामुळे क्रिकेट विश्वात एका नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. जुलै २०२४ मध्ये राहुल द्रविडच्या जागी गौतम गंभीर भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक बनले. गंभीरच्या कार्यकाळात भारताने अनेक आयसीसी स्पर्धा जिंकल्या, परंतु काही घरच्या मालिकांमधील संघाची कामगिरी अपेक्षेनुसार नव्हती. टी-२० मध्ये संघ जरी उल्लेखनीय कामगिरी करत असला तरीही वनडे आणि कसोटीतील कामगिरी प्रभावी राहिलेली नाही.

प्रशिक्षकाच्या भूमिकेवर आपले मत व्यक्त करताना श्रीसंत म्हणाला की, खेळाडूंचे योगदान सर्वात महत्त्वाचे होते. खेळाडू विश्वचषक जिंकतात, प्रशिक्षक नाही. खेळाडू मैदानावर घाम गाळतात, त्यामुळे श्रेय त्यांनाच मिळायला हवे.

यावर्षीचा टी-२० वर्ल्ड कप जिंकलेल्या भारतीय संघाचे उदाहरण देत तो म्हणाला, जर संजूने चांगली कामगिरी केली नसती, जर सूर्यकुमार यादवने चांगले कर्णधारपद भूषवले नसते, किंवा योग्य वेळी गोलंदाजीत बदल केले नसते, तर आपण जिंकलो असतो का? मैदानावर प्रशिक्षक निर्णय घेत होता का?

आयसीसी स्पर्धांमध्ये मोठे यश मिळवूनही, भारतीय संघासाठी घरच्या मैदानावरील काही मालिका निराशाजनक ठरल्या. गंभीरच्या कार्यकाळात भारताला न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध घरच्या मैदानावर मालिकांमध्ये पराभव पत्करावा लागला. या निकालांच्या आधारावर, श्रीसंतने संघ व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि भारतीय संघाला मार्गदर्शक म्हणून धोनीची निवड करण्याची मागणी केली.

## तिसऱ्या वनडेसाठी हर्षित राणा भारतीय संघात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

तिसऱ्या आणि शेवटच्या एकदिवसीय सामन्यापूर्वी निवड समितीने वेगवान गोलंदाज हर्षित राणाचा संघात समावेश केला आहे.

हर्षित राणा काही काळापासून दुखापतीमुळे संघाबाहेर होता. तो बीसीसीआयच्या डॉक्टरांच्या आणि फिजिओथेरपिस्टच्या देखरेखीखाली सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये आपल्या फिटनेसवर काम करत होता. फिटनेस चाचणी उत्तीर्ण केल्यानंतर निवडकर्त्यांनी त्याला तात्काळ मुख्य संघात समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला.राणा आल्याने कर्णधार शुभमन गिलकडे चेन्नईच्या परिस्थितीनुसार तीन प्रमुख वेगवान गोलंदाजांचा पर्याय उपलब्ध होईल. फिरकी विभागात कुलदीप यादव आणि वॉशिंग्टन सुंदर यांची जोडी आधीपासूनच संघाची मोठी ताकद मानली जात आहे.




## ऑस्ट्रेलिया मालिका विजयासाठी सज्ज

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बांगलादेश क्रिकेट टीमने मायदेशात ऑस्ट्रेलियाचा एकदिवसीय मालिकेत धुव्वा उडवला. बांगलादेशने सलग २ सामने जिंकून मालिका आपल्या नावावर केली.

बांगलादेशने यासह एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच ऑस्ट्रेलिया विरुद्ध मालिका जिंकली. मात्र ऑस्ट्रेलियाने तिसरा आणि अंतिम सामना जिंकून लाज राखली. त्यानंतर कांगारुंनी ३ सामन्यांच्या टी २० मालिकेत विजयी सलामी दिली. ऑस्ट्रेलियाकडे सलग दुसरा सामना जिंकून मालिका आपल्या नावावर करण्याची संधी आहे. तर बांगलादेशसाठी दुसरा सामना हा करो या मरो असा आहे. बांगलादेशला मायदेशात टी २० मालिका पराभव टाळायचा असेल तर कोणत्याही स्थितीत विजयी व्हावं लागणार आहे. त्यामुळे ऑस्ट्रेलिया दुसरा सामना जिंकून मालिका नावावर करणार की बांगलादेश पलटवार करुन बरोबरी साधणार? याची चाहत्यांना उत्सुकता आहे.

## इंडिया-इंग्लंड लॉर्ड्स टेस्टसाठी टीम जाहीर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टीम इंडिया वुमन्स वर्ल्ड कपआधी इंग्लंड विरुद्ध टी २० मालिका खेळली. तर वर्ल्ड कपनंतर उभयसंघात एकमेव कसोटी सामना खेळवण्यात येणार आहे. हा सामना १० जुलैपासून खेळवण्यात येणार आहे. सामन्याचं आयोजन हे लंडमधील ऐतिहासिक लॉर्ड्स क्रिकेट ग्राउंडमध्ये करण्यात आलं आहे. इंग्लंड क्रिकेट बोर्डाने या सामन्यासाठी १८ जून रोजी १५ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. नॅट सायव्हर ब्रँट इंग्लंडचं नेतृत्व करणार आहे.

वुमन्स टीम इंडिया विरुद्ध इंग्लंड यांच्यात आतापर्यंत कसोटी क्रिकेटच्या इतिहासात एकूण १५ सामने खेळवण्यात आले आहेत. उभयसंघातील पहिला सामना हा १९८६ साली खेळवण्यात आला होता. टीम इंडिया इंग्लंडवर वरचढ राहिली आहे. भारताने या १५ पैकी ३ सामन्यांत विजय मिळवला आहे. तर इंग्लंडने टीम इंडिया विरुद्ध फक्त एकमेव सामना जिंकला आहे. तर उभयसंघातील ११ सामने अनिर्णित राहिले आहेत. दोन्ही संघांमध्ये शेवटचा कसोटी सामना हा २०२३ साली खेळवण्यात आला होता. त्यानंतर आता ३ वर्षांनी कसोटीचा थरार रंगणार आहे. दरम्यान इंग्लंड-इंडिया यांच्यात २८ मे ते २ जून दरम्यान ३ सामन्यांची टी २० मालिका खेळवण्यात आली होती. भारताने या मालिकेत विजयी सलामी दिली. मात्र त्यानंतर इंग्लंडने सलग २ सामन्यांसह मालिका जिंकली.

इंडिया विरूद्धच्या एकमेव कसोटी सामन्यासाठी वुमन्स इंग्लंड टीममध्ये नॅट सायव्हर-ब्रंट (कर्णधार), टॅमी ब्युमॉन्ट, लॉरेन बेल, माइया बौचियर, एलिसा कॅप्सी, टिली कॉर्टीन-कोलमन, सोफी एक्लेस्टोन, लॉरेन फायलर, एमी जोन्स, हीदर नाईट, एम्मा लॅम्ब, ग्रेस पॉट्स, एली थ्रेलकेल्ड आणि मॅडी विलियर्स यांचा समावेश आहे.

### लुईस रोमोने केला एकमेव गोल | रेंगलने रोखले २ गोल

## मेक्सिको नॉकआउटमध्ये पोहोचणारी पहिली टीम

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सह-यजमान मेक्सिको फुटबॉल विश्वचषकाच्या नॉकआउट फेरीत पोहोचले आहे. या स्पर्धेच्या ‘राउंड ऑफ ३२’ मध्ये पोहोचणारी ती या आवृत्तीतील पहिली टीम ठरली. त्यांनी शुक्रवारी झालेल्या शेवटच्या सामन्यात दक्षिण कोरियाला १-० च्या फरकाने हरवले.

ग्वाडलाहारा स्टेडियममध्ये खेळल्या गेलेल्या ग्रुप-ए सामन्याचा पहिला हाफ गोलरहित राहिला. सामन्यातील एकमेव गोल ५० व्या मिनिटाला लुईस रोमोने केला. आता मेक्सिको आपल्या शेवटच्या ग्रुप सामन्यात चेक प्रजासत्ताकाशी भिडेल, तर दक्षिण कोरियाचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होईल. या विजयामुळे संघ ६ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. कोरिया ३ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे.



सामन्याचा पहिला हाफ गोलरहित राहिला. दोन्ही संघांनी बचावात्मक सुरुवात केली आणि गोलच्या संधी कमी निर्माण झाल्या. चाहत्यांनीही या फिफ्या खेळावर नाराजी व्यक्त केली. रोमोने मेक्सिकोला आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या हाफच्या सुरुवातीला मेक्सिकोने १-० अशी आघाडी घेतली. येथे लुईस रोमोने दक्षिण कोरियाचा गोलकीपर किम स्युंग-ग्यू आणि डिफेंडर ली गिह्युक यांच्या चुकीचा फायदा घेत सोपा गोल केला.दक्षिण कोरियाने शेवटच्या मिनिटांत गोल करण्याचे अनेक प्रयत्न केले, पण मेक्सिकन गोलकीपर राउल रेंगलने शेवटच्या क्षणी दोन उत्कृष्ट बचाव करत संघाचा विजय निश्चित केला.

मेक्सिकोने पहिल्यांदाच फुटबॉल विश्वचषकात सलग तीन सामने जिंकले आहेत. या आवृत्तीत त्याला सलग दुसरा विजय मिळाला आहे.

मेक्सिकोने ८ वर्षांनंतर विश्वचषकाच्या नॉकआउटमध्ये प्रवेश केला आहे. संघाने यापूर्वी २०१८ मध्ये राउंड ऑफ १६ मध्ये स्थान मिळवले होते. मेक्सिको २०२२ च्या विश्वचषकात लीग स्टेजमधून बाहेर पडला होता. संघ आतापर्यंत २ वेळा उपांत्यपूर्व फेरीत पोहोचला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१–२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग–email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग– email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए–५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२–२२८८४५३८.
■ **संस्थापक–संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)